नवमहाराष्ट्रांतील विचार प्रवाह

# काँग्रेस पक्ष

पु. पां. गोखले

नवमहाराष्ट्रांतील विचारप्रवाह

# काँग्रेस पक्ष

भारतीय राष्ट्र-सभा

मेसर्स जोशी आणि लोखंडे
सप्रेम भेट
ता.
प्रकाशक, पुणें.

पु. पां. गोखले

संपादक
प्रा. चंद्रकुमार डांगे

१२६१

प्रकाशक
दे. श्री. जोशी व म. द. लोखंडे
मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

मुद्रक
प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

चित्रकार
अनंत सालकर

किंमत तीन रुपये

## काँग्रेस पक्ष

★

| | | |
|---|---|---|
| १ | काँग्रेसपूर्व शांतिसहकार | १ |
| २ | राज्य इंग्रजांचें, कारभार काँग्रेसचा | ९ |
| ३ | साम्राज्याच्या गरजा येती भारताच्या काजा | १५ |
| ४ | चले जाव | २६ |
| ५ | चलो दिल्लीसाठीं सशस्त्र उठाव | ४० |
| ६ | स्वातंत्र्याचें झुंजुमुंजु | ४३ |
| ७ | स्वातंत्र्याचा उदय | ५० |
| ८ | भारताचें प्रजासत्ताक स्थिरासन झालें | ५३ |
| ९ | दशवार्षिक समीक्षण | ५८ |
| १० | काँग्रेसचें नेतृत्व | ६७ |
| ११ | काँग्रेसमधील विवेकवर्धक | ७३ |
| १२ | काँग्रेस अनुयायांची संघटनात्मकता | ८१ |
| १३ | उद्यांची राष्ट्र-सभा | ८६ |
| | कालक्रम | ९३ |
| | सूचि | ९५ |

★

## ऋण-निर्देश

महाराष्ट्र-जीवन या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर, 'नवमहाराष्ट्रांतील विचार-प्रवाह' आणि 'महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह' अशा दोन मालांचें आयोजन आम्ही आमचे स्नेही प्रा. चंद्रकुमार डांगे यांच्या साहाय्यानें केलें. विषयांची आणि लेखकांची निवड, पुस्तकांच्या अंतरंगाचें स्वरूप आदि गोष्टी चिकित्सक दृष्टीनें व्हाव्यात म्हणून कोणाचें तरी मार्गदर्शन घेतलें पाहिजे. या गरजेंतून एका सल्लागार-समितीची कल्पना सुचली. महाराष्ट्रांतील थोर विचारवंत प्रा. गं. बा. सरदार, प्रा. डॉ. रा. ना. दांडेकर व प्रा. दि. के. बेडेकर यांनीं या समितीवर काम करण्याचें मान्य केलें. या मालेंतील प्रस्तुतचें पुस्तक आम्ही आनंदानें सादर करीत आहोंत.

या दोन्ही मालांतील पुस्तकें प्रकाशित करण्यामागें एक विनम्र भूमिका समान आहे. नव्यानें प्रस्थापित झालेल्या आपल्या महाराष्ट्रांत विधायक वृत्तीचें संगोपन व्हावें आणि त्यायोगें भारताच्या आणि पर्यायानें महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचें उद्दिष्ट सफल व्हावें. तालुक्याच्या आणि विकसित होणाऱ्या छोटया मोठया शहरांतील सामान्य वाचकाला अशा प्रकारच्या साहित्याची तीव्र गरज आहे असा अनुभव आज सर्वांनाच येत आहे. ही उणीव भरून काढण्याचा हा एक नम्र पण प्रामाणिक प्रयत्न आहे.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालांतहि कॉंग्रेसपक्षानें भारताच्या सर्वांगीण क्रांतीला जो हातभार लावला त्याचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. या देशाच्या कर्तृत्वाच्या क्षितिजावर जे अनेक थोर देशभक्त आणि त्यागी महापुरुष उदयाला आले, त्यांच्या कर्तृत्वानें, बलिदानानें, त्यागानें, लोकसेवेच्या असिधाराव्रतानें हा इतिहास उजळून निघालेला आहे. कॉंग्रेसपक्षानें ज्या थोर परंपरा निर्माण केल्या व ज्या विधायक वृत्ति रुजविल्या त्यांचें सातत्य टिकविणें किती अगत्याचें आहे हें उघड आहे.

कॉंग्रेससारख्या पक्षासंबंधीं लिहिणें म्हटलें तर थोडें अवघड व नाजूक कार्य आहे. तटस्थ वृत्ति राखून लिहिणें फार कठीण असतें. पण आमचे स्नेही कराडचे एक सामाजिक कार्यकर्ते श्री. पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबूराव गोखले यांनीं हें कार्य अगदीं नेमक्या वेळांत व कुशलतेनें करून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानणें एक कर्तव्य आहे. श्री. बाबूराव गोखले यांनीं या लेखनानें पुनः एकवार आपल्या लेखन-प्रभुत्वाचा प्रत्यय आणून दिला आहे व त्याचा लाभ आम्हांला मिळाला ही भाग्याची गोष्ट आहे.

प्रा. सरदार, डॉ. दांडेकर आणि प्रा. बेडेकर यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणें व ती शब्दांकित करणें तर कठीण. वेळोवेळीं सल्ला देऊन, चर्चा करून आणि मार्गदर्शन करून त्यांनीं या मालेला व आम्हांला उपकृत करून ठेविलें आहे. त्यांच्या परिपक्व अनुभवाचेंच हें फल आहे. तरी अत्यंत विनम्रपणें आम्ही त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

या मालेचे संपादक प्रा. चंद्रकुमार डांगे यांनीं मालेच्या प्रारंभापासूनच जे अपरंपार श्रम केले त्याचें समग्र रूप या मालेच्या अंतरंगांत व बहिरंगावर स्पष्टपणें प्रतीत होत आहे. आपल्या विनम्र वृत्तीनें आणि अपूर्व उत्साहानें त्यांनीं ही योजना सफल केली. इतकेंच नव्हे तर, सल्लागार-समितीशीं अभ्यासू वृत्तीने वागून आणि आमच्याशीं संपूर्ण सहकार्य करून ही माला गुंफली हें विशेष उल्लेखनीय आहे. प्रा. चंद्रकुमार डांगे यांचा अतूट असा ऋणानुबंध उपचारानें व्यक्त करणें शक्य नाहीं. त्यांचें सहकार्य म्हणजे आमचें यश, इतकें म्हणून आम्ही त्यांचें ऋण मान्य करतों.

चित्रकार श्री. सालकर, प्रतिभा मुद्रणालयांतील कामगारबंधु आणि व्यवस्थापक शाखेंतील आमचे सर्व सहकारी यांचे अपरंपार श्रम या मालेला लाभले म्हणूनच ती वेळेवर प्रकाशांत येऊं शकली. या सर्वांचें आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

नवमहाराष्ट्रांतील जनतेला ही माला रुचेल व तिचें हर्षभरानें स्वागत होईल हीच अपेक्षा. ‘ न्यून तें पुरतें करोनि घ्यावें ’ अशी प्रार्थना करून हा ऋण-निर्देश आटोपता घेतों.

प्रतिभा मुद्रणालयाच्या रौप्य-महोत्सव-समयीं ही माला प्रकाशित होत आहे व भारताचे सुपुत्र डॉ. सी. डी. ऊर्फ चिंतामणराव देशमुख यांच्या शुभ हस्तें हें प्रकाशन होत आहे हा खरा मणि-कांचन योग आहे. माननीय श्री. चिंतामणराव देशमुख यांचा आशीर्वाद या मालेला आणि आमच्या संस्थेला लाभावा यासारखी आनंदाची, समाधानाची दुसरी कोणती गोष्ट असूं शकेल ? श्री. देशमुखांचा आशीर्वाद हें या मालेचें व आमचें भाग्य होय.

दे. श्री. जोशी
म. द. लोखंडे
प्रकाशक

---

# भूमिका

भारतीय स्वातंत्र्याचा लढा १५ ऑगस्ट १९४७ सालीं संपला आणि एका नवयुगाला प्रारंभ झाला. आपण आपल्या भाग्याचे शिल्पकार खऱ्या अर्थानें झालों. याबरोबरच भारतीय जीवनांतील सर्व क्षेत्रांतील समस्या तीव्रपणें जाणवूं लागल्या तर काळाच्या ओघांत नव्या समस्या निर्माण झाल्या. नव्यानें प्रस्थापित झालेला महाराष्ट्र अर्थातच या परिस्थितीला अपवाद कसा राहाणार! भारताची सर्वांगीण प्रगति म्हणजेच महाराष्ट्राची प्रगति हें मूलभूत सूत्र डोळ्यासमोर ठेवून **नवमहाराष्ट्रांतील विचार-प्रवाह** आणि **महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह** या दोन मालांची योजना आंखलेली आहे. महाराष्ट्रांत शिक्षण वेगानें पसरत आहे व नवशिक्षित प्रौढांची संख्याहि वाढत आहे. या विशाल जनतेला विधायक विचारांची ओळख करून देणें व त्यांच्या कर्तृत्वशक्तीला आवाहन करणें हें उद्दिष्ट अल्पांशानें साधण्याचा हा एक विनम्र प्रयत्न आहे.

एखाद्या विषयाचें संपूर्ण विवेचन अशा मालेच्या सीमित कक्षेत अपेक्षिलेलें नसतें. तसें करण्याचें योजिलें तर पृष्ठसंख्या आणि प्रकाशन-काळ यांचें गणित वाढून अशीं पुस्तकें केवळ परिस्थितीनें दुष्प्राप्त होतात. साहजिकच मूळ विचारधारांचें ऐतिहासिक पार्श्वभूमीवर धांवतें दर्शन घडवून विधायक स्वरूप ठळकपणें मांडून विषयाचा प्रपंच करावा लागतो. या मालेसाठीं योजिलेल्या लेखकांनीं ही दृष्टि समोर ठेवून लेखन केलेलें आहे हें नमूद करणें आवश्यक आहे.

श्री. बाबूराव गोखले यांच्यासारखा अनुभवी आणि सामाजिक कार्यांत रस घेणारा लेखक भारतीय राष्ट्रसभेचा इतिहास आणि कर्तृत्व निवेदन करण्यास लाभला हें एक औचित्य आहे. काँग्रेसच्या इतिहासांतील ठळक घटनांचा परामर्श घेतांना त्यांनीं तत्त्वप्रणाली आणि प्रत्यक्ष कार्यक्रम यांची सांगड खुबीनें घातलेली आहे. तद्वतच गेल्या बारा वर्षांत आलेल्या अनुभवावरून उणीवा आणि भावी योजना यांचें सूचक चित्रहि रेखाटलेलें आहे. श्री. गोखले यांच्या शैलीवर कृष्णाकांठच्या मराठीची नक्षी झळकणें अपरिहार्य आहे. काँग्रेसच्या स्वरूपाची विधायक ओळख करून देण्याचें सामर्थ्य लेखकानें पूर्णपणें व्यक्त केलेलें आहे. नव्या नेतृत्वाच्या निर्मितीस हें डोळस परीक्षण उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

माझे ज्येष्ठ स्नेही, महाराष्ट्रांतील थोर विचारवंत प्रा. अण्णासाहेब सरदार, गुरुवर्य डॉ. प्रा. दांडेकर आणि प्रा. दि. के. बेडेकर यांचें निःस्पृह मार्गदर्शन नसतें तर हें काम माझ्या हातून झालें नसतें. त्यांच्या स्फूर्तिप्रद सहवासानें मला जें लाभलें आहे तो एक ठेवाच आहे. या सल्लागार-समितीचें ऋण हेंच माझें भूषण आहे.

जोशी-लोखंडे प्रकाशन आणि चिरंजीव ग्रंथ-प्रकाशन यांनीं आपली सर्व साधन-सामुग्री व कामाचें स्वातंत्र्य मला दिलें नसतें तर ही माला गुंफणें कठीण होतें. विशेषतः श्री. नानासाहेब जोशी यांनीं या कामीं घेतलेल्या श्रमांना सीमाच नाहीं. त्यांचा अनुभव, समतोल दृष्टिकोन आणि निर्विशेष ममता या कार्याचें खरें अधिष्ठान आहे. श्री. जोशी आणि श्री. लोखंडे यांनीं ही संधि देऊन मला उपकृत केलेलें आहे.

प्रतिभा मुद्रणालयांतील सर्व कामगार-बंधूंच्या आणि व्यवस्थापक-विभागाच्या अमोल सहकार्याबद्दल मी ऋणी आहें.

महाराष्ट्रांतील जनतेनें या मालांचें स्वागत करून उणीवा समजून घेऊन उत्तेजन द्यावें व या मालांचें उद्दिष्ट सफल होण्यास आशीर्वाद द्यावा ही प्रार्थना.

चंद्रकुमार डांगे

संपादक

---

# १

★

## काँग्रेसपूर्व शान्तिसहकार

'स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं.' प्लासीच्या लढाई-पासून आपले पाय भारतांत राज्यकर्ते म्हणून रोवतां रोवतां, रावबाजीची रवानगी ब्रह्मावर्तीला केल्यावर ब्रिटिशांना आपली राजवट लोकप्रिय करावी अशी साहजिकच इच्छा झाली. ब्रिटिशपूर्व राजवटींतील गडबड-गोंधळामुळें प्रत्येकजण वैतागला होता; पण नव्या परकीय सत्तेपुढें मान वाकवावयास हपापला होता, असें नाहीं. श्री. पण्णीकरांनीं 'आशिया व पाश्चात्त्य वर्चस्व' या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें 'भारतीय जिंकले गेले तरी जिरवले गेले नव्हते.'

त्यामुळेंच 'अठराशें सत्तावन' झालें. तेव्हांपासून भारतीयांची लष्करी वृत्तीच मारून टाकण्याचा व राज्यकारभाराच्या धोरण-धारणेपासून भारतीयांना दूर ठेवण्याचा प्रयत्न परकीय सत्ता दक्षतापूर्वक करीत होती. मुंबई–बंगालमधील वेस्टर्न-ईस्टर्न असोसिएशन व पुणें सार्वजनिक सभा यांच्यासारख्या संस्था त्या बेपर्वाईला तोंड देण्यासाठींच लोकांनीं स्थापन केल्या होत्या. ठगांचा बंदोबस्त, गुलाम-खरेदी-विक्री-बंदी, जमीनमहसुलाचा कायदा, शिक्षणप्रसार, न्यायदान अशा प्रकारें ब्रिटिश राजवट प्रजानुरंजन असें साधीत होती कीं, ती प्रभुप्रसादच वाटावी. त्यामुळेंच न्या. रानडे प्रभृतींचें असें मत पडत गेलें कीं, हिंदुस्थानवासीयांना आपलें कल्याण स्थायी स्वरूपांत करून घेणें असेल तर त्यांनीं ब्रिटिश राजवटीशीं सहकारानें वागत राहणें हेंच हिताचें ठरेल. वास्को–द–गामाचे पाय हिंदुस्थानला लागल्यापासून ब्रिटिश राजवटीची मिठी हिंदुस्थानवर पक्की बसल्यावर हिंदुस्थानच्या लोकांना झणझणीत अंजन मिळालें व बाहेरील अफाट जगाशीं आणि त्यांतील बहुविध संस्कृतीशीं हिंदुस्थानची फारकत होऊन राहिली होती याची पक्की जाणीव झाली. त्यामुळेंच १५ मे

१८४९ च्या ज्ञानोदयानें स्पष्ट केलें होतें कीं, 'इंग्रजी शिकलेले लोक ब्रिटिशांकडे प्रथम राजकीय हक्कांची मागणी करतील व शेवटीं ते हक्क ब्रिटिशांकडून हिसकावून घेतील.'

ही भविष्यवाणी लवकरच खरी ठरली. १८७४ त न्या. रानड्यांच्या जबाबदारीनें पुणें सार्वजनिक सभेच्यामार्फत जबाबदारीच्या स्वराज्याची मागणी ब्रिटिश सरकारकडे झाली. तशांत दुष्काळ लोकांचा अंत पहात असतां, १८७७ सालीं इंग्लंडच्या राणीला हिंदुस्थानची साम्राज्ञी म्हणून जाहीर करण्याचा दिल्ली-दरबार होतांच, लोकांच्या असंतोषाची आग अधिकच भडकली.

उमलत्या तरुण पिढीचे देशभक्त मुक्या पूजेचे चाहते नव्हते. त्यांतून स्वतंत्र विचारसरणीचें नवें कालचक्र निर्माण झालें. स्वाभिमानासाठीं व न्याय्य कर्तव्यासाठीं कमालीच्या स्वार्थत्यागाची तयारी हा त्या कालचक्राचा कस होता. या कसानें सार्वजनिक जीवनांत लो. टिळकांचा उदय झाला. निर्दोष कारभाराच्या सुराज्याबरोबर लोकांमध्यें जिव्हाळा उत्पन्न करणाऱ्या व स्वकीयांनीं चालविलेल्या स्वराज्याची आकांक्षा त्या नवोदित पुढाऱ्यांनीं धरली व जतनेंत रुजविली.

*काँग्रेसचा अवतार*

ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचें धोरण लोकमताच्या चावडीवर मांडण्याचा उद्योग ब्रिटिश पार्लमेंटांत १७७४ पासूनच बर्क, शेरिडन्, फॉक्स् प्रभृति करीत असत. यंत्रयुगाला आवश्यक असलेली व्यापारी दादागिरी इंग्लंडला हिंदुस्थानांत करतां येत असल्यामुळें दर वीस वर्षांनीं ईस्ट इंडिया कंपनीला सनद पुनरुज्जीवित करून मिळत गेली. तथापि प्लासीपासून शतकभर केलेली मुलूखगिरी, प्रजेवर झालेले अत्याचार, अनाचार, अन्याय अठराशें सत्तावनच्या स्फोटास कारण होऊन ईस्ट इंडिया कंपनीचा अस्त झाला. मग व्हिक्टोरिया राणीचें राज्य झालें तरी प्रजेचें दुःख चालूंच राहिलें! दुष्काळ, अफगाणयुद्ध, महागडा न्याय, मत, वर्तनस्वातंत्र्याचा अभाव इत्यादिकांमुळें राजकीय स्वातंत्र्याचा ज्वालामुखी धरणीकंप करील अशी भीति उत्पन्न झाली. १८८३ सालीं ए. ओ. ह्यूम यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना स्पष्टच लिहिलें कीं, 'माणसें असतात त्यांना केव्हां कसें वागावयाचें तें चांगलें कळतें. देशाभिमानानें आपलें वैयक्तिक श्रेष्ठत्व राष्ट्रसेवेसाठीं होमावयास तयार नसाल तर इंग्रज तुमचे राज्यकर्ते झालेत तें यथायोग्यच ठरेल!' त्याच वर्षी कलकत्त्याच्या राजकीय परिषदेंत सुरेंद्रनाथ बानर्जींनीं एक अखिल भारतीय संघटना सरकारला तोडीस तोड म्हणून हवी असल्याचें प्रतिपादिलें आणि

१८८५ च्या डिसेंबरमध्यें पुणें येथें एक अखिल भारतीय संघटना उभी करण्याचें ठरलें.

'अखिल भारतीय नवोत्थान' असेंच त्या संघटनेचें स्वरूप होतें. पुण्यास सुरू झालेल्या हाग-ओकीच्या आजारामुळें ती संघटना मुंबईस उभी राहिली. जाति, लिंग, प्रदेश आदीकरून भेदाभेदांनीं होणाऱ्या अन्यायांच्या परिमार्जनासाठीं, त्यांतूनच उत्पन्न करावयाच्या परस्पर जिव्हाळ्याच्या एकजिनसीपणासाठीं आणि ब्रिटिश अंमलाखालील विचारवन्त भारतीयांच्या सर्वसंमत अशा राष्ट्रीय आशाआकांक्षांच्या पूर्ततेसाठीं 'काँग्रेस' या नांवानें ती संघटना अवतरली. तिच्या त्या पहिल्याच अधिवेशनांत इंग्रजी राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठीं 'रॉयल कमिशन' मागण्याचा ठराव करण्यांत आला.

प्रारंभीं प्रारंभीं काँग्रेसला विश्वास होता कीं, ब्रिटिश मुत्सद्देगिरी काळाचीं पावलें ओळखून हिंदुस्थानचा कारभार हिंदी लोकांच्या प्रतिनिधींच्या मार्फत करण्याकरविण्याइतका शहाणपणा दाखवील. कारभारकुशलतेंतील दोष व त्यांची सुधारणा निदर्शनास आणण्यावर काँग्रेसनें त्या काळीं भर दिला. पण ब्रिटिश सरकार अधिकाधिक जुलमी होत गेलें व तितक्याच तीव्रपणें हिंदी लोकमत प्रगट व प्रभावी होऊं लागलें. लॉर्ड कर्झनची कारकीर्द ही सदर सत्याची पहिली चकमक ठरली. काँग्रेस ऊर्फ राष्ट्रसभेच्या नेत्यांत जो कायदेपंडितांचा नि सनदी मनोवृत्तीचा गट होता तो विदेशी राजकारणांतील स्वातंत्र्यसंपादनाचे रक्तविहीन क्रांतीचे मार्ग जनसामान्याला समजावून सांगत होता. भारताच्या पूर्वेइतिहासापासून जनतेंत स्फूर्ति निर्माण करून तिला उत्थापन देण्याचें कार्य काँग्रेसमधील जहाल राजकारणी गट करीत होता. पण देशाची निकोप स्वतंत्रता एकदम हवी असणारा व त्यापायीं शस्त्राचारासही न डगमगणारा असा एक तिसरा गट काँग्रेसमध्यें थोड्या प्रमाणांत होता. इंग्रजांनीं हें सर्व गणित आपल्या मनाशीं मांडून, 'दुही माजवा आणि राज्य करा' या भेदनीतीचा अवलंब केला. हिंदु-मुसलमानांचीं भांडणें झालीं. त्यांतील शकुनिमामा इंग्रज राज्यकर्ताच असल्याचें बिंग लो. टिळकांनीं बाहेर फोडलें. आपलीं बिंगें बाहेर फोडून लोकजागृति करणारे व लोकांना बरोबर घेऊन प्रचलित कायद्यानें दिलेल्या स्वातंत्र्याच्या अंतिम मर्यादेनें चळवळी करणारे टिळक नि त्यांचा पक्ष इंग्रजांस मग शत्रु वाटूं लागले. काँग्रेसच्या विनंतीरूप ठरावांकडे हिंदुस्थानांत इंग्रज दुर्लक्ष करतो म्हणून भारतीयांची दाद लोकशाहीच्या जननीभूत ब्रिटिश पार्लमेंटांत लावून घेण्याची खटपट करणारे ना. गोखले यांच्या मवाळपक्षावरहि ब्रिटिशांचा राग कमी नव्हता. मग तेजाबी तरुणांवर तो केवढा असेल! त्यातून विसाव्या शतकाच्या प्रारंभीं रशियावर जपाननें

मिळविलेल्या विजयानें भारतीय तरुणांत उत्साहाचें आणखी एक नवें वारेंच संचारविलें.

'स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण' ही चतुःसूत्री १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसनें मान्य केली. आदल्याच वर्षी लॉर्ड कर्झननें केलेल्या बंगालच्या फाळणीनें त्या चतुःसूत्रीचा अंगीकार हिंदुस्थानभर झाला. कर्झनच्या दडपशाहीमुळें सशस्त्र क्रांतिकारकांचा उदय-विकास काँग्रेसच्या बाहेर जोमानें झाला. जहाल राष्ट्रीयांच्या त्या उग्र व उग्रतर स्वरूपानें चिडलेलें ब्रिटिश सरकार उग्रतम बनलें. त्यानें 'फोडाझोडा'चें आपलें धोरण यशस्वी करून मुसलमानांकडून स्वतंत्र मुस्लीम-मतदारसंघांची मागणी करविली! गोखले-मेहताच्या नेमस्तपक्षाची त्यामुळें केविलवाणी स्थिति होऊन, सुरतेला काँग्रेस दुभंगली. त्यांतच १९०८ सालीं टिळकांना मंडालेस हद्दपारी झाल्यानें लोक-प्रक्षोभ भलताच झाला. त्यावर मलमपट्टी म्हणून १९०९ च्या मोर्लेमिंटो-सुधारणा ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानला दिल्या. पण त्यांनीं कोणाचेंच समाधान नव्हतें. नेमस्तांच्या हातांतील काँग्रेसनें ठराव केला कीं, 'ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य उपभोगणाऱ्या वसाहतीप्रमाणेंच हिंदुस्थानला स्वराज्य मिळावें.' असंतुष्ट जनता नेतृत्वाभावीं अकर्तृक होती, दडपशाहीनें दबलेली होती आणि काँग्रेसची नेमस्त मंडळी एकजिनसी राष्ट्रीयत्वाचा नंदादीप कसाबसा सांभाळून होती. हिंदुस्थानांतील अशा अर्धतपाच्या काळांत युरोपमध्यें जागतिक महायुद्धाचें वारे जर्मनीमार्फत तापत होते. १९०७ पासूनच भारतीय क्रांतिकारकांशीं गुफ्तगूं करणाऱ्या जर्मन कैसरचे होरे हेरून, युद्धकाळीं हिंदुस्थानांतून इंग्लंडला रंगरूट मिळावेत म्हणून ब्रिटिश राजवटीनें १९११ सालीं हिंदी लोकमताला चुचकारण्यासाठीं पंचम् जॉर्ज बादशहांच्या राज्यारोहण-निमित्तानें बंगालची फाळणी रद्द केली व दिल्लीला राजधानी केली. १९१४ च्या मध्यास लो. टिळक मंडालेहून सुटून आले; ऑगस्टमध्यें कैसरीकंदन ऊर्फ पहिलें जागतिक महायुद्ध सुरू झालें; इंग्रजांनीं हिंदुस्थानांत उभारावयाच्या रंगरूट-भरतीला भारत-संरक्षक सैन्य असें नामाभिधान केलें, तर 'इंग्लंडची अडचण तेंच हिंदुस्थानचें संधिसाधन' ही गर्जना करून लो. टिळकांनीं आपलें नवें आंदोलन आरंभिलें.

### काँग्रेसचें 'होमरूल' पर्व

पहिलें जागतिक महायुद्ध ऊर्फ कैसरीकंदन स्वयंनिर्णयाच्या तत्त्वासाठीं लढलें जात होतें. तें तत्त्व हिंदुस्थानला लागू करावें, असा टिळकांच्या आंदोलनाचा गाभा होता. तशी आशा वाटूं लागण्यासारखीच ती वेळ होती.

म्हणून 'भारतसंरक्षक सैन्यांत' भरती होऊन भारतसंरक्षक सैन्याच्या द्वारां लोकांनीं कोणत्या भारताचें रक्षण करावयाचें ? असा खडा सवाल टाकीत टाकीतच लोकमान्य रंगरूट-भरतीला उत्तेजन देत होते. १९१५-१६ सालीं आपल्या जहाल पक्षाची संघटना करून ते काँग्रेसमध्यें प्रभावी होऊं लागले आणि इंग्लंडमधील मजूरपक्षाच्या मदतीनें ब्रिटिश पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानसाठीं 'होमरूल-बिल' आणण्याच्या ते खटपटीला लागले. १९१६ सालीं लखनौस काँग्रेस-मुस्लीम-लीग-करार करून हिंदु-मुस्लीम-एकमतानें काँग्रेसद्वारां हिंदुस्थान-साठीं वसाहतीच्या स्वराज्याची मागणी लोकमान्यांनीं केली. हिंदूंबरोबर मुसलमान व सुशिक्षितांबरोबर अशिक्षित हिंदुस्थानवासीयांना स्वयंनिर्णयाचा हक्क प्रस्थापित करण्यास प्रवृत्त करणारी टिळकांची देशव्यापी होमरूल-चळवळ पाहून ब्रिटिश सरकार चिडलें. मग काय ? दडपशाही सुरू झाली. डॉ. ॲनी बेझंट, अरुंडेल प्रभृति स्थानबद्ध झाले. लोकमान्यांना संचारबंदी, भाषणबंदी झाली. त्या सर्वांच्या सुटकेसाठीं अखिल भारतीय काँग्रेस कमिटींत निःशस्त्र प्रतिकाराचाहि विचार झाला. तिकडे रशियांत झारशाही नष्ट झाली. तेव्हां १७ नोव्हेंबर १९१७ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटांत लॉर्ड मॉंटेग्यु यांनीं हिंदुस्थानासाठीं वासाहतिक स्वराज्याची घोषणा करून हप्त्याहप्त्यानें हिंदुस्थानला स्वायत्तता द्यावयाचें जाहीर केलें. त्यावर कलकत्ता येथें भरलेल्या काँग्रेसनें पूर्ण स्वराज्य मिळण्याची कालमर्यादा आंखून देण्याबद्दल आणि काँग्रेस-लीगकराराला मान्यता मिळण्याबद्दल मागणी केली. तथापि १९१८ मध्यें मॉंटेग्यु-सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक, निराशाजनक असल्याचें काँग्रेसला आढळलें आणि त्यांवर काँग्रेसनें तसाच शिक्का मारला. त्यामुळें शक्य तेथें तेथें सरकारशीं सहकार करणारा नेमस्त पक्ष काँग्रेसमधून कायमचा फुटला ! सरकारनेंहि भारतसंरक्षण-कायद्याखालीं तीन हजार बंगाली तरुण स्थानबद्ध केले व क्रांति-कारकांच्या सशस्त्र उठावास आणि जर्मन-मदतीनें हिंदुस्थान स्वतंत्र करण्याच्या 'गदर' वगैरे चळवळी नामोहरण करण्यासाठीं 'रौलट ॲक्ट' करण्याचें ठरविलें. हें सर्व हिंदी लोकांच्या जन्मसिद्ध हक्कांवर गदा घालणारें आहे, असें काँग्रेसनें सरकारला बजावलें.

'रौलट ॲक्टचा' निषेध सर्व देशभर झाला. महायुद्धाला मोठ्या प्रमाणांत सैनिक पुरविणाऱ्या पंजाबमध्यें ती चळवळ पसरूं द्यावयाची नाहीं म्हणून राज्यपाल ओडवायर यानें डॉ. किश्लू प्रभृति काँग्रेस पुढाऱ्यांना अज्ञात स्थळीं रवाना केलें !! लोक खवळले. शांतता प्रस्थापित करण्यासाठीं पंजाबांत निघालेल्या महात्मा गांधींना अटक करण्यांत आल्यावर अहमदाबादेस लोक-प्रक्षोभ अनावर झाला. १३ एप्रिल १९१९ रोजीं अमृतसर येथें जालियनवाला

बागेंत रौलट ॲक्टच्या निषेधासाठीं लोक जमले असतां जनरल डायरनें जें हत्याकांड केलें तें १९०६ सालीं बारीसालची परिषद् व सुरेंद्रनाथ बानर्जींची मिरवणूक पोलिसांनीं उधळली त्यापेक्षांहि भयंकर होतें. हिंदुस्थानांतील गंभीर परिस्थितीची जाणीव करून देऊन ब्रिटिश जनतेनें हिंदुस्थानला लोकशाही स्वराज्य द्यावें म्हणून काँग्रेसतर्फे टिळकांनीं जें होमरूल डेप्युटेशन अगोदरच इंग्लंडमध्यें नेलें होतें, त्याला अमृतसरच्या काँग्रेसनें पाठिंबा देऊन 'उजाडलें पण सूर्य कोठें आहे?' असें म्हणावयास लावणाऱ्या मॉंटेग्यु सुधारणा राबविण्याचें ठरविलें; पण डायरओडवायरनीं जालियनवाला बागेंत केलेल्या अत्याचाराबद्दल सेवानिवृत्तीशिवाय कसलेंहि प्रायश्चित्त ब्रिटिश राजवटीनें दिलें नाहीं, हें पाहून महात्मा गांधींसारखा शांतिसागरहि खवळला आणि त्यानें ब्रिटिश सरकारशीं असहकाराचा निर्णय घेऊन काँग्रेसद्वारां हिंदुस्थानला त्या मार्गें न्यावयाचें ठरविलें.

*असहकार–पर्व*

लोकमान्यांची स्वराज्य-चतुःसूत्री तपशीलवार कार्यक्रमानें आंखून महात्माजींनीं आपलें चैतन्ययुक्त आंदोलन उभारलें. हिंदुस्थान स्वाभिमानपूर्वक स्वावलंबी व शुद्धचरित व्हावा असा त्यांत कटाक्ष होता. १९२० च्या सप्टेंबर-मध्यें कलकत्त्याच्या खास अधिवेशनांत व नागपूर येथील डिसेंबरमधील अधिवेशनांत काँग्रेसनें महात्माजींच्या सर्व कार्यक्रमास उचलून धरलें. त्यामुळें बॅ. जिनांनीं व मुस्लीम लीगनें काँग्रेस सोडली. तथापि महात्माजींच्या चळवळींत सर्व थरांच्या लोकांनीं अहमहमिकेनें भाग घेतला. १९२१ सालीं इंग्लंडचे युवराज हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या आगमनावर कडकडीत बहिष्कार पडला! त्याबरोबर पं. मोतीलाल नेहरू, बॅ. दास प्रभृति काँग्रेस पुढाऱ्यांना अटक झाली, वीस हजार तरुण असहकारवादीहि बंदिवासी झाले आणि १३ मार्च १९२२ रोजीं महात्माजींना पकडून राजद्रोहाच्या आरोपाखालीं लोकमान्यांप्रमाणें सहा वर्षांची शिक्षा झाली!!

तेव्हां तुरुंगांतून सुटका होतांच, पं. मोतीलाल नेहरू प्रभृतींनीं १९२२ च्या गया-काँग्रेसनंतर दिल्लीच्या खास अधिवेशनांत काँग्रेसमध्येंच स्वराज्यपक्ष काढला. कायदेमंडळांत म्हणजे सरकारच्या बालेकिल्ल्यांतच असहकाराच्या शस्त्राचा प्रभाव दाखविण्यासाठीं काँग्रेसच्या संमतीनें त्यांनीं निवडणुका लढविल्या; मध्यवर्ती कायदेमंडळांतील बहुमताच्या जोरावर पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून स्वराज्यपक्षीयांनीं विठ्ठलभाई पटेल यांची योजना केली; आणि १९२४ मध्यें जबाबदारीच्या संपूर्ण स्वराज्याची योजना आंखण्यासाठीं प. गोलमेज परिषद बोलवावी म्हणून ठराव पास करून घेतला.

असहकाराचें आंदोलन खेड्यापाड्यांतील आम जनतेच्या जागृतीस एवढें कारण झालें कीं, निर्भेळ स्वातंत्र्याची चळवळ करणारा युवकसंघ उदय पावला. तो पुढारीपणानें चमकूं लागतांच माँटेग्यु सुधारणांच्या पुढें कोणतें पाऊल टाकतां येईल, हें पाहण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें सायमन-कमिशन नेमलें. त्यांत एकहि हिंदी गृहस्थ नसल्यानें राष्ट्रानें त्याच्यावर बहिष्कार घातला आणि त्या सालच्या म्हणजे १९२७ च्या मद्रास काँग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय घोषित केलें. तेव्हां भारतीय लोकपक्षांनीं एकमुखी मागणी केली तर त्या सनदशीर राजकीय सुधारणा तावडतोब मिळतील असें दिसल्यावरून १९२८ च्या मे महिन्यांत सर्वपक्षीय परिषद् भरवून तूर्त आणि ताबडतोब म्हणून वसाहतीच्या स्वराज्याचा आराखडा पं. मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वानें तयार करण्यांत आला. जनतेचें तें अंतिमोत्तर ३१ डिसेंबर १९२९ अखेर ब्रिटिश सरकारनें डावलल्यानें लाहोर-काँग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याच्या आंदोलनाची तयारी थाटली.

ता. २६ जानेवारी १९३० रोजीं हिंदुस्थानभर जनतेला प्रतिज्ञाबद्ध करण्यासाठीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा काँग्रेसतर्फे वाचण्यांत आला. इंग्रजांसुद्धां सर्व जगाला कळून चुकलें कीं, इतिहासाचा जमाना बदलला. महात्मा गांधींनीं अन्याय्य कायद्यांचा भंग आणि करबंदी करण्याचा निर्णय घेऊन १९३० मार्चमध्यें दांडी-मोर्चा काढला व मिठाचा कायदा तोडण्याचें ठरविलें. या धर्मयुद्धांत असंख्य तरुण व स्वातंत्र्यप्रेमी सामील झाले. सत्याग्रह्यांनीं तुरुंग भरले. पावसाळा सुरू होतांच जंगलसत्याग्रह झाला. इंग्रजांनीं रणांगणीं वापरावयाचीं शस्त्रें सत्याग्रह्यांविरुद्ध वापरलीं; लष्करी कायदा पुकारला; बेकायदेशीर जमाव केल्याबद्दल कांहीं जणांना इंग्रजांनीं फांशींहि दिलें आणि आपल्या सोज्ज्वलपणाच्या सिद्धतेसाठीं इंग्लंडमध्यें मंडलाकार परिषद् भरवून नव्या राजकीय सुधारणांचा घाट घातला. काँग्रेसप्रतिनिधीशिवाय ती परिषद् झाल्यानें डेन्मार्कच्या राजपुत्रावांचून हॅम्लेट असें तिला स्वरूप आलें.

तरी त्या मंडलाकार परिषदेंत मुस्लीम लीगच्या जिनांनीं आपल्या चौदा मागण्या मांडल्या होत्या व भारतांतील राजकीय जीवन तुंबल्यामुळें त्या सर्व प्रकाराला तोंड देणें अवघड होतें. म्हणून सप्रू-जयकरांनीं काँग्रेसचे गांधी व ब्रिटिश सरकारचे व्हाइसरॉय आर्विन यांच्यांत समझौता घडवून आणला. तोच गांधी-आयर्विन पॅक्ट म्हणून प्रसिद्ध आहे. तो झाल्यावर काँग्रेसचे एकमेव पुढारी म्हणून महात्माजी दुसऱ्या ( १९३१ च्या ) मंडलाकार परिषदेला गेले. तथापि जातीय प्रश्न व अस्पृश्य समाजाची प्रतिष्ठा यांना आपल्या फोडझोडीच्या धोरणानें इंग्रजांनीं फुलविलें व कारभारकुशलतेनें गांधी-आयर्विन करार मृताक्षर करून

सोडला. त्यांतून निर्माण होणाऱ्या दिव्याला तोंड देण्याची तयारी जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, मानवेंद्रनाथ रॉय वगैरे तरुण चालवीत होतेच.

सन १९३२ च्या प्रारंभींच त्या तरुणांना ब्रिटिश राजवटीनें बंदीखाना दाखवून १९३२ सालीं इंग्रजांनीं एक चळवळ हिंदुस्थानवर लोटली. हिंदुस्थानांत आल्यावर महात्माजींनाहि त्यांनीं तुरुंगवास घडविला. तेव्हां सरकारनें जप्त केलेल्या संस्था सुरू करण्याचा वा ताब्यांत घेण्याचा प्रयत्न तरुणांनीं केला. मग काय, दडपशाहीचा कहरच उसळला.

दरम्यान तिसरी मंडलाकार परिषद् संपली व १७ ऑगस्ट १९३२ रोजीं इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनीं जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्य वर्गाला हिंदु समाजांतून फोडलें. तेव्हां २० सप्टेंबरपासून महात्माजींनीं प्राणांतिक उपोषण सुरू केलें. तेव्हां डॉ. आंबेडकर-महात्माजींचीं बोलणीं होऊन स्वाभिमानपूर्वक हिंदु घटक म्हणून अस्पृश्य जनाला नांदण्याची व्यवस्था झाली. त्या पुर्णे-कराराचा संबंध राजकारणाशीं नसल्यामुळें ब्रिटिश सरकारनेंहि त्यास मान्यता दिली. राजकीय दृष्टयाहि त्यांत संतोष मानून बेकायदा ठरलेल्या काँग्रेसचें अधिवेशन ३१ मार्च १९३३ रोजीं कलकत्त्यास भरून लोकांचें स्वातंत्र्यप्रेम व स्वार्थत्यागाची तयारी प्रगट झालीच. तथापि एकंदरीनें सार्वजनिक जीवन वाहतें करावयास १९३३ च्या मध्यानंतर भारतीय देशभक्त आतुर होऊं लागले व मंडलाकार परिषदांच्या मंथनांतून ब्रिटिश सरकार हिंदुस्थानला देणार असलेल्या राजकीय सुधारणांच्या झोकांतच राष्ट्र इंग्रजांच्या पाठीमागें नसून स्वराज्यार्थ चळवळ करणारांच्याच मागें आहे, हें सिद्ध करण्याची ते आकांक्षा बाळगीत होते. जुलै १९३४ च्या पुर्णे येथील अखिल भारतीय कांग्रेस कमिटींत ‘ संसदीय मनोवृत्तीनें मूळ धरल्याचें ’ महात्माजींच्याहि निदर्शनास आलें. त्या सालीं झालेल्या पोटनिवडणुकांनीं काँग्रेसचा आत्मविश्वास दुणावला व लोकपक्षातर्फे कायदेमंडळें फिरून गाजूं लागलीं.

आणि १९३५ च्या डिसेंबरमध्यें झालेला काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर केवढ्या तरी उत्साहानें पार पडला. राजकीय सत्ता हातीं येईल तर ती कारभारकुशलतेनें राष्ट्रसेवेसाठींच वापरावयाची व १९३१ च्या कराची काँग्रेसने जो भारतीय नागरिक हक्काचा ठराव केला होता त्याची सेवाव्रतानें अंमलबजावणी करावयाची, हें सर्व राष्ट्रनिष्ठ चळवळीचें होकायंत्र त्या सुवर्णमहोत्सवांत प्रकट झालें.

• • •

# २

*

## राज्य इंग्रजांचें, कारभार काँग्रेसचा

काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवाच्या पूर्वींच सरासरी साडेचार महिने म्हणजे दिनांक २ ऑगस्ट १९३५ रोजीं हिंदुस्थानला "राज्यकारभारांत अधिक हक्क देणारा" कायदा ब्रिटिश पार्लमेंटांत पास झाला होता. सायमन-कमिशन व तीनहि मंडलाकार—परिषदा यांच्या आढळावरून मार्च १९३३ सालींच पार्लमेंटनें एक श्वेतपत्रिका तयार केली. होती. तीमधील सूचना पार्लमेंटपुढें विधेयकरूपानें मांडण्यापूर्वी त्यांची छाननी एक पार्लमेंटरी समिति नेमून करावी म्हणून तिच्याशीं सहकार्य करण्यासाठीं कांहीं हिंदी सभासदांचीहि नेमणूक झाली होती. या सर्वांनीं तारीख २२-११-१९३४ रोजीं आपला निर्णय जाहीर केला. याच सालच्या मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकींत काँग्रेसनें भाग घेऊन अनेक जागीं विजय मिळविला होता. त्यामुळें पार्लमेंटरी समितीनें आपल्या आढळानुसार हिंदुस्थानास द्यावयाच्या राजकीय सुधारणांबद्दल जो निर्णय जाहीर केला होता, त्याबद्दल नापसंतीचा ठराव मध्यवर्ती (दिल्ली) असेंब्लींत पास करून काँग्रेसनें आपला नवा पवित्रा टाकला. तरीहि '१९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट' ब्रिटिश पार्लमेंटनें बऱ्याच चर्चेनंतर पास केलाच. या कायद्यानें,

अ — भारतमंत्र्यांचें इंडिया कौन्सिल रद्द करण्यांत यावें व भारतमंत्र्यांच्या मदतीकरिता एक सल्लागार-मंडळ असावें. आ— मध्यवर्ती सरकारमध्यें दिल्लीस ब्रिटिशशासित मुलूख व संस्थानें यांच्याकरितां संघराज्य-पद्धति (फेडरल) सुरू करण्यांत यावी. इ— दिल्लीच्या मध्यवर्ती सरकारांत दोन (आमदार-खासदारांचीं अशीं) कायदेमंडळें असावींत. ई —

दिल्लीच्या मध्यवर्ती कारभारांत सोपीव व राखीव खात्यांची द्विदल राज्यपद्धति चालावी. उ— सर-राज्यपालांस ( गव्हर्नर जनरल ) सनदी नोकरांचे हक्क, व्यापार व हिंदी आर्थिक स्थिति यांचें संरक्षण, अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाची दक्षता वगैरे बाबतींत हुकमती अधिकार असावेत. ऊ— प्रांताप्रांतांत स्वायत्तता सुरू करून, कायदा–सुव्यवस्था आणि पोलीस यांच्याबाबत राज्य-पालांना हुकमती अधिकार आणि मध्यप्रांताशिवाय इतरत्र वरिष्ठ–कनिष्ठ कायदे–मंडळें असावींत. ऋ— ब्रह्मदेश व एडन हिंदुस्थानपासून अलग करावेत; आणि ॠ - ओरिसा व सिंध हे दोन नवीन प्रांत करावेत.

असें ठरलें. मतदानाचा हक्क लोकसंख्येच्या १४% व युवक प्रौढांच्या २७% लोकांना मिळाला. संस्थानिक घेऊन मध्यवर्ती सत्ता संघराज्याची असली तरी ज्या द्विदलपद्धतीचा बोजवारा प्रांतिक कारभारांत झाला होता, तोच मध्यवर्ती कारभारांत पुन्हां स्वीकारल्यानें संघराज्याची मध्यवर्ती सत्ता लेचीपेचीच ठरणार होती, म्हणून सदर सुधारणा काँग्रेसला पसंत पडल्या नाहींत.

१९३६ च्या ऑगस्टमध्यें काँग्रेसनें आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. राष्ट्रीय पुनर्घटना करण्यासाठीं ब्रिटिश नियंत्रण जाऊन संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे; ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं सुरू केलेल्या कोणत्याहि लढाईत भाग घ्यावयाचा नाहीं; नवीन घटनेशीं लढून ती मोडण्यासाठीं काँग्रेसच्या प्रतिनिधींनीं कायदेमंडळांत जावयाचें; लोकांची शक्ति वाढवून स्वातंत्र्याला पोषक असें वातावरण निर्माण करण्यासाठीं कायदेमंडळांत व कायदेमंडळाबाहेर झटावयाचें; असें जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. त्या सालीं काँग्रेसचे सभासद पाऊण लाख होते ते पन्नास लाख झाले. या सालापासून काँग्रेसनें आपलीं अधिवेशनें खेड्यांतून भरविण्यास सुरवात केली. महाराष्ट्राच्या फैजपूर या खेड्यांत तो उपक्रम यशस्वीपणें तरारला. सहा लाखांवर खेडीं असलेल्या हिंदुस्थानच्या काँग्रेसनें आपलीं अधिवेशनें खेड्यांत सुरू करण्यांत जनतासंपर्क, लोकशिक्षण आणि सुधारणूक नि शिस्तीचें प्रात्यक्षिक हा हेतु होता. फैजपुरास हे सर्व उद्देश सफल करणाऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू होते. काँग्रेसनें नव्या राजकीय सुधारणांवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें होतें. त्या अपुऱ्या, असमाधानकारक, अपमानकारक आणि म्हणून धिक्कारण्यास पात्र अशा काँग्रेसनें ठरविल्या आणि नवी घटना मोडण्याचा निर्धार करण्यांत आला.

तारीख १ एप्रिल १९३६ च्या सुधारणाकायद्यानुसार प्रांतिक कायदे-मंडळाच्या नव्या निवडणुकी १९३७ च्या फेब्रुवारींत होऊन १ एप्रिलपासून

त्या कायद्याचा प्रत्यक्ष अंमल प्रांतिक राज्यकारभारांत सुरू झाला. मध्यवर्ती सरकारचें स्वरूप पूर्वीसारखेंच ठेवण्यांत आलें. प्रांताप्रांतांतून स्वायत्ततेचा अंमल सुरू झाल्यापासून देशांत नवीनच वारें वाहूं लागलें. कॉंग्रेसनें कौन्सिल-प्रवेश मान्य केला होता; त्यामुळें निवडणुका लढविल्या होत्या आणि पंजाब, सिंध, बंगाल, आसाम, वायव्य–सरहद्द याशिवाय हिंदुस्थानच्या अकरापैकीं आठ प्रांतांत बहुमत मिळविलें होतें. अर्थातच कॉंग्रेसपक्षाला मंत्रिमंडळें बनविण्या-बद्दल पाचारण करण्यांत आलें. तथापि राज्यपालांनीं आपला ( व्हेटो ) हुकमती अधिकार वापरण्याच्या मुद्दयावर एवढे मतभेद झाले कीं, तो अधिकार सुलतानी वृत्तीनें वापरण्यांत आला, तर प्रांतिक स्वायत्तता हें एक टोपणनांव ठरतें, असें वातावरण निर्माण झालें. त्यामुळें तीन-एक महिने प्रांतोप्रांतीं अल्पसंख्याकांचीं हंगामी मंत्रिमंडळें काम करूं लागलीं. त्या प्रांतिक स्वायत्ततेंतील कांहीं मुंबई-सारख्या हंगामी मंत्रिमंडळांनीं सावरकरांवरील बंधनें काढून घेण्यासारखीं विधायक व चिरपरिणामी अशीं थोडीफार कामगिरीहि केली, नाहीं असें नाहीं. पण लोकमताचा पाठिंबा घेऊन निवडून आलेल्या बहुमतधारी पक्षाला कारभारावेगळें ठेवणें हें लोकशाहीच्या मूळ तत्त्वप्रणालीलाच बाधक असल्यामुळें परकीय राज्यकर्त्यांबद्दल भारतीयांत घृणा आणि जगांत कमीपणा निर्माण होऊं लागला. तेव्हां फिरून एकदां बहुमतधारी कॉंग्रेसपक्षाच्या धुरीणांशीं राज्य-पालांचीं बोलणीं होऊन अगदीं अपरिहार्यच होईल तेव्हांच तेवढा राज्य-पालांनीं हुकमती ( व्हेटो ) अधिकार वापरावयाचें आश्वासन मिळाल्यावर तारीख ७ जुलै १९३७ रोजीं कॉंग्रेसनें आठ प्रांतांत आपलीं मंत्रि-मंडळें बनविलीं.

लोकमान्य-पुण्यतिथीच्या मुहूर्तावर कॉंग्रेसपक्षानें अधिकार–स्वीकार केला. संसदीय मनोवृत्तीनें काम करतांना १९३१ सालीं कराची–कॉंग्रेसनें जी आंखणी केली होती तीच कॉंग्रेस-मंत्रि-मंडळाच्या डोळ्यांपुढें होती. लुबाडल्या गेलेल्या बहुजन समाजाचें आर्थिक स्वातंत्र्य समाविष्ट असल्यांशिवाय हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्यांत कांहीं स्वारस्य नाहीं; मतस्वातंत्र्य व वास्तुस्वातंत्र्य, धर्म-स्वातंत्र्य आणि विवेक-स्वातंत्र्य यांचाहि समावेश राजकीय स्वातंत्र्यांत समरस झालेला असला पाहिजे; औद्योगिक क्षेत्रांतील मजूरवर्गाला कामाच्या निकोप शर्ती, वांध्यांचा निकाल लावून घेण्याचें सुलभ उपाय, वृद्धापकाळाची तरतूद वगैरे गोष्टींबद्दल साक्षात् हमी मिळाली पाहिजे; शेतकऱ्यांची शेती त्यांना व राष्ट्राला आंतबट्ट्याचा व्यवसाय होऊं नये; परराष्ट्रीय मालाची वगळणूक आणि स्वदेशांतील अभिजात मालाचा वापर व्हावा; मादक द्रव्यांच्या सेवनाचें उच्चाटन समाजांतून करण्याची आवश्यकता आहेच आहे; असा हा ठोकळ-

मानानें कार्यक्रम काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारभार–कुशलतेसाठीं होताच. त्यामुळें सर्वच प्रांतांतून राष्ट्रीय पुनर्घटनेसाठीं समित्यांची गर्दीच गर्दी उसळली. शेतकरी–कर्जनिवारण, दारूबंदी, सावकारी नियंत्रण, औद्योगिक शिक्षण, अक्षर–मित्रता–प्रसार, पंचवर्षीय आर्थिक योजना असे अनेक विषय प्रान्तिक सरकारचें लक्ष वेधीत होते. या योगानें देशांतील लोकांच्या विधायक व आस्थेवाईक कर्तृत्वाची साक्ष सुधारलेल्या जगास नव्यानेंच पाहावयास मिळूं लागली.

कारभारी खात्यांमार्फत लोकोपयोगाच्या सेवाकार्यांना हातीं घेण्यांत आलें; सेनापति बापट प्रभृति जे कोणी राजकीय कडवे चळवळे इंग्रजांच्या अवकृपेनें बंदीखान्यांत पडले होते, त्यांना मुक्त करण्यांत आलें; मानवेन्द्र रॉय सारख्यांना नव्या समाजरचनेच्या प्रचाराला मुक्तद्वार मिळालें आणि मध्यवर्ती सरकारांत अखिल भारतीय संघीय ( फेडरल ) घटना अमलांत येण्यासाठीं संस्थानिकांशीं विचारविनिमय सुरू झाला. पण काँग्रेसच्या आणि देशाच्या अहित-चिंतकांना तें कोठें पाहवलें ? त्यांनीं अडथळे, अडचणी, हेवेदावे आणि दंगेधोपे निर्माण करण्यास कमी केलें नाहीं.

या सर्व घडामोडींचा परिणाम प्रत्यक्ष ब्रिटिशशासित, काँग्रेसकारभारा-खालील आणि संस्थानिकांच्या अमलाखालील प्रजेवरहि होत होता. १९२० च्या माँटफोर्ड सुधारणांच्या अरुणोदयापासून म्हणजे होमरूल-चळवळीच्या ऐन भरापासून संस्थानी प्रजेस आपल्याहि मुलखांत लोकशाही असावी अशी जी तहान लागली होती, तिची परिणति होऊन संस्थानी प्रजेनें काँग्रेसच्या आंदोलनांत सहकार देतां देतां चांगलीच राष्ट्रीय जागरूकता दाखविली होती. त्या दर्शनापासून संस्थानिकांनीं दाखविणें आवश्यक होतें तो दूरदर्शीपणा, औंध संस्थानचे पंतप्रतिनिधी यांनीं सर्व हिंदुस्थानांत प्रथम दाखविला व तारीख २१–१–१९३९ रोजीं महात्माजींच्या सल्ल्यानें ग्रामराज्य सुरू केलें. इतरहि संस्थानांतून मग लोकशाही राज्यकारभाराचीं पावलें पडत चाललीं. त्याच वेळीं मुसलमनांना व अल्पसंख्याकांना काँग्रेस मोजत नाहीं असा मुस्लीम लीगनें आरोप केला पण तो सर्वस्वी खोटा होता. तथापि कैसरी कंदनानंतर म्हणजे १९१४–१८ च्या पहिल्या जागतिक महायुद्धानंतर ज्या नवनव्या राजकीय व सामाजिक क्रांतीच्या विचारसरणींनीं जगभर आपला प्रभाव मांडला होता, त्यांनीं भारतीय तरुणांच्या मनावरहि पगडा बसविला होता. त्यांना आपल्या विचारक्रांतीच्या आचाराला मिळावा तसा वाव मिळण्यास संधि कशी मिळणार याची चिंता होती.

काँग्रेस-मंत्रिमंडळाच्या दोन वर्षांतील कारभारानें अगर स्वतः काँग्रेससंस्थेच्या

साचेबंद चळवळींनीं ती चिंता दूर होण्याची खात्री तरुण विवेकवाद्यांना वाटेना, तेव्हां त्यांनीं मॅझिनीचा 'निश्चित मतानें क्रांतिशूर होण्याचा मार्ग' पत्करला. प्रारंभापासूनच सुभाषचंद्र बोसांचा प्रयत्न प्रभावी होऊं लागला होता. १९३२ सालीं दहशतवादी लोकांशीं संबंधित म्हणून सरकारनें त्यांना बंदी केलें होतें. १९३३ मध्यें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांना युरोपमध्यें जाऊंहि दिलें होतें. तेथेंच बहुजन-क्रांतीचा आराखडा आंखून १९३६ मध्यें ते हिंदुस्थानांत परत आल्याचा सरकारला वास असल्यामुळें त्यांना अटक होऊन येरवडा येथें आणि नंतर दार्जिलिंगजवळील कुरसेऑंग येथें त्यांच्या बंधूंच्या घरीं स्थानबद्ध करण्यांत आलें होतें. त्यांची त्याहि बंधनांतून सुटका १९३७ सालीं झाली होती. १९३६–३७ या दोन वर्षांत ओळीनें पं. जवाहरलाल नेहरू कॉंग्रेसचे अध्यक्ष होऊनहि कॉंग्रेसला कृतिसंस्थेचें स्वरूप येत नाहीं असें पाहून तरुणांनीं १९३८ च्या कॉंग्रेससाठीं देशगौरव सुभाषचंद्र बोस यांना म. गांधींचा आशीर्वाद घेतलेले डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांचा पराभव करून अध्यक्ष निवडून दिलें. दे. सुभाषचन्द्रांनीं 'फॉरवर्ड ब्लॉक' असा मग कॉंग्रेसच्या अंतर्गतच दुसरा गट स्थापन केला. तो कॉंग्रेसमध्यें व देशांत प्रभावी करण्याच्या उद्योगास सुभाषबाबू जोरानें लागले.

आणि एवढ्यांतच दुसऱ्या जागतिक महायुद्धाची घंटा वाजूं लागली ! जगांतील चतुरांना कैसरी कंदनाच्या शेवटच्या ताटकळींतच नव्या जागतिक महायुद्धाचा पुनर्जन्म स्पष्ट दिसत होता. लो. टिळकांनीं अमेरिकेच्या प्रेसिडेंट विल्सन यांना पत्र पाठविलें होतें, त्यावरून हिंदुस्थानांतहि तशा विचारप्रवाहाला जागा होत होती, हें स्पष्ट आहे. ज्या व्हर्सायच्या तहानें कैसरी-कंदनाची समाप्ति झाली होती, तो तहच एवढा आडदांड व आडमुठा होता कीं त्यानें जगांत कोणाचेंच समाधान झालें नव्हतें ! अमेरिकेच्या वजनदारीमुळें कैसरीकंदन शेवटास आलें होतें आणि अमेरिकेचे प्रेसिडेंट विड्रो विल्सन यांच्याच ठरावानें राष्ट्रसंघाची निर्मिति झाली होती. पण त्या राष्ट्रसंघांत स्वतः अमेरिका कोठें होती ? जें कार्य राष्ट्रसंघानें मुख्यतः करावयाचें होतें, तें आंतरराष्ट्रीय कलह-शमनाचें कार्य राष्ट्रसंघाला मुळींच साधलें नाहीं. मन मानेल तसें प्रत्येक राष्ट्र वागत राहिलें होतें. जर्मनीला कैचींत धरण्याचे प्रयत्न असे झाले कीं जर्मनीच्या सर्व राष्ट्रीय शक्ती प्रतिकारासाठीं एकवटल्या. नव्या जागतिक युद्धाची तयारी चारी बाजूंनीं सुरू झाली. कारण जर्मनीच्या तथाकथित लोकशाहीमधून अरेराव राष्ट्रनेते निर्माण झाले होते.

भारतांतहि पंजाबच्या हत्याकांडापासून जे भारतीय नेते समजून चुकले होते कीं, स्वतंत्र संघटना उभारून, अंतर्गत शक्ति विकसवून परकीय सत्तेशीं

असहकार आणि असहकार करण्यांतच भारताला आपलें ध्येय साध्य करतां येईल, ते युरोपमध्यें गर्दी करूं लागलेले युद्धाचे ढग सगळ्यांच्या अगोदर हेरून बसले होते. त्यामुळेंच युद्धासंबंधीं काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनांतून उघड उघड खल होत असे. कारण कांहीं वर्षांपासून चीन-जपानची झडून राहिलीच होती. त्यामुळें आशियांत हाहाकार माजलाच होता. १९३८ च्या त्रिपुरी-काँग्रेसच्या अगोदरपासून सुभाषचंद्रांच्या विचारसरणीच्या तरुण देशभक्तांच्या मनांत युद्धकालीं भारतानें जें तेज दाखवावें असें होतें, तें अधिकृत काँग्रेस-यंत्रणेकडून घडावयाचें नाहीं, असें त्यांना वाटत होतें. म्हणून त्यांनीं 'फॉरवर्ड ब्लॉक' सुरू केला होता. परकीय सत्तेशीं कसलीहि तडजोड वा सहकारवृत्ति या गटाला मान्य नसून त्याला प्रत्यक्ष प्रतिकाराचा कार्यक्रम आंखावयाचा होता. ब्रिटिश कॉमनवेल्थशीं कसलाहि संबंध सुतराम् न राखतां समाजवादी राज्यप्रणाली ( Socialist State ) भारतांत सुरू करणें हें त्यांचें ध्येय होतें. अशा मताचे अध्यक्षांशीं मिळतें घेणें कठीण म्हणून तारीख २ फेब्रुवारी १९३९ रोजीं काँग्रेस-कार्यकारिणीच्या १५ पैकीं १२ सभासदांनीं राजिनामे दिले. पं. नेहरूंनीं सुभाषचंद्रावर १९३८ पासून चालविलेल्या धोरणाबद्दल हल्ला केला. तेव्हां, १९३८ मध्यें मध्यप्रांतांतील पंतप्रधान डॉ. खरे यांना आपलें स्थान सोडावें लागलें होतें. तो प्रसंग लक्षांत घेऊन २९ एप्रिल १९३९ रोजीं सुभाषबाबूंनींच काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजिनामा दिला. अखेर ता. १ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनीनें पोलंडवर स्वारी केली आणि जागतिक शांततेचा भंग झाला व दुसरें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां काँग्रेसला आपल्या अंतर्गत सर्व मतप्रणालीसह इतर पक्षांप्रमाणेंच आपलें धोरण मुक्रर करणें प्राप्त झालें.

● ● ●

३

★

## साम्राज्याच्या गरजा, येती भारताच्या काजा

दुसऱ्या जागतिक महायुद्धांत इंग्लंड पडलें, तें आपल्या साम्राज्यप्रतिष्ठे करितांच पडलें. पहिलें जागतिक महायुद्ध स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाकरितां लढलें गेलें असतां आणि १९२७ सालापासून हिन्दुस्थाननें संपूर्ण स्वातंत्र्य हें आपलें ध्येय जाहीर केलेलें इंग्लंडला माहिती असतां, एवढेंच नव्हें तर १९३७ सालीं अधिकार-स्वीकार प्रान्तानिहाय करतांना हुकमती अधिकार राज्यपालांनीं वापरण्याबद्दल समझोता केल्याची ताजी आठवण असतांना, साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक मानून चाललें तरी, त्याला न विचारतांच आपल्याबरोबर इंग्लंडनें हिन्दुस्थानासहि युद्धमान राष्ट्र म्हणून जाहीर केलें. ही काँग्रेसनें दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळास दिलेली तुच्छतेच्या वागणुकीची रीत मानली. या वस्तुस्थितीचा निषेध म्हणून आणि युद्धोत्तर तरी हिन्दुस्थान स्वतंत्र राष्ट्र होईल, असा आशावादहि इंग्लंडनें आपल्या आश्वासनानें वा अन्यथा निर्माण केलेला नसल्याकारणानें, काँग्रेसनें प्रान्तोप्रान्तींचा नोव्हेंबर १९३९ पासून अधिकार-संन्यास केला आणि युद्ध-प्रयत्नापासून अलिप्त रहावयाचें ठरविलें.

इंग्लंडलाहि युद्ध हवेंच होतें असें नाहीं. इंग्लंडचा तत्कालीन मुख्यमंत्री चेंबरलेन यानें तें युद्ध टाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण यश आलें नाहीं. अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून इंग्लंड युद्धमान राष्ट्र झालें आणि त्यानें हिन्दु-स्थानास युद्धांत ओढलें. १९३९ च्या ऑगस्टमध्यें सिंगापूरला व इजिप्तला हिंदी सैन्य पाठविल्याबद्दल वर्ध्याच्या वर्किंग कमिटींत काँग्रेसनें विरोधाचा ठराव केला. तेव्हां काँग्रेसनें वरीलप्रमाणें धोरण स्वीकारलें व देशगौरवांचा (सुभाषचंद्र बोसांचा) 'फॉरवर्ड ब्लॉक' तर सरकारशीं कसल्याच सहकाराचें नांव काढण्यास तयार नव्हता. काँग्रेसनें आपले सर्वाधिकार महात्मा गांधींकडे सुपूर्त केले. ब्रिटिशांनीं युद्धहेतु

जाहीर करावेत म्हणून महात्माजींनीं मागणी केली. पारतंत्र्यांत असलेले देश स्वतंत्र व्हावेत व त्यांत हिन्दुस्थानला स्थान मिळावें, अशी पं. जवाहरलाल नेहरूंची अपेक्षा होती. त्यापैकीं कशालाच साद मिळाली नव्हती. काँग्रेसमंत्रि-मंडळाचे राजिनामे आठ प्रान्तांत झाल्यावर फक्त चार प्रांतांत मुस्लीम मंत्रिमंडळाची राजवट चालू होती. तरी सर्व हिन्दुस्थानचा राज्यकारभार 'त्र्याण्णव कलमी राज्यकारभारच' ( १९३५ च्या सुधारणा कायद्यांत तरतूद केल्याप्रमाणें ) होता. काँग्रेसच्या राजवटींतून देश मुक्त झाल्याबद्दल २२ डिसेंबर १९३९ हा बॅ. जिनांनीं मुस्लिमांकडून 'मुक्तिदिन' पाळविला.

मानवेंद्रनाथ रॉय प्रभृतींचें मत फॅसिस्टविरोधी म्हणजे जर्मनगटाविरुद्ध असलेल्या इंग्लंडप्रभृति राष्ट्रांना हिन्दुस्थाननें युद्धसाहाय्य करून लोकशाही सांप्रदायास जगांत विकासासाठीं वाव करून द्यावा असें स्पष्ट होतें. हिन्दुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं देशांतील अनेक पुढाऱ्यांच्या भेटीगांठी घेऊन असें जाहीर केलें कीं, वसाहतींचें स्वराज्य हेंच हिन्दी राज्यघटनेचें ध्येय आहे व तें युद्धोत्तर शक्य तितक्या लौकर अमलांत आणूं; तूर्त व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत कांहीं हिन्दी लोकांचा प्रवेश होईल. पण अशा ढोबळ व पोकळ आश्वासनाला आश्वासन मानावयासच कोणी तयार नव्हतें. अशा स्थितींत महात्मा गांधींनीं युद्ध-विरोधी भाषणस्वातंत्र्याचा आपल्याला अधिकार मिळावा असें सरकारला सुचविलें. सरकारचे वा सरकार-सहकाऱ्यांचे युद्ध-प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं म्हणून नव्हें; पण 'शान्ति हवी असेल तर युद्धाची सज्जता ठेवा' या उद्घोषाचे तीन-तेरा कैसरी कंदनानंतर केव्हांच वाजले होते म्हणून 'शान्ति हवी असेल तर शान्तिनिर्मितीचीच सज्जता ठेवा' या युग-घोषणेला इंग्रज सरकार वर्तनान्तरित करीत नाहीं, तें हिन्दुस्थाननेंच करावयास हवें, म्हणून आपल्या सांस्कृतिक इतिहासाची परंपरा राखण्यासाठीं काँग्रेसच्या सर्वाधिकारी गांधींनीं वरील तऱ्हेची सूचना केली. व्यवहार-चतुर आणि इंग्लंडचें धोरण सांभाळून वागणारे व्हॉइसरॉय ती सूचना कशी मानणार? त्यांनीं युद्धविरोधी प्रचार होऊं नये म्हणून वटहुकूम काढला व पुढें त्यासच 'भारत-संरक्षण-कायद्याचें' स्वरूप दिलें. मग काय? महात्माजींनीं आपल्या सूचनेचें सामाजिक रूपांतर करून संमतिविना हिन्दुस्थानला इंग्रजानें युद्धमान म्हणून जाहीर केलें, त्याच्या निषेधार्थ वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. महात्माजी सम्मति देतील त्या व्यक्तींनींच मर्यादेनें युद्ध-विरोधी घोषणा व प्रचार करावयाचा असें त्याचें स्वरूप होतें. विनोबाजी भावे यांच्यापासून सुरवात होऊन हजारों काँग्रेसजन त्या चळवळीमध्यें सामील झाले व परिणामतः बन्दी झाले. पंचवीस हजार तरी हे वैयक्तिक सत्याग्रही होते.

१९४० च्या एप्रिलमध्यें मौलाना अबुलकलम आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं रामगड येथें काँग्रेसचें अधिवेशन झालें होतें. हिटलरी होरपळ ऊर्फ दुसरें जागतिक महायुद्ध सुरूं झाल्यानंतरचें हें अधिवेशन होतें. म्हणून अर्थातच त्याच्याकडे सर्व जगाचें लक्ष होतें. या अधिवेशनांत एकच एक ठराव झाला. ' संपूर्ण स्वातंत्र्याच्यापेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें कमी असलेली राजकीय सुधारणा हिन्दुस्थानच्या लोकांना परवडणारी नाहीं. साम्राज्यशाहीच्या चक्रांत अगर वासाहतिक स्वराज्याच्या कक्षेंत हिन्दुस्थानचें स्वातंत्र्य समाविष्ट होऊंच शकत नाहीं. हिन्दुस्थानांतील जातीय तंट्यांचा निर्णय फक्त हिन्दी लोकांच्या घटनापरिषदेंतच होऊं शकेल तेव्हां ती भरवावी. ' अशा अर्थाचा तो स्पष्ट ठराव होता. या ठरावानुसारच आतां पुढचीं पावलें काँग्रेस टाकणार, हें स्पष्टच होतें.

तेव्हां तारीख ८ ऑगस्ट १९४० रोजीं व्हाईसरॉयनीं एक घोषणा करून युद्धानंतर शक्यतितक्या लौकर हिंदुस्थानास वसाहतीचें स्वराज्य देण्याचें घोषित केलें व आपलें कारभारीमंडळ अधिक विस्तृत करून त्यांत विस्तृत प्रमाणावर हिन्दी लोकांना घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें १९४१ मध्यें लोकनायक अणे, सर अकबर हैदरी, सर सुलतान अहमद, सर होमी मोदी, सर नलिनीरंजन सरकार, डॉ. राघवेन्द्रराव, सर फिरोजखान नून वगैरेंची नेमणूक झाली. याच वेळीं इंग्लंडचे मुख्य-प्रधान व युद्धमंत्री विन्स्टन चर्चिल व अमेरिकेचे प्रेसिडेन्ट रूझवेल्ट यांची अटलांटिक महासागरावर भेट होऊन युद्धोत्तर सर्व युरोपियन राष्ट्रांस स्वातंत्र्य मिळेल अशी घोषणा झाली.

कारण युरोपमध्यें युद्धाचें गांभीर्य १९४० च्या मध्यापासून उग्र स्वरूप धारण करीत होतें. त्या सालच्या जूनअखेर जर्मनीनें पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, लक्झेंबर्ग, हॉलंड, बेल्जम व फ्रान्स हीं राष्ट्रें पराभूत व पादाक्रांत केलीं होतीं. रशियानेंहि संधि साधून लिथुआनिया, लटेव्हिया, इस्थोनिया या देशांवर अंमल बसविला होता आणि फिन्लंडचा पराभव केला होता. इटालीनें जर्मनीच्या विजयानें मोहून त्याच्या बाजूनें युद्धांत उडी घेतली होती. १९४१ च्या मे अखेर जर्मनीनें आग्नेयीकडील सर्व बाल्टिक राष्ट्रें आक्रमिलीं होतीं व क्रीट जिंकलें होतें. त्या वेळपर्यंत जर्मनीच्या चढत्या आक्रमणास एकटें इंग्लंड तोंड देऊन उभें होतें.

' इंग्लंडची अडचण तेंच हिन्दुस्थानचें संधिसाधन ' हें कैसरी कंदनापासून हिन्दी राजकारणांत चालत आलेलें सूत्र हिटलरी होरपळीच्या काळांत १९४० च्या मध्यापासूनच धर धरूं लागलें. लोकशाहीच्या जागतिक पूर्ततेसाठीं लोकशाही स्वराज्य उपभोगणाऱ्या सर्वच स्वतंत्र राष्ट्रांच्या सहकाराचें

युग निर्माण व्हावें व त्यासाठीं भारतीय स्वातंत्र्य सिद्ध व्हावें, ही एक नितान्त आवश्यकता होती. तिच्याच जोडीला अशीहि आवश्यकता होती कीं, जगांत शान्तियुग निर्माण होण्यासाठीं मानवसंहारविरोध वा युद्धविरोध व्हावा. त्यासाठीं काँग्रेसचा वैयक्तिक सत्याग्रह सुरू झालाच होता. पण हिन्दुस्थान स्वतंत्र झाल्यावर जागतिक प्रतिष्ठा मिळवून स्वसामर्थ्यावर तो जी गोष्ट करूं शकेल, तिच्यासाठीं पारतंत्र्य मावळलें नसतांना अट्टाहास करण्यापेक्षां 'नवें जागतिक युद्ध' हें आपलें भारत-संरक्षक सैन्य उभारण्यास सुसंधि साधून देणारें आहे, तेव्हां भारतीय तरुणांनीं लष्करांत भरती व्हावें, असा प्रचार सावरकर व हिन्दुमहासभा यांनीं सुरू केला. याहि पुढें जाऊन, हिन्दुस्थानला पारतंत्र्याच्या धारेवर धरणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचे जे विरोधक असतील, त्यांच्याकडून साधनसामुग्री मिळवून, बाहेरच्या बाहेर मिळणाऱ्या हिन्दी लष्कराच्या कुमकेवर 'चलो दिल्ली' करण्याचा मनसुबा ठरवून दे. सुभाषचंद्र बोस १९४० च्या जूनमध्यें हिन्दुस्थानाबाहेर गुप्तपणें निघून गेले. हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचें हें भीष्मपर्व 'इंग्लंडची अडचण तेंच हिन्दुस्थानचें संधिसाधन' या सूत्रावर जर्मनविजयांच्या जून १९४० मधील मोक्यावर सुरू झालेलें पाहूनच ८ ऑगस्ट १९४० ची व्हाइसरीगल घोषणा झाली आणि १९४१ सालीं ती अमलांत आली. तरी हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचें त्यांत वावडें तें वावडेंच होतें.

अशा स्थितींत १९४१ च्या जूनमध्यें ( २२ तारखेला ) जागतिक महायुद्धाला म्हणजे हिटलरी होरपळीला अकल्पितपणें निराळेंच वळण लागलें. जर्मनीनें रशियावर चढाई केली व रशियानें त्यापूर्वी जिंकलेल्या सर्व प्रदेशांतून त्यास पुढील सहा महिन्यांत माघार घ्यावयास लावून, खुद्द रशियाचा एक हजार मैल लांब व शंभर ते चारशें मैल रुंद एवढा प्रदेश आक्रमण केला. त्यानंतर सहा महिन्यांत जपाननें पर्ल हार्बर घेतलें. ~~सामोरें उरलें कीं~~ तारीख ८ डिसेंबर १९४१ रोजीं तर जपाननें जर्मनीच्या बाजूनें उडी घेतली. त्याबरोबर अमेरिकाहि प्रत्यक्ष युद्धांत पडली असें झालें. १९४१ अखेर इंग्लंडच्या जोडीस रशिया, चीन व अमेरिका हीं राष्ट्रें आलीं. तरी थोड्याच दिवसांत म्हणजे पांच महिन्यांत मलाया, सिंगापूर, जावा हीं महत्त्वाचीं ठाणीं जपानच्या हस्तगत झालीं. शिवाय ब्रह्मदेशांतहि अंदमानाप्रमाणेंच जपान हातपाय पसरूं लागला होता. त्यामुळें युद्ध हिन्दुस्थानच्या अगदीं दारीं येऊन ठेपल्यासारखें झालें. सीलोनवर हवाई हल्ला झाला व अखेर हिन्दुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर विजगापट्टण व कोकोनाडा येथें बॉम्बफेक झाल्यामुळें हिन्दुस्थानांतच युद्ध येण्याचा सुमार दिसूं लागला.

शत्रूला परिणामकारक विरोध करण्यास तारीख-तागायत साधनसामुग्री-प्रमाणेंच जनतेच्या हार्दिक पाठिंब्याची आवश्यकता आहे हें लक्षांत घेऊन, ब्रिटिश सरकारनें डिसेंबर १९४१ मध्यें वैयक्तिक सत्याग्रहाचे बंदी मुक्त केले. त्यावर, काँग्रेसच्या बार्डोली येथें भरणाऱ्या वर्किंग कमिटीनें ( कार्यकारिणीनें ), व ( रामगड अधिवेशनानंतर निष्ठावन्त सातत्यानें काँग्रेस कार्यकर्त्यांनीं आपल्या विधायक सेवेनें चालविलेल्या लोकसंग्रहो अशा स्वराज्याच्या तयारीच्या आत्म-विश्वासाच्या जोरावर ) काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद, पं. नेहरू आणि दुसरे जबाबदार पुढारी यांनीं आपली सुटका होतांच जीं पत्रकें काढलीं त्यावरून हें स्पष्टच झालें कीं, हिन्दुस्थानच्या सशस्त्र संरक्षणाच्या कामीं प्रत्यक्ष हातभार लावण्याची त्यांच्या मनाची तयारी होती; मात्र सर्व घडामोडी हिन्दुस्थानच्या प्रातिनिधिक कारभाराच्या काबूंत राखून व सोंपवून भारतीय स्वातंत्र्याचा पाया घालणारी कार्यप्रणाली सुरू व्हावयास हवी; युद्धाच्या सबबीवर हिन्दुस्थानचा प्रश्न खुंटीला टांगून उपयोगी नाहीं; हिन्दुस्थान ब्रिटनच्या युद्ध-प्रयत्नांत सहकारी होईल तो गुलाम म्हणून नव्हे, तर एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून. त्यानंतर बार्डोली येथें भरलेल्या काँग्रेसच्या कार्यकारणीनेंहि वैयक्तिक सत्याग्रह तहकूब करून ब्रिटिश सरकारशीं विचारविनिमयाचा व समझोत्याचा दरवाजा खुला केला. त्यांत तारीख १४ सप्टेंबर १९३९ रोजीं काँग्रेसनें काढलेल्या जाहीर पत्रकांतील नाझी-फासिस्टांच्या आक्रमक वृत्तीच्या निषेधाचा व धिक्का-राचा पुनरुच्चार करून युद्धप्रयत्नांतील स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या विकासाला हातभार लावण्यास आपण सर्वस्वीं तयार असल्याचें कार्यकारणीनें स्वच्छ केलें; मात्र युद्ध-हेतूंची स्पष्ट घोषणा करून त्या घोषणेनुसार शक्यतों पाऊल टाकलें गेलें पाहिजे असा आग्रह धरला; एवढेंच नव्हें तर, स्वातंत्र्य व लोकशाही हेच जर खरोखर युद्ध-हेतु असतील तर साम्राज्यशाहीचा शेवट होण्याशिवाय गत्यंतर नाहीं आणि मग हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता ओघानें येतेच येते, असें काँग्रेसच्या कार्यकारिणीनें स्पष्ट म्हटलें.

बार्डोली येथील काँग्रेस कार्यकारिणीनें दुसऱ्या एका ठरावानें महात्मा गांधींवर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें टाकलेली १९४०च्या सप्टेंबरमधील जबाबदारी संपविली व महात्माजींनीं अनत्याचारी चळवळीच्या क्रान्तीचें वळण जनतेला लावल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महात्मा गांधींच्या सुप्रसिद्ध मतप्रणालीची दखल असलेल्या काँग्रेसमधील कर्त्याकर्त्यांची धारणा अशा प्रकारें प्रगट झाली.

तेव्हां हिन्दुस्थानवर बाहेरून येणाऱ्या संभाव्य आक्रमणाला आणि हिन्दुस्थानांतल्या हिन्दुस्थानांत होणाऱ्या घालमेली-धावाधावींना आळा घालण्यासाठीं विचारांची एकतानता आणि प्रयत्नांची सहकारी सुसंगतता निर्माण करण्यासाठीं कांहींतरी वाटचाल केली पाहिजे असें ब्रिटिश साम्राज्याच्या सूत्रधारांना वाटूं लागलें; आणि तसें त्यांना जपानच्या पर्ल हार्बरवरील हल्ल्यापासून ~~वाचवयास लागलें आणि तसेंच~~ रशिया, चीन व अमेरिका यांच्या वजनदारीनें प्रवृत्त केलें असा सार्वत्रिक कानोसा होता व आहे. त्या प्रवृत्तीस अनुसरून ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनीं पार्लमेंटांत उद्घोष केला कीं, हिन्दुस्थानांत स्थिरस्थावर व्हावें म्हणून सर स्टॅफोर्ड क्रिप्स हे लवकरच हिन्दुस्थानला भेट देतील.

*समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले*

युरोपमध्यें १९३९ पासून सुरूं झालेल्या हिटलरी होरपळीच्या खाईकडे पहावेना, तर हिंदुस्थानांतहि एका बाजूनें एक प्रकारची असहाय्यताच निर्माण झाली होती. ' साम्राज्याच्या गरजा येती भारताच्या काजा । ' हें लक्षांत घेऊन देशगौरव सुभाषचन्द्र बोस हे खैबर घाटांतून पसार झाल्याचें २६ जानेवारी १९४१ ला हिंदुस्थानांत कळलें. काबूल-कंदाहार–मार्गें इटालींत व तेथून समुद्रमार्गें पूर्वेस सिंगापूरला जाऊन ते खटपटी अशा उभारूं लागले होते कीं, ज्यांच्यायोगें ब्रिटिशाच्याकडे नोकरीस असलले सैनिक–सेनापति जे जे म्हणून भारतीय होते ते ते आपली देशभक्ति जागृत ठेवून सुभाषबाबूंकडे " आझाद–हिंद-सरकार " स्थापन करण्याच्या एकेक पायऱ्या आक्रमूं लागले. अंदमानाच्या आसपास आझाद–हिंद–सरकारचा दप्तरखाना थाटला गेला; सिंगारपूरहून आझाद–हिंद–सरकारचे नेताजी सुभाषचन्द्र बोस सर्व भारतीय देशभक्तांना आणि त्यांच्या हाताखालीं असलेल्या आझाद–हिंद–सैन्यास ' चलो दिल्ली'चा संदेश देऊं लागले; पण हें सर्व भारतीय किनाऱ्यावर नेताजींचे पाय पक्केपणीं उभारण्यासाठीं मिळावयाच्या जपानी व जर्मनी अशा नेटाच्या सहाय्यावर अवलंबून होतें. युरोपीय युद्धाच्या आगबंबाळांत इंग्लंडचें स्थान भलत्या घसरगुंडीला लागल्यामुळें युद्धोत्तर इंग्लंडनें हिंदुस्थान सोडल्याशिवाय गत्यंतर नाहीं, म्हणून आक्रमक अरेराव–वादाचें जर्मनी–इटालीच्या रूपानें जें राजकीय थैमान चालूं आहे, त्याला आळा घालण्यासाठीं इंग्लंडला सहाय्यक रंगरूट पुरवून भारतीयांनीं सहकार करावा अशी विचारसरणी मानवेंद्रनाथ रॉय-वादी प्रतिपादित होते; काँग्रेसचे नेते महात्मा गांधी यांची विचारधाराच मुळीं अस्त्र-शस्त्र-रक्तपात-रण यांच्याविरुद्ध असल्याकारणानें, त्या अनन्य नेत्याच्या

नेतृत्वाखालीं 'ना सहकार, ना असहकार' अशी भूमिका कॉंग्रेसनें स्वीकारली होती; एवढेंच नव्हें तर, कॉंग्रेस मंत्रिमंडळानें राजिनामे देऊन ऱ्याणवकलमी कारभार उभा राहिलेला उघड्या डोळ्यांनीं पाहिला होता! या सगळ्या असहाय्यतेंतूनच सामर्थ्य उभें करण्यासाठीं मग आपल्या आघाड्या नेत्यांनीं उभारल्या. 'चलो दिल्ली'च्या घोषणेला प्रथम युद्धविरोधाच्या भूमिकेवरून मानवतेच्या नांवानें साथ देण्याचा प्रयत्न करतां करतांच, खुद्द हिंदुस्थानवरच स्वारी होण्याचा रंग दिसतांच, युद्धोन्मुख होण्याचीं प्रगटनें कॉंग्रेसकडून होऊं लागलीं, तर युद्धांत यश मिळवण्यासाठीं म्हणून हिंदुस्थानच्या दिलसाफ सहकारप्राप्तीसाठीं क्रिप्स-शिष्टाई इंग्लंडनें सुरू केली.

१९४२ च्या मार्च-एप्रिल महिन्यांत इंग्लंडहून क्रिप्ससाहेब हिंदुस्थानांत आले. त्याच्या अगोदर अमेरिकन प्रेसिडेन्ट रूझवेल्ट यांच्याकडून कॉंग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद यांना एक पत्र घेऊन त्यांचा दूत आला होता. ८ ऑगस्ट १९४० च्या व्हाइसरीगल घोषणेचे पडसाद जे राष्ट्रांत उठले होते, त्यांत मुस्लिम लीगनें पाकिस्तानची ठाम मागणी केली होती. तिला महात्मा गांधींनीं जिवाभावानिशीं कसून विरोध केला होताच. पण व्हाइसरीगल घोषणेनें मिळणाऱ्या वसाहतीच्या स्वराज्याबरोबरच देशाची फाळणी पाकिस्तानच्या मागणीनें होणार हें पाहून हिंदुमहासभेनेंहि 'भागलपूर' सत्याग्रह उभारला होता. तेव्हां सर्वच दिशांकडून हिंदुस्थानांत असहकाराचे उग्र वारे वाहूं लागले तर युद्धप्रयत्न यशस्वी होणार नाहींत, तेव्हां हिंदी लोकमत शांत करण्यासाठीं क्रिप्स हिंदुस्थानांत आले.

जपाननें युद्धांत भाग घेतल्यापासूनच हिंदुस्थानशीं तडजोड करण्याबद्दल इंग्रजांमागें अमेरिकेप्रमाणेंच चीनचा तगादा होता. २८ फेब्रुवारी १९४२ रोजीं चँग कैशेकला कॉंग्रेस-अध्यक्ष आझाद यांनीं सांगितलेंच होतें कीं, युद्धप्रयत्नाला हिंदुस्थाननें सहकार करण्यापूर्वीं इंग्लंडकडून स्वातंत्र्याचें वचन मिळालें पाहिजे आणि युद्ध संपेपर्यंत वसाहतीच्या स्वराज्यासारखा भारतीय मंत्रिमंडळाला कारभार करतां आला पाहिजे. तेव्हां मग हिंदी लोकमत शांत करण्यासाठीं क्रिप्सनें एक योजना हिंदुस्थानच्या विचारवंतांच्या पुढें ठेवली. तिलाच क्रिप्स-योजना म्हणतात. तिची रूपावली अशी—

अ—युद्ध संपल्यावर हिंदुस्थानची राज्यघटना बनविण्यासाठीं घटनासमिति निवडण्यात येईल. तींत हिंदी संस्थानांना भाग घेतां येईल व ब्रिटिशशासित हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांताला अखिल भारतीय घटना-समितींत

सामील व्हावयाचें नसेल तर त्याला तसें करतां येईल. एवढेंच काय; पण त्या प्रांताला स्वतःची निराळी घटना-समिति मिळेल.

आ —ब्रिटिश सरकार व घटना-समिति यांच्यामध्यें समझोता होऊन हिंदी लोकांच्या हातांत सर्व सत्ता देण्याची व्यवस्था होईल.

इ—अल्पसंख्य जातींच्या हक्कांचें संरक्षण होईल.

ई—युद्धकाळांत मात्र संरक्षणखातें ब्रिटिशांच्या हातीं रहावयाचें.

अशा रीतीनें हिंदुस्थानचें जरूर तर एक वा अनेक राज्यसंघांत रूपांतर करावें, असा त्या योजनेचा रोख होता. या योजनेवर तीन आठवडे चर्चा झाली. काँग्रेस, हिंदुमहासभा, मुस्लिम लीग प्रभृतींना या ना त्या कारणावरून क्रिप्स-योजना नापसंत झालीच. पण सामान्य माणसालाहि ती योजना आकर्षक वाटली नाहीं. कारण तींत दुहीचीं बीजें होतीं आणि क्रिप्सपूर्वींच १९४२ च्या फेब्रुवारींत चीनचे मार्शल चँग-कैशेक यांनीं म. गांधींच्या भेटीनंतर हिंदुस्थान सोडतांना ' लोकांच्या हातीं खरी सत्ता द्या ' असा आपला प्रगट संदेश जो ब्रिटिश सरकारला दिला होता, त्याचें विकृतीकरण होतें. तेंहि अशा स्थितींत कीं, त्या चीनच्या स्वातंत्र्यार्थ सतत झगडणाऱ्या देशभक्ताची गांधींशीं भेट म्हणजे पृथ्वीवरील एकतृतीयांश लोकसंख्येच्या प्रतिनिधींची भेट असें रसभरित वर्णन दोन आठवडे विलायती वृत्तपत्रांनीं चालविलें असतांना ! !

अशा स्थितींत ब्रिटिश सम्राटांच्या सरकारचा व घटना-समितीचा तह होऊन ब्रिटिश हातांतून भारतीय हातीं सत्तांतर होण्याची भाषा जी क्रिप्स-योजनेच्या प्रसिद्धींत होती, तिचा उपयोग कसा होणार ? त्यामुळें काँग्रेस कार्यकारिणीच्या जीवनांतील प्रदीर्घ बैठक म्हणून जिची प्रसिद्धी आहे, अशी ती बैठक जगाला सांगून चुकली कीं,—

( १ ) ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळाचा नवा सुधारणामसुदा युद्धसमाप्तीनंतरच्या भविष्यकाळासंबंधींचा आहे.

( २ ) त्या अनिश्चित भविष्यकाळांतील राजकीय सुधारणांबाबत स्वयंनिर्णयाचें तत्त्व मान्य करण्यांत आलें असलें आणि घटना-निर्माण-समितीसुद्धां व्हावयाची असली तरी अप्रातिनिधिक घटकांचा भरणा आणि अनावश्यक बंधनें त्या सर्व योजनेंत आहेत. याबद्दल काँग्रेस कार्यकारिणीला विषाद वाटतो.

( ३ ) नऊ कोटी संस्थानी प्रजाजनांना प्रतिनिधित्व न मिळतां, संस्थानिकांच्या हातचीं त्यांना खेळणीं मानण्यांत लोकशाही आणि स्वयंनिर्णय या दोन्ही तत्त्वांना नकारघंटाच होय.

( ४ ) कोणत्याहि प्रांताला घटना-समितीपासून अलिप्त राहण्याची मुभा या अभिनव तत्त्वाचा अगाऊ अंगीकार हा भारताचा एकजिनसीपणालाच जबरदस्त धक्का असून बेकीचें बीज आहे. त्यायोगें प्रांताप्रांतांत अधिकाधिक कठीण प्रसंग उद्भवण्याचा आणि संस्थानांच्या विलीनीकरणाबाबत अडचणी उत्पन्न होण्याचा पूर्ण संभव आहे.

( ५ ) तथापि कोणत्याहि प्रादेशिक घटकानें स्वतःच्या जाहीर व प्रस्थापित इच्छेविरुद्ध भारतीय संघराज्यांत राहिलेंच पाहिजे, अशी सक्ती करण्याची काँग्रेस कार्यकारिणीची मनीषा नसून, कोणत्याहि प्रकारें भारतीय संघराज्यांत सामील होणाऱ्या समर्थ घटकांच्या मार्गांत अडथळे वा अडचणी उत्पन्न होऊं नयेत. प्रत्येक प्रादेशिक घटकाला शक्य तेवढी कमालींची स्वायत्तता असावी; मात्र भारताच्या राष्ट्रीय राज्ययंत्रणेला कोठें कमकुवतपणा येऊं नये. ब्रिटिश-युद्धमंत्रिमंडळाच्या योजनेनें अलगपणाची भावना उत्तेजित होईल आणि ती संघराज्याच्या सुरवातीस उत्पन्न झाली कीं, कमालीच्या सहकार्याचा आणि परमोच्च सदिच्छेचा मुहूर्तच कुयोग ठरेल !

क्रिप्सयोजनेसंबंधीं असा अभिप्राय प्रकट करूनच काँग्रेस थांबली नव्हती, तर तिनें आणखीहि आपलें मत स्पष्ट केलें कीं :—

" हिन्दुस्थानच्या भविष्यासंबंधीं जी कांहीं योजना कोणास करावयाची असेल, तिच्यांत विवेक आणि चिकित्सक दृष्टि असलीच पाहिजे. तथापि आजच्या या उलथापालथीच्या काळांत वर्तमानकाळाला महत्त्व मिळालेंच पाहिजे; फार काय, भविष्यकाळाच्या कल्पना करतांनाहि वर्तमानाला डावलून उपयोग नाहीं. त्या दृष्टीनें प्रस्तुत वर्तमानाचा विचार करतां ब्रिटिश-युद्ध-मंत्रिमंडळाची योजना ' पोकळ वासा ' असून अगदींच अपुरी व प्रस्तुत जमान्यांत कसलाहि महत्त्वाचा बदल न घडवून आणणारी आहे, हें आढळेल.

हिन्दुस्थानच्या रक्षणाचें खातें ब्रिटिशांच्या हातीं कांहीं झालें तरी राहील हें स्पष्ट करण्यांत आलें आहे. तथापि काँग्रेस-कार्यकारिणी फिरून स्पष्ट करूं इच्छिते कीं, प्रस्तुत काळीं भारतीयांनीं जबाबदारीची कामगिरी अंगावर घ्यावयास, सर्वप्रथम जर कोणती गोष्ट व्हावयास हवी असेल तर आपण स्वतंत्र आहोंत असा त्यांना वास्तविक अनुभव यावयास हवा आणि आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण तसेंच संगोपन आपल्या हातीं आहे याची जागती जाणीव त्यांना हवी. प्रस्तुतचें भारतीय कारभारी गाडें व त्याचीं प्रादेशिक चाकें कार्यक्षमतेच्या दृष्टीनें कमकुवत आहेत व हिन्दुस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी

खांद्यावर पेलण्यास असमर्थ आहेत, हें उघड आहे. ही जबाबदारी हिन्दुस्थानचे लोकच आपल्या प्रतिनिधींमार्फत आपल्या खांद्यावर पेलूं शकतील. पण तशी प्रतिष्ठा यावयास ते आतांच स्वतंत्र होऊन त्यांच्यावर तशी जबाबदारी निःशंक-पणें सोंपविली पाहिजे.

म्हणून ब्रिटिश-युद्ध-मंत्रिमंडळानें पुढें आणलेली योजना स्वीकारण्यास काँग्रेसकार्यकारिणी असमर्थ आहे. ''

अशा तऱ्हांनीं क्रिप्स-योजनेला सगळीकडूनच वाटाण्याच्या अक्षता लागल्यावर ती योजना इंग्लंडनें मागें घेतली. तसा तो खारटतुरट बोलीचा प्रसंग होत असतांनादेखील भारतीय पुढाऱ्यांनीं निक्षून सांगितलें कीं, कसल्याहि आक्रमणाविरुद्ध भारताचें संरक्षण करण्यास आम्ही बद्धपरिकर आहोंत.

याच सुमारास एप्रिल १९४२ च्या अखेरीस अखिल भारतीय काँग्रेस-कमिटीची सभा संपत आली असतां, राजगोपालाचारिअरांच्या नेतृत्वाखालीं मद्रास-प्रदेशच्या काँग्रेसी कायदेमंडळांतील पक्षानें असा शिफारसवजा ठराव केला कीं, वेळप्रसंग येईल तेव्हां भारताची भावी राज्यघटना तयार करतांना, त्या वेळीं मुस्लिम-लीग हेकाच धरील तर, अलग होण्याचा तिचा तो हेका अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें मान्य करावा ! शिवाय प्रस्तुत आणीबाणीच्या प्रसंगीं 'राष्ट्रीय सरकार' प्रस्थापित व्हावें म्हणून विचारविनिमयासाठीं मुस्लिम-लीगला आमंत्रणहि देण्यांत यावें !

मद्रासच्या कायदेमंडळांतील काँग्रेसपक्षीयांच्या त्या ठरावाच्या विरुद्ध सर्व हिंदुस्थानभर विरोधाचें वादळ उठलें. त्या ठरावाचें स्वागत फक्त मुस्लिम-लीगच्या पुढाऱ्यांनीं व कांहीं नेमस्त मंडळींनीं मात्र केलें. अलाहाबादच्या अखिल भारतीय काँग्रेस कमेटींत १५ विरुद्ध १२० मतांनीं त्याची शोभाच झाली ! हिंदुस्थानच्या छेदनाचा कसलाहि ठराव फेटाळूनच लावला पाहिजे, हा पंडित जगत्‌नारायणांनीं मांडलेला ठराव वरील अलाहाबादच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटींत ९२ विरुद्ध १७ मतांनीं मान्यता पावला.

यानंतर हिंदुस्थानचीं शकलें होऊं नयेत या भक्कम सदिच्छेनें महात्मा गांधी आपल्या साप्ताहिक 'हरिजन'मधून राजगोपालाचारिअरांच्या ठरावा-विरुद्ध आणि अलाहाबादच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ठरावाच्या बाजूनें आठवडेच्या आठवडे लेख लिहीत राहिले. उलट, दक्षिण भारताचे वजनदार पुढारी राजगोपालाचारिअर कायदेआझम जिनांशीं तह करण्यावर भर देऊन आपला झंझावाती प्रचार करीत राहिले. दिल्लीला राष्ट्रीय सरकार

प्रस्थापित करण्यासाठीं राजगोपालाचारिअरना जिनांशीं तह होणें आवश्यक वाटत होतें; एवढेंच नव्हे तर, जपानच्या आक्रमक हल्ल्यापासून हिंदुस्थानचें नीट संरक्षण व्हावयासहि जिनांशीं तह होणें जरूर असल्याचें राजाजींचें मत होतें.

महात्मा गांधीजींच्या लिखाणावरून हें स्पष्ट होत होतें कीं, कॉंग्रेसच्या म्हणण्याला संमति द्यावयास ब्रिटिश सरकार जों जों उशीर करील तों तों महात्मा गांधींचा समतोल सुटत जाणार. एप्रिल महिन्याच्या शेवटापासून महात्माजी एवढे अस्वस्थ होत चालले कीं पुढें त्या अवस्थेंतूनच ‘ चले जाव ! ’ ची चळवळ जन्माला आली.

● ● ●

## ४

★

## चले जाव

" It may safely be predicted that if we ever suffer irretrieveable defeat on Indian soil, we shall leave the land, not to European rivals, but to its native chiefs and that the still remembered woes of Maratha and Pindhari raids will be forgotten amid the ravages of new oppressors ... but, our best defence is the good will of the people and that sooner or later we shall secure, if we only deserve it. "

—The West Minister Review for October 1877.

हिंदुस्थानांत हिन्दी लोकांचें पार्लमेंट बसून त्यानें सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवावा. ही स्थिति येईपर्यंत हिन्दी लोक आयरिश लोकांप्रमाणेंच सरकारशीं भांडत राहणारच. उजव्या हातांत देशाभिमानाचा भाला व दुसऱ्या हातीं सोसण्याची कलारूपी ढाल घेऊन हा लढा चालवावयाचा. पारतंत्र्याची अस्पष्ट कल्पना, राष्ट्रहानीची स्पष्ट कल्पना, अर्ज-शिष्टमंडळें, विधिमंडळांतील सनदशीर चळवळ, स्वदेशी व बहिष्कारासारखा अप्रत्यक्ष प्रतिकार, गुप्तमंडळ्या आणि सक्रिय प्रतिकार अशी स्वराज्याची सप्तपदी राहील, असा अंदाज १९०८ सालीं पुण्याच्या भालापत्रानें केला होता ( भाल्याच्या फेकी, पृ. १५४ ते १६२ पहा. ). हिन्दुस्थानांतील लोकांनीं बहुधा याच पायऱ्या चढत चढत काँग्रेसची चळवळ प्रभावी केली होती. क्रिप्स-योजनेला वाटाण्याच्या अक्षदा दिल्यानंतर, म. गांधी जे इंग्रजसरकारच्याकडून अपेक्षाभंग होत असल्याकारणानें अस्वस्थ होत गेले, त्या त्यांच्या अवस्थेंतूनच हिन्दुस्थाननें शेवटची पायरी चढावी असा उमट झाला.

हा उमट तारीख ८ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्रीं अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीनें मान्य केला व देशव्यापी स्वातंत्र्याची चळवळ सुरू करण्याचें घोषित केलें. हा दिवस म्हणजे व्हाईसरीगल वासाहतिक स्वराज्याच्या घोषणेचा दुसरा वाढदिवस होय. युद्धपरिस्थिति दिवसेंदिवस गंभीर होतच होती. युद्ध-प्रयत्नांत ब्रिटिश सरकारशीं मनमोकळेपणानें सहकार करावयास हिन्दुस्थानचे लोक तयार होते. फक्त ज्या हिंदुस्थानच्या व पर्यायानें जगाच्या स्वास्थ्यासाठीं 'जिवानिशीं धनानिशीं' युद्धाच्या आगींत लोकांनीं उडी घ्यावयाची तो हिन्दुस्थान ( जगांतील इतर स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांना स्वतःचा देश आपला आहे हें वाटण्यास जें तेथें वारें असतें, तें वारें उत्पन्न होऊन ) आपलाच आहे, असें लोकांना वाटण्यासारखी कृति ब्रिटिश सरकारनें करावी अशी अपेक्षा होती. क्रिप्स-योजनेसारख्या आश्वासनात्मक आणि परिणामतः खोडसाळ असणाऱ्या मेहेरबानींना भारतीय पुढारी विटले होते. सनदशीर चळवळ करणारांची पूर्ण निराशा झाली होती. हिन्दुस्थानांत बेफिकिरी व उतावीळ वैतागाचें वारें उत्पन्न झालें होतें. इतकें कीं, ब्रिटिश सत्ता आतां संपलीच पाहिजे; असें झालें तरच या आणीबाणीच्या वेळीं हिन्दुस्थानला आपलें संरक्षण करतां येईल. या राष्ट्रव्यापी भावनेलाच अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींत मुंबईस तारीख ८ ऑगस्ट १९४२ रोजीं साद मिळाली. त्यांतून 'चले जाव' ची घोषणा कॉंग्रेसनें केली. 'चले जाव' च्या ठरावावरील भाषणांचा समारोप करतांना म. गांधी म्हणाले:—"संप, हरताळ, अडथळा किंबहुना कोणत्याहि मार्गानें पण अहिंसेनें प्रत्येकजण चळवळ करण्यास मोकळा आहे. 'कर किंवा मर' असें मनोमन ठरवून चळवळीचा उठाव झाला पाहिजे. ज्या वेळीं सत्याग्रही आनंदानें मृत्यूला मिठी मारतात त्याच वेळीं राष्ट्र जिवंत राहतें. आपण एक तर आपलें ध्येय साध्य करूं अथवा मरून जाऊं."

महात्मा गांधींचा हा समारोप फारच संयमपूर्ण होता. हिटलरी होरपळीच्या ज्वाळा जग व्यापून बसल्या होत्या. शान्तियुगाची आणि मानव्याच्या प्रस्थापनेची धडपड करणाऱ्या महात्मा गांधींना सगळ्या आशियाटिक राष्ट्रांबरोबर 'छोडो आशिया' असें इंग्रजांस व सर्वच पाश्चिमात्त्यांस म्हणावयाचें होतें. पण जपानसारखें आशियाटिक राष्ट्रच युद्धांत गुंतलेलें; वेळ-वखत पाहून जपान इंग्लंडवर मात करणार असा रंग दिसत होता. म्हणून केवळ हिन्दुस्थानच्याच नव्हे तर इंग्लंडच्याहि हितसंबंधाच्या दृष्टीनें हिन्दुस्थान-वरील तरी आपली राजकीय हुकमत इंग्लंडनें सोडणें व हिन्दुस्थान स्वतंत्र होणें महात्माजींना इष्ट वाटत होतें. 'हरिजन' मध्यें त्यांनीं एकदां लिहिलें होतें कीं 'हिन्दुस्थानच्या संरक्षणासाठीं चाललेल्या तथाकथित तयारींतून हिन्दी

स्वातंत्र्य मला डोकावतांना सुद्धां दिसत नाहीं. ही सारी तयारी ब्रिटिश साम्राज्याच्याच केवळ संरक्षणासाठीं असल्याचें सरळ सरळ स्पष्ट आहे.' पुढेंहि एकदां ते म्हणाले होते कीं, 'राज्यकारभाराचे लगाम आम्ही नेमके कोणाच्या स्वाधीन करावयाचे, तें कळलें तर आम्ही जरूर जरूर सोडूं, असेंच जर राज्यकर्त्यांचें म्हणणें असेल, तर त्याला माझें उत्तर एवढेंच आहे कीं, त्यांनीं ते लगाम ईश्वराकडेच सुपूर्त करावेत. हें म्हणणें भलतेंच वाटत असेल तर अराजकताच ते लगाम घेऊं दे.' कारण 'गेलीं बावीस वर्षें जें राष्ट्रीय चळवळींना अहिंसेचें वळण आहे तें अगदींच वाया गेलेलें नाहीं. त्याच्यायोगेंच अराजकाच्या सावळ्यागोंधळांतून लोकांना इष्ट अशी व्यवहारशुद्ध समाज-व्यवस्था निर्माण होईल.' १९४२ च्या मे महिन्याच्या मध्यापर्यंत महात्माजी विचारांच्या या थरापर्यंत आलेले होते, हें लक्षांत घेतल्यावर, तारीख ८ ऑगस्ट १९४२ रोजीं, महात्माजींनीं राष्ट्राला दिलेला आदेश संयमपूर्णच होता, हें कोणासहि पटेल.

तथापि ब्रिटिशांनीं हिन्दुस्थान सोडावा अगर जनतेनें त्यांस तसें करावयास लावावें हें म्हणतांना, जपानच्या खांद्यावर हिन्दुस्थाननें टेकावें, अशी अंधुकहि कल्पना नव्हती. तसें करण्यांत आजारापेक्षां औषधच आपत्ति ठरावयाचें ! हिन्दुस्थानांत वा हिन्दुस्थानच्या परिसीमांवर इंग्लंडचा पराभव झाला तर इंग्लंडच्या हातचें हिन्दुस्थान जाईल पण नव्या जेत्याच्या ताब्यांत हिन्दुस्थान गेलें तर आगींतून फोफाट्यांत हिन्दुस्थानची होलपट व्हावयाची !! जुलै १९४२ मध्यें वर्ध्यांत काँग्रेसच्या कार्यकारिणीनें केलेला वरील धर्तीच्या विचारसरणीचा ठराव प्रसिद्ध होतांच त्यासंबंधांत जगभर जे पडसाद उठले, त्याला उत्तर म्हणून काँग्रेसच्या अध्यक्षांनीं उत्तरहि देऊन टाकलें होतें कीं—'हिन्दुस्थानांतील राज्यकारभाराचे लगाम मुस्लिम लीगच्याहि स्वाधीन झाले तरी चालतील, मात्र भारताला निर्भेळ स्वातंत्र्य मिळालें पाहिजे.' हीच वृत्ति स्पष्ट करून तारीख ८ ऑगस्ट रोजीं महात्माजींनीं अखिल-भारतीय काँग्रेस कमिटीच्या ठरावासंबंधांत आपण व्हाइसरॉयांशीं पत्र-व्यवहार करणार असल्याचें जाहीर केलें होतें. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचा ठराव, त्यांतील व आनुषंगिक बाबी, त्यांचा रोख —या सर्वांची मनमोकळेपणानें सरकारला स्वच्छ कल्पना देण्याचा महात्माजींचा मानस होता. त्याचप्रमाणें कायदेआझम जीनांची गांठ घेऊन कांहीं समझौता होतो कीं नाहीं तें पाहण्याची शिकस्तहि कांहीं काँग्रेस पुढाऱ्यांनीं, अ. भा. काँग्रेस कमिटीच्या काळांत केली. सरकारनें ही जर लोकाभिमुखता दाखविली असती तर पुढील आठ-पंधरा दिवसांत परिस्थितीला निराळेंच वळण मिळालें असतें !

तथापि ‘ होणारें न चुकेल होईल जरी ब्रह्मा तया आडवा । ’ असाच अनुभव आला. आपली जागतिक प्रतिष्ठा जपूं पाहणाऱ्या ब्रिटिश राजवटीनें ‘ चले जाव ’ची प्रतिक्रिया दडपशाहीचा ‘ रोड रोलर ’ फिरवून सुरू केली. तारीख ९ ऑगस्ट रोजींच महात्मा गांधी–प्रभृति अखिल भारतीय पुढारीच नव्हे तर ठिकठिकाणचे काँग्रेस-आंदोलनाचे सूत्रधार सरकारनें स्थानबद्ध करून टाकले. कारण सरकारची अशी समजूत झाली होती कीं, काँग्रेस अराजक माजवावयासच प्रवृत्त झाली आहे. म्हणून चळवळीनें मूळच धरूं नये अशी सरकार दक्षता घेत होतें. मग चळवळ फोफावूं कशी देणार ? तारीख ९ ऑगस्ट रोजीं व्हाइसरॉयनीं एक सरकारी पत्रक जाहीर केलें कीं, ‘ काँग्रेस विस्तृत प्रमाणावर कायदेभंगाची चळवळ सुरू करून उच्छृंखल हालचाली सुरू करण्याच्या विचारांत असल्याची आणि त्यांच्या जोरावर वाहतूक आदिकरून लोकसेवक यंत्रणेला खीळ घालण्याचा मनसुबा करीत असल्याची सरकारला गेले कित्येक महिने माहिती आहे. काँग्रेसला कांहीं शहाणपणा सुचेल म्हणून सरकारनें वाट पाहिली; पण व्यर्थ ! तेव्हां काँग्रेसच्या आव्हानाला उत्तर देणेंच सरकारला भाग आहे. हिंदुस्थानची प्रजा आणि दोस्त राष्ट्रें यांच्या संबंधांत हिंदुस्थान–सरकारची जी जबाबदारी आहे, तिचा विचार करतां, ज्या मागणीच्या नुसत्या वाटाघाटीनेंहि हिंदुस्थानांत अराजक व गोंधळ माजेल, तिचा स्वीकार सरकारला करतांच येणार नाहीं. शिवाय काँग्रेसला सर्व हिंदुस्थानतर्फे कांहीं बोलावयाचाहि अधिकार नाहीं. काँग्रेसचें म्हणणें मान्य करण्यांत इतर पक्षीयांचा व हितसंबंधीयांचा अवमान होईल. हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणांबाबत सरकारी धोरण स्पष्ट असून, युद्ध-समाप्तीनंतर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर सर्व पक्षीयांना संमत अशी राज्ययंत्रणा सुरू करण्यांत येईल वगैरे. तथापि ब्रिटिश राजवटीच्या या धोरणाबद्दल अमेरिका व चीन यांनीं नापसंति व्यक्त केलीच !

शेकडों काँग्रेस-पुढाऱ्यांना तारीख ९ ऑगस्ट रोजीं ‘ कारागृहीं वास ’ दिल्यानंतर लोक जरा दचकलेच. मुंबई, अहमदाबाद, पुणें वगैरे कांहीं ठिकाणीं चळवळीचे उठाव गाजले; पण तारीख १० रोजीं दिल्ली व उत्तर प्रदेशांत लोकांनीं उठाव केला; तारीख ११ ऑगस्टपासून मात्र काँग्रेसची चळवळ मूळ धरूं लागली आणि पेट घेऊं लागली. साने गुरुजींसारखे प्रचारक सांगूं लागले, ‘ पेटूं दे देश । पेटूं दे देश ॥ येथून तेथून सारा पेटूं दे देश ॥ ’

त्यासरशीं पुढाऱ्यांविना जनताच स्वातंत्र्याची चळवळ करूं लागली. म. गांधींच्या अहिंसामय आन्दोलनाच्या चतुष्कोणांत ब्रिटिश राज्यकारभार स्थगित करण्याच्या सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब चापूनचोपून करण्यांत आला.

हरताळ, मोर्चे, निषेध, सभा या मामुली प्रकारांना तर भरती आलीच. पण साधेल त्या ठिकाणीं प्रतिसरकार स्थापण्याच्या उद्योगासहि जनता लागली. त्या प्रयत्नांत अच्युतराव पटवर्धनांच्या व जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वानें बिहार-ओरिसाकडे जसें थोडेंफार यश आलें तसेंच महाराष्ट्रांतहि 'जय सातारा!' असा उद्घोष सर्व हिंदुस्थानभर व्हावा अशी 'लोकसेवक गुप्त सरकार' स्थापण्याची कर्तबगारी कांहीं काळ फळासहि आली. कार्यकर्ते 'गुप्त' अथवा भूमिगत झाले व जनतेनें ब्रिटिश राजवटीपेक्षां त्या 'वनवासी रामांना"च जवळ केलें. देशभक्तीनें प्रेरित असलेल्या त्या उत्थापनांत जाणकारांनीं अहिंसेबद्दल कांटेकोरपणें दक्षता घेऊनहि कांहीं ठिकाणीं मनुष्यवध झाले!! कारण त्या राजकीय 'गुप्त्यांच्या' आंदोलनांत कांहीं संधिसाधु लोकांनीं शिरकाव करून घेऊन स्वार्थसाधुपणा केला; तसाच कांहीं कांहीं ठिकाणीं इंग्रजांच्या हस्तकांनीं काँग्रेसला, महात्मा गांधींना आणि भारतीय राष्ट्रीयत्वाला अनैतिकतेचा डाग लावण्यासाठीं भारत-संरक्षण कायद्यांतील स्थानबद्धतेचा आसूड धरून अनेकानेक समाजकंटकांना काँग्रेसचे अनुयायी म्हणून अकारणच शिक्कामोर्तब केलें!!

ब्रिटिश कारभार स्थगित करण्यासाठीं टपाल, तारा, आगगाड्या यांच्या मोडतोडीची वावटळ हिंदुस्थानांतील एकमेकांपासून विलग असलेल्या प्रदेशांतूनहि एकसमयावच्छेदेंकरून उठली. मुंबई, बिहार, मद्रास या प्रांतांतून व मध्यप्रदेश, संयुक्त प्रांत अशा ठिकाणीं घडलेली नासधूस विस्तृत प्रमाणावर आणि विखुरलेली अशी भयंकरच होती. तें वेड म्हटलें तर त्याला पद्धत होती; कारण त्यांत तंत्रज्ञता भरपूर आढळली. रेल्वेवरील ब्लॉक-इन्स्ट्रुमेंट्स् आणि वीज-पुरवठ्यावरील हल्ले व त्या हल्ल्यांची पद्धति माहीतगारावांचून झालीच नाहीं; मात्र अगदीं सरकारी यंत्रणानें चाललेल्या औद्योगिक स्वरूपाच्या यंत्रणेला गुप्त्यांनीं फारसा हात घातला नाहीं. मध्यवर्ती असेम्ब्लीमध्यें सर रेजिनाल्ड मॅक्स्वेल यांनीं सांगितल्याप्रमाणें १९४२ च्या नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत पोलिसांवर झालेल्या हल्ल्यांत ४९ मृत्यु व १३६३ जबर जखमींचीं उदाहरणें होतीं. १९२ पोलिस-स्टेशनांवर, ४९४ सरकारी इमारतींवर, ३१८ रेल्वे-स्टेशनांवर आणि ३०९ पोस्ट-तार कचेऱ्यांवर गुप्त्यांनीं भडिमार केला होता. १०३ आगगाड्यांचे रूळ उखडून निघाले होते, ११२८५ तारा तुटल्या होत्या आणि लष्करी मालमत्तेची ३ ठिकाणीं लूट झाली होती. गुप्त्यांनीं काढलेल्या मोर्चांनीं लष्करांतील १४ सैनिकांना मरणदारीं जावें लागलें आणि ७० सैनिकांना मरणाच्या दारापर्यंत जाऊन परत येतां आलें. कांहीं कांहीं

ठिकाणीं सरकारी कचेऱ्यांवरून अल्पकाळ का होईना कॉंग्रेसचे तिरंगी झेंडे फडकले व कांहीं कांहीं अधिकाऱ्यांना डोक्यावर गांधीटोप्या चढवून कॉंग्रेसच्या तिरंगी झेंडयाला मानवंदना द्यावी लागली.

'चले जाव' चा ठराव म्हणजे माझें 'उघड बंड' आहे, असें सांगून महात्माजींनीं प्रत्येक हिन्दी माणसाला 'स्वतंत्र हिन्दुस्थानचा स्वतंत्र नागरिक' म्हणून वागण्याचा संदेश ठेवला होता. तो ज्याला जसा जमला-समजला तसा त्यानें आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला. कारण 'चले जाव' चीं आचरणसूत्रें जनतेस द्यावयास सरकारनें महात्माजींस वा कॉंग्रेसश्रेष्ठींस वावच ठेवला नव्हता. त्यामुळें अखिल-भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीहून परतलेल्या पुढाऱ्यांच्या तोंडून सूचित झालेल्या आणि अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली प्रभृति निरनिराळ्या प्रान्तांतील बारभाईनीं मुंबईत बसून जीं खलवतें केलीं त्यांचा कानावर आलेला प्रतिध्वनि लक्षांत घेऊन दिसलेल्या मार्गांनीं जनता गेली. नाहीं म्हणावयास पुढें 'हरिजन'मध्यें प्रसिद्ध झालेल्या मश्रूवाला नि काका कालेलकर यांच्या लेखांवरून लोकांचें लोकांनीं कांहीं आडाखे बसविले. त्याशिवाय देखील अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचें सूचनापत्रक क्रमांक २ म्हणून ऑगस्ट १९४२ मध्यें लोकांच्या हातीं "करा वा मरा" चा कार्यक्रम सांगणारा एक कागद पडला होता तो असा:—

"Our chief task is to keep up the enthusiasm witnessed in urban India on the day of the arrest of Gandhiji and other leaders. The essential consideration is time. Not only we have to show what we are worth within two to four weeks, but that our rural and urban movement should be so coordinated and timed together that the Government may not already have crushed the one before the other is ready to meet with the same fate.

The village population should be encouraged to declare at public meetings and elsewhere that they are free and that the laws, taxation and the police and other arrangements of foreign Government no longer bind them. The beginning of such meetings may be made in the smallest unit. but the activity must soon develop into freedom and fraternity processions marching from one village to another. All this is intended to lead to the bigger meeting of, say, ten or twenty villages. Once the people are roused, their energies must be given a definite task. In

the present circumstances, this can be nothing else than non-violent raids of thousands of people on the symbols and centres of British authority, the Thanas and Tahshils. These must be put out to action. The police and other government servants should be invited, in the first instance, to accept the authority of the people or, on their refusal to do so, should be dispossessed both of their weapons and their governmental positions. ( 1 ) Such raids should take place in the best-awakened and organised two or three Tahsils of any one district and care should be taken not to select such areas in which there is friction of any kind. ( 2 ) Not only must these raids be timed together in the same district but throughout the province, at least in the majority of the districts where the Congress message has reached best. The culminating point of these raids will be reached when the spontaneously awakened but organised energies of the people in their thousands raid the district headquarters. The Government machinery will then not only be paralysed but shattered. At this moment, or in the process a parallel authority of the people will be formed. This will be beginning of the Free Indian State. Efforts should be made to time together, as far as possible, the paralysis of the existing Government machinery in all the provinces. The climax of this paralysis should be designed to reach in four weeks from now.

The Instructions are as follows :—

( 1 ) To canalise the spontaneous outbursts of the people, an organised form should be given to it. An authoritative call for a general strike till Gandhiji and other leaders are back among us throughout the country is hereby given and in the first twenty cities of India, efforts should be made to make it complete.

( a ) Colleges and Universities must close indefinitely till freedom is won and Gandhiji is back among us. The striking students will ( 1 ) lead the demonstrative action in the towns or ( 2 ) go into the villages to further our four weeks' programme.

( b ) All general offices such as wholesale trade, banks and other establishments must close and their clerical personnel

brought out. Retail shops with the exception of food and similar provisions must also be persuaded to close.

( c ) Stoppage of work in manufacturing industries, such as textiles and Engineering should be completed in the course of indefinite general strike and the workers brought out.

( 2 ) Efforts should be made to reach the workers and clerical staff in the transport industry such as railways and docks and in the Government agencies such as post and telephone and radio and in the electricity producing and distributing plants, while the general strike in other spheres is maturing. When culminating point of the general strike is reached, say three or four weeks from now, the call of strike should be given to this other category of workers and clerks.

( 3 ) Care should be taken to see that the climex of the movement both in rural and urban India is reached in four weeks from now.

There is also a problem of the technical work of our revolution. Two things must be borne in mind : ( i ) These activities should never be looked upon as independent. They must in every event be subordinate to mass action. ( ii ) None of the activities should be such as to endanger human life, whether Indian or British and warnings should always be issued.

Again now shall we infuse in our people the determination to face firings and yet not to retaliate in kind. In the earlier stages, hundreds will have to be ready to die.

Appeal should be made to the Military and the Police through leaflets and personal approaches and brave encounters in the midst of an awakened and awkward situation. Indians among Government forces should in the first instance, be asked to regard themselves as free men and to refuse to submit to foreign authority and to come over to the Indien revolution. If they cannot do this, they should, in the second instance, be asked not to shoot at their own defenceless people fighting for their freedom, as much as their own. Appeals not to shoot may also be addressed to British and American soldiers, although

the emphasis here will not be on national freedom but on human Freedom and Peace all over the world.

**Mahatma Gandhiji's Message to Free India :—**

EVERY MAN IS FREE TO GO THE FULLEST LENGTH UNDER AHIMSA

'Complete Deadlock by strikes and other possible Non-violent Means.'

KARENGE YA MARENGE—DO OR DIE.

How will you implement this Message ?

( 1 ) Acknowledge no authority save that of the people.

( 2 ) All Factories, Mills, Colleges, Markets etc. must remain closed till freedom is won.

( 3 ) Do no co-operation with the Government.

( 4 ) Persuade Police to disobey Government orders.

( 5 ) Destroy Telephone and Telegraph Connections.

( 6 ) Dislocate Government Machinery.

( 7 ) Dislocate Tram and Bus Services.

( 8 ) Picquet Government offices and do not allow the Government machinery to function at any cost.

( 9 ) Circulate by all possible means as wall-writings, ground-writings, mouth-to-mouth propaganda, hand-writing leaflets etc. news regarding the uprising and the rebellion of the people in any part of the country against the Government.

(10) Capture the college premises and take charge of the administration and keep them closed till the Government ( British ) withdraw."

या कागदाचाहि समजला, उमगला, ऐकला तेवढा अर्थ लक्षांत घेऊन खेडुतांपासून शहऱ्यांपर्यंत आणि नमत्यापासून दुमत्या राजकीय पक्षापर्यंत सर्वांनींच ' चले जाव 'च्या चळवळींत आपापल्या परीनें, पर्यायानें, प्रसंगानें, प्रकर्षानें आणि पराक्रमानें भाग घेतला. कारण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची आंच ज्या ज्या पोटांत होती, तें तें पोट आपल्या धन्याला स्वस्थ बसूं देईना. त्यांतहि देशांतील उमलत्या पिढीनें जो उत्साह दाखविला होता, तो केवळ स्पृहणीय होता. व्यापारी मंडळींनीं व उद्योगपतींनींच नव्हे तर साध्यासुध्या रस्त्यावरील माणसांनींहि चळवळीला भरपूर रसद पुरविली.

महायुद्धाच्या अडचणी-अडथळ्यांमुळें पोटभर अन्न किंवा अंगभर वस्त्र तर राहोच, पण तीं दोन्ही कशीं मिळतील याची चिंता सर्वत्र होती. त्यामुळेंहि ब्रिटिश राजवटीविषयीं लोकांची सहानुभूति शून्याकार होऊं लागली होती. वरचेवर निघणाऱ्या वटहुकमांनीं लोकांचे मुलकी हक्क संकुचित होत होत धान्यांची गल्लामिळवणी, युद्धनिधीची जमवाजमव, रंगरूटभरतीचा तडाखा या सक्तीच्या सरकारी दंडकांनीं लोकांत एक तऱ्हेचा कडवा भकासपणा आला होता. 'चले जाव'ची घोषणा या सगळ्यांवर चमक मारून गेली. 'आतां होणारा लढा निकराचा व शेवटचा ठरणारा आहे. आपल्या सर्व संस्थांनीं व कार्यकर्त्यांनीं आपल्याजवळचें आहे नाहीं तें सर्व पणास लावलें पाहिजे' असा जो इशारा सरदार पटेलांनीं १९४२ च्या एका चरखा-संघाच्या सभेंत दिला होता, तो सरळ सरळ लोकांच्या लक्षांत होता. त्यास लोक अनुसरले.

साहजिकच वेडावलेल्या आणि म्हणूनच बेभान इंग्रजी राजवटीनें लोकांची चळवळ दडपण्याचा आटापीटा केला. हजारों लोकांस स्थानबद्ध केलें, कित्येक शेकडोंना न्यायमंदिरांतून शिक्षा ठोठावल्या, गोळीबार करून कांहींना यमसदनाला पाठविलें, तर कांहींना जन्माचें जायबंदी केलें. दंडाच्या रकमा हजारोंवर गोळा केल्या, सामुदायिक दंड बसविले, चळवळ्यांच्या नातेवाइकांना, आप्तेष्टांना झडत्या-चौकशांनीं व बंदिवासानें सतावून सोडलें. तेव्हां लोकहि उघड उघड बोलूं लागले कीं, 'शुरु हुआ है जंग हमारा।'

या जंगपासून समाज म्हणून मुसलमान व डॉ. आंबेडकरांचे अनुयायी हरिजन अलिप्तच राहिले. नेमस्त प्रकृतीच्या पुढाऱ्यांनीं व चक्रवर्ती राजगोपालाचारिअरांसारख्या कॉंग्रेस-पुढाऱ्यांनीं उच्छृंखल प्रवृत्तीच्या चळवळी-बद्दल नाकेंच मुरडलीं होतीं. तथापि राजकीय प्रगतीबद्दल लोकांच्या झालेल्या निराशेंतून व एकंदर जीवनाला आलेल्या भकासपणांतून कांहीं मार्ग काढा-वयाचा तर महात्माजींशीं विचारविनिमय करून मार्ग काढला पाहिजे, अशी पुष्कळांची खात्री झाली. अर्थातच श्यामाप्रसाद मुकर्जी व राजाजी यांनीं तसें सरकारास सुचवून महात्माजींच्या मुलाखतीचा प्रयत्न केला; पण सरकारनें ती गोष्ट घडूंच दिली नाहीं.

तेव्हां हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर वैफल्यवादाशिवाय कांहीं कीं कांहीं आढळेना. तेव्हां लढाऊ वृत्तीच्या विधायक कार्यकर्त्यांना स्वतंत्र हिंदुस्थानचे स्वतंत्र नागरिक म्हणून वागण्याकरितां गुप्त राहूनहि प्रतिसरकार स्थापण्याचीं स्वप्नें पडूं लागलीं. कैसरी कंदनाप्रमाणेंच (१९१४-१९१८) हिटलरी होरपळ ही इंग्लंड-जर्मनीचीच लढत होती. पण दीनदुबळ्या देशांच्या

स्वातंत्र्यासाठीं आम्ही लढत आहों, असा डिंडिम दोघेहि वाजवीत होते. इंग्लंडला हिंदुस्थानचा सवाल १९०४ पासूनच होता कीं, कोणत्या नैतिक हक्कानें हिंदुस्थानला तुम्हीं परतंत्र ठेवतां ? हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर इंग्लंडचा लढाईतील सच्चेपणा तरी भारतीयांना व जगाला पटेल आणि मगच भारतीय इंग्रजांचे सहकारीहि होतील. इंग्रजी साम्राज्यशाहीला आपलें धोरण सोडावयाचें नव्हतें. उताला आलेल्या हिटलरी होरपळींत शत्रूचा मोड करण्याचे कांहीं उपाय प्रचलित होते. शत्रूची रसद तोडावयाची आणि वाहतुकीचीं साधनें नाहींशीं करावयाचीं हे मार्ग तर अवलंबिले जातच होते; पण त्यांतून शत्रु दारांत आलाच तर आपल्या उभाराच्या वस्तु त्याला उपयोगी पडूं नयेत, म्हणून त्यांचाहि नाश करावयाचा, याहि मार्गाचा अवलंब होत होताच. चळवळीच्या गुप्त्यांपुढें या सर्व गोष्टी होत्या. शिवाय कोणत्याहि देशांत परकीय सत्ता जगते, ती चहाडखोरांवर जगते. त्या चहाडखोरांचाहि बंदोबस्त करण्याचें गुप्त्यांनीं मनावर घेतलें. ' कोणाहि जीवाचा न घडो मत्सर ।' या व्रतानें गुप्ते प्रतिसरकार स्थापण्याच्या मार्गास लागले. ( कु. प्रेमा कंटक यांचा ' सत्याग्रही महाराष्ट्र' पाहा. ) औन्ध संस्थानांत महात्माजींच्या सल्लामसलतीनें सुरू झालेला ग्रामराज्याचा प्रयोग लक्षांत घेऊन लोकशाही स्वराज्याचा विकास तळापासून झाला पाहिजे म्हणून गुप्त्यांनीं साधेल तेथें ग्रामराज्यें स्थापण्याचा सपाटा चालविला. १९४४ च्या मध्यापर्यंत या ग्रामराज्यांमार्फत —

१ दारूबंदी, २ व्यायाममंडळें, ३ अत्याचारांपासून स्त्रियांचें संरक्षण, ४ गुंड व दरोडेखोरांचा बंदोबस्त, ५ आटोपशीर खर्चांत विवाहादि संस्कार, ६ सहा टक्के सावकारी व्याजदराचें नियंत्रण, ७ काळाबाजारासह नफेबाजीचा बीमोड, ८ सहकारी चळवळ, ९ अस्पृश्यता–निवारण, १० स्त्री-समाज-जागृति, ११ सेवादलें, १२ सैनिक-संघटन, १३ राष्ट्रभाषा-प्रचार, १४ वस्त्रस्वावलंबन, १५ साक्षरताप्रचार, १६ राष्ट्रीय बौद्धिकें, १७ बलोपासना, १८आरोग्य-संवर्धन, १९ अन्न-पुरवठा, २० जाती-जातींतील ऐक्य.

या गोष्टीपैकीं जितक्या साधतां येतील तितक्या विधायकपणें साधण्याचा प्रयत्न तर गुप्ते करीत होतेच, त्याशिवायहि कोठें खासगत वा सार्वजनिक संघर्ष आला तर त्याचा निर्णय लवादामार्फत घेण्यांत येई.

सरकारविरुद्धच्या उठावाची ही विधायकपणें आक्रमक चळवळ सातारा जिल्ह्याच्या पांच तालुक्यांत सुरू झाली आणि ग्रामराज्याचा प्रसार कसाबसा सर्व जिल्ह्याभरीच्या पांचशें गांवांपर्यंत रेटला गेला. पैकीं सुमारें पाऊणशें गांवांतच तो यशस्वी झाला. सातारा जिल्ह्याप्रमाणेंच उत्तरेंत मिदनापूर व बालिया

जिल्ह्यांतहि 'ग्रामजनपदें' काम करीत होतीं. क्रांतीची संपूर्ण कल्पना जनतेला नसल्यानें व तीच मुळांत राजकारणी अज्ञानानें ग्रस्त असल्यामुळें, आणि त्यापेक्षां ग्रामराज्यें गुप्त्यांच्या मार्फत चालत असल्याकारणानें, कांहीं ठिकाणीं ग्रामराज्याच्या शिस्तीचा कायदाहि कित्येक वेळां कांहीं स्वार्थ्यांनीं गुप्त्यांच्या गैरहजेरींत हातीं घेतला, ही गोष्ट खरी ! पण कायद्यानें प्रस्थापित झालेली इंग्रजी राजवट वरील तीन जिल्ह्यांत आहे कीं नाहीं, अशा संशयानें ब्रिटिश साम्राज्यशाहीचे रखवालदार पिसाळले होते हें लक्षांत घेतलें तर त्या 'विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणीं। कळे गुप्त्यांची ती त्वरित शर-संधान-करणी ॥' असें अभ्यासकास मान्य करावें लागेल.

जुलै १९४३ पर्यंत उत्थापन होतांना ब्रिटिश राजवटीच्या इज्जतीला थोड्याफार उच्छृंखलपणेंच कमीपणा आणण्याचा प्रयत्न सर्वत्र झाला. तथापि १९४२ च्या डिसेंबरपासून सुरू झालेल्या ग्रामराज्यांच्या प्रस्थापनेच्या आस्ते-कदम मोहिमेनें जें विधायक व मर्मभेदक आक्रमण प्रस्थापित सरकारच्या प्रतिष्ठे-वर झालें, त्यानेंच (पहिल्या प्रत्यक्ष व आक्रमक उठावाचा पूर जुलै १९४३ मध्यें ओसरूनहि) जवळजवळ १९४५ अखेर हिन्दुस्थानांतील ब्रिटिश राजवटीला स्वास्थ्य नव्हतें.

पण सातारा, मिदनापूर व बालिया हे तीन जिल्हे म्हणजे 'येथून तेथून सारा' हिन्दुस्थान देश नव्हे; सरकारची दडपशाही आणि लोकांनीं चालवलेली चळवळ यांनीं १९४२ च्या अखेरीला दोन्ही बाजूंच्या ईर्षेनें हिन्दुस्थानच्या राजकारणांत 'विषाद-योग' सुरू झाला. त्यांतून मार्ग कसा काढावा हा मोठा पेंच होता. अशा अडचणलेल्या स्थितींत तारीख ९ फेब्रुवारी १९४३ रोजीं म्हणजे स्वतःला बंदी व्हावें लागल्यापासून बरोबर सहा महिन्यांनीं एकवीस दिवसांचें उपोषण करण्याचा संकल्प महात्माजींनीं जाहीर केला. त्यापूर्वींच महात्माजींनीं व्हाइसरॉयसाहेबांना पत्र लिहून आपला अनत्याचारा-वरील अढळ विश्वास प्रगट केला होता; सहाजिकच चळवळीच्या निमित्तानें सरकारनें अगर लोकांनीं केलेल्या अनत्याचाराला बाधक असणाऱ्या वर्तनाचा त्यांत निषेध होता; देशांतील चालणाऱ्या घडामोडीला गांधी व कॉंग्रेस जबाबदार असल्याचा जो सरकारचा आरोप होता, त्याचा त्या पत्रांत इन्कार होता; आणि आपल्या सहकारी अशा कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांशीं विचारविनिमय करून राजकीय पेंचप्रसंगावर तोडगा निघतो कीं काय हें पाहण्यास परवानगीहि मागितली होती.

या शेवटच्या बाबीसंबंधीं देशांत लोकमत अनुकूल होतें. कायदेमंडळांतील विरोधी पक्षानें हिंदुस्थान सरकारकडे गांधींच्या उपवासाच्या निमित्तानें कामकाजाच्या तहकुबीची सूचना धाडली होती आणि देशाच्या व्यापक राजकारणाच्या दृष्टीनें गांधींच्या सुटकेचीहि मागणी केली होती. दिल्लीला भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेनें तसाच ठरावहि केला. पण सरकार अचल होतें. तेव्हां महात्माजींच्या उपवासाबाबत मतभेद झाल्यानें व्हाइसरॉयांच्या कारभारी-मंडळांतील सर होमी मोदी, लोकनायक अणे आणि नलिनीरंजन सरकार यांनीं आपल्या जागांचे राजिनामे दिले. दरम्यान ४ मार्च रोजीं महात्माजींचा उपवास यशस्वीपणें पार पडला. मुंबईस अपक्ष परिषद होऊन तिच्या चालकांनीं महात्माजींची मुलाखत घेऊन प्राप्त परिस्थितींतून वाट काढण्यासाठीं व्हाइसरॉयची परवानगी मागितली. ती मिळाली नाहीं. त्यावर १९४३ च्या जुलैमध्यें सिंगापूरला आझाद-हिन्द-सरकारची स्थापना होऊनहि इकडे हिंदुस्थानांत एक वर्ष कांहीं हालचालींशिवाय गेलें. १९४३ च्या हिंवाळ्यांत मध्यवर्ती कायदे-मंडळांत हिंदुस्थानचा निरोप घेतांना तारीख २० ऑक्टोबर रोजीं लॉर्ड-लिनलिथगो यांनीं देखील आळिमिळी-गुपचिळी राखली होती. लॉर्ड वेव्हेल आले तरी १९४४ च्या ६ मेला प्रकृतीच्या कारणामुळें महात्माजींची सुटका होईपर्यंत, त्यांच्यांत व महात्माजींत झालेला पत्रव्यवहारहि फारसा कोणाच्या परिचयाचा नव्हता. आपण व काँग्रेस नाझीवादाच्या विरुद्ध असल्याचें त्यांत महात्माजींनीं सांगितलें होतें व हिंदुस्थानच्या राजकीय आणि आर्थिक प्रगतीसाठीं काँग्रेसनें असहकाराची वृत्ति टाकली पाहिजे, असा वेव्हेल यांचा आग्रह प्रगट झाला होता.

पण महात्माजींच्या सुटकेनंतर एकच महिन्यांत योगायोगानें एक चमत्कार घडून आला. तारीख ६ जून १९४४ रोजीं इंग्लिश खाडी तरून जाऊन दोस्तांचें सैन्य फ्रान्सच्या नॉर्मंडींत उतरलें. दक्षिण फ्रान्समध्येंहि दोस्तांचें सैन्य घुसलें. या दोन्ही सैन्यांच्या कचाटींत जर्मन सैन्य सांपडल्यानें जर्मनीला माघार घ्यावी लागली. त्याच वेळीं पूर्वेकडून रशियन जर्मनांवर तुटून पडले. तेथून युद्धास नवेंच वळण लागलें व ३ मे १९४५ ला युरोपांत युद्धाचा शेवट होऊन दोस्तांचा विजय झाला. साहाजिकच आशियांत जपानचा पराभव होऊन १० ऑगस्ट रोजीं हिटलरी होरपळीचा संपूर्ण शेवट झाला.

युद्ध संपलें तरी हिंदुस्थानांतील पेंचप्रसंग सुटला नव्हता. महात्माजी सुटल्यानंतर त्यांनीं व चक्रवर्ती राजगोपालाचारिअरांनीं बॅ. जिनांशीं समझोत्याचा प्रयत्न केला होता, पण व्यर्थ ! सर तेजबहादूर सप्रू यांनीं एक सर्वपक्षमान्य

योजना सुचविली. तीहि बारगळली. युरोपांत युद्धपरिस्थिति सुधारल्यापासूनच भारतीय राजकारणाची समस्या मार्गी करण्यासाठीं इंग्लंडच्या मागें अमेरिकेचा तगादा होताच. कारण युरोपांतील जर्मनीच्या पराभवापेक्षां जपानच्या पराभवाचें महत्त्व अमेरिकेला होतें. हिंदुस्थानच्या सहकारानेंच जपानचा पराभव सुलभ होईल असा अमेरिकेचा भरंवसा होता. तेव्हां सर्व परिस्थितीचा अभ्यास करून लॉर्ड वेव्हेल इंग्लंडमध्यें गेले. मे १९४५ मध्यें आणि युरोपांत युद्धाचा शेवट झाल्यावर, त्यांनीं परत हिंदुस्थानांत येऊन आपली एक योजना जाहीर केली. त्यापूर्वीच बहुधा सर्व काँग्रेस पुढाऱ्यांची मुक्तता झाली होती. इंग्लंड-मध्यें नव्या निवडणुका होऊन ॲटली यांचें मजूरमंत्रिमंडळ सत्ताधारी झालें होतें. त्याला, तारीख २५ जून १९४५ रोजीं भरलेली सिमला-परिषद १४ जुलैपर्यंत चालून तींत वेव्हेल–योजना बारगळल्याचें कळलें. (१) व्हाइसरॉय व सेनापति यांच्याशिवाय हिंदुस्थान सरकारचें कारभारी मंडळ समसमान हिंदु व मुसलमान भारतीयांचें असावयाचें. (२) ब्रिटनच्या व्यापारी हितसंबंधा-साठीं ब्रिटिश हायकमिशनर नेमावयाचा. (३) युद्धोत्तर नवी घटना होईपर्यंत या योजनेप्रमाणेंच कारभार चालवावयाचा अशी थोडक्यांत ती कल्पना होती.

सिमला-परिषदेनंतर काँग्रेस-संस्थावरील बंदी उठली आणि काँग्रेसचें कार्य पूर्ववत् सुरू झालें. चळवळींत ज्यांनीं राष्ट्रतेज प्रगट केलें आणि दडपशाहीला बळी पडून जे हुतात्मे झाले, त्यांचा पं. जवाहरलाल नेहरूंनीं गौरव केला; तथापि काँग्रेसनें आपलें अनत्याचाराचें धोरण बिलकुल सोडलेलें नाहीं हेंहि डिसेंबर १९४५ मध्यें मुंबईस भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीनें स्पष्ट उद्‌घोषित केलें. ह्या अगोदर इंग्लंडांतील अधिकारारूढ मजूरपक्षानें हिंदुस्थानांत नव्या निवडणुका घेतल्यानंतर हिंदुस्थानचा प्रश्न समाधानकारकरीत्या सोडविण्याचें जाहीर केलेंच होतें.

## ५

★

# 'चलो दिल्ली' साठीं सशस्त्र उठाव

हिंदुस्थानचा प्रश्न नव्या निवडणुकांनंतर समाधानकारकरीत्या सोडविण्याचें ब्रिटिशमंत्रिमंडळानें जाहीर केलें, याला जागतिक दुसऱ्या महायुद्धांतील विजयानें इंग्लंडच्या मनांत उद्भवलेला उदारपणा कारण होता, असें समजण्याचें कारण नाहीं. त्याप्रमाणेंच १९४२–१९४५ मध्यें जी 'चले जाव'ची तीव्र चळवळ काँग्रेसनें केली तेवढीच कारण झाली असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. तर 'चले जाव'ची चळवळ जागतिक युद्धहेतूला धरून अशा मोक्यावर झाली कीं, ज्यामुळें असंतुष्ट भारतांतील बुद्धिशाली शक्ति 'प्राणांस्त्यक्त्वा धनानि च।' अशी स्वराज्याची चळवळ करावयास भारतीयांना लावूं शकते, हें ब्रिटनच्या प्रत्ययाला आलें. (इंडिया, १९५६ पहा.) 'चले जाव'च्या चळवळीसारखा ब्रिटनला आलेला दुसरा प्रत्यय म्हणजे दे. सुभाषचन्द्र बोसांची आझाद हिंद सैन्याची उभारणी होय.

"१९२१ सालीं विद्यापीठांतून बाहेर पडल्यापासून स्वातंत्र्याच्या आंदोलनांत मी सतत सक्रिय भाग घेत आलों आहे. गेल्या वीस वर्षांत झालेल्या कायदेभंगाच्या सर्व मोहिमांतून मी गेलेलों आहे. त्याशिवाय देशांत ज्या गुप्त क्रांतिकारक चळवळी झाल्या, मग त्या अत्याचारी असोत वा अनत्याचारी असोत, त्यांच्याशीं संबंध असल्याच्या संशयानें सरकारनें विनाचौकशी मला पुन्हां पुन्हां तुरुंगांत डांबलें आहे. यत्किंचितहि अतिशयोक्ति न करतां, मी असें म्हणूं शकतों कीं, या बाबतींत मी जितका विविध अनुभव घेतला आहे, तितका अनुभव दुसऱ्या कोणत्याहि राजकीय पुढाऱ्यानें घेतला नाहीं. या अनुभवामुळेंच माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, देशांतल्या

देशांत कितीहि प्रयत्न आपण केले तरी ते पुरेसे होणार नाहींत.' तारीख ९ जुलै १९४३ रोजीं सिंगापूर येथें नेताजी सुभाषचन्द्र यांनीं वरील तऱ्हेचें भाषण करतांना आणखी हेंहि स्पष्ट केलें कीं, 'हिंदुस्थान इतर सर्व दृष्टींनीं जरी स्वातंत्र्याला पात्र झालेलें असलें तरी एका गोष्टीची मात्र त्याला उणीव आहे. ती म्हणजे स्वतंत्र सैन्य !' पुढें नेताजींनीं जगाला स्पष्ट सांगितलें कीं, 'हिंदुस्थान सोडून बाहेर जाण्यांत माझा उद्देश हा होता कीं, देशांतील चळवळीला बाहेरील चळवळीची जोड द्यावी. सर्वसमर्थ ब्रिटिश सरकार जर युद्धसाहाय्यासाठीं जगापुढें पदर पसरूं शकतें, तर आपण अनिवार्यच झाल्यास बाहेरची मदत घेण्यांत कांहीं गौण वा गैर नाहीं. हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोक जर आपल्या कर्तव्याला जागले तर, ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतून उच्चाटन करणें त्यांना शक्य आहे."

'वुइथ दि इंडियन्स् इन् फ्रान्स' या जेम्स विलकॉक्सच्या पुस्तकावरून आणि इंडियन न्यूज रिव्ह्यू या नियतकालिकावरून दोनहि जागतिक महायुद्धांत इंग्रजांना विजय मिळवून देण्यांत भारतीय सैनिकांचा केवढा मोठा हिस्सा आहे, तें प्रत्ययाला येतें. अशा पराक्रमी भारतीयांपैकीं जे इंग्लंडच्या शत्रुराष्ट्राकडे युद्ध-कैदी होऊन पडले व जे भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं लढावयास तयार होतील त्यांना नेतृत्व द्यावें म्हणून सुभाषचन्द्र १९४१ सालीं हिंदुस्थानांतून अदृश्य झाले. आपण तशा तऱ्हेनें उभारलेल्या आझाद हिंद सैन्यास जर्मनी-जपानची मान्यता घेऊन, भारताच्या पूर्व किनाऱ्यावर उतरून भारतीयांना 'चलो दिल्ली' म्हणण्याचा व त्यांच्याकडून तसें करविण्याचा घाट नेताजींनीं घातला. हिंदुस्थानांतील मनोवृत्ति त्या घाटास अनुकूल रहावी म्हणून सिंगापूर-रेडिओ स्टेशन सुरू केलें. तेथून ते 'चलो दिल्ली'चा संदेश नित्य देऊं लागले. त्यानंतर १९४३ सालीं स्वतंत्र हिंदुस्थानचें तात्पुरतें सरकार निर्माण करून आपल्या नेतृत्वाखालीं एक मंत्रिमंडळ निवडलें. या स्वतंत्र हिंदी सरकारनें दोस्तांविरुद्ध युद्ध पुकारून दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानचें निशाण फडकविण्याचा घाट घातला. जगांतील तेरा राष्ट्रांची मान्यताहि नेताजींनीं स्वतंत्र हिन्दी सरकारला मिळविली होती. आसामच्या सरहद्दीवर जपानी सैन्य उतरण्याचा व मद्रासच्या बाजूनें आझाद सैन्य 'चलो दिल्ली'चा घोष करीत जाण्याचा घाटहि जुळत आला होता. १९४४ च्या टिळक पुण्यतिथीस नेताजींनीं मार्गदर्शन केलें कीं, 'काँग्रेसच्या ऑगस्ट १९४२ च्या ठरावाप्रमाणें इंग्रज महात्मा गांधींशीं समझोता करून शांततेनें हिंदुस्थान सोडून गेले तर आझाद-हिंद-सैन्य विसर्जित होईल. नाहींतर ब्रिटिशांना वठणीवर आणावयास आपली लष्करी योजना यशस्वी होणें

आवश्यक आहे. ' जॉर्ज वॉशिंग्टननें जशी अमेरिका स्वतंत्र केली तसा भारत आपण स्वतंत्र करणार असा सुभाषबाबूंचा विश्वास होता.

हें सर्व करतांना कोणत्याहि देशाचें कसें सहाय्य घेतलें तरी संग्रामाचें व स्वातंत्र्याचें नेतृत्व कसल्याहि परिस्थितींत हिन्दी पुढाऱ्यांच्याच हातीं ठेवावयाचें व त्यांच्या परवानगीशिवाय कोणाहि परकीयाला हिंदभूमीवर पाय ठेवतां यावयचा नाहीं, असें नेताजींचें बिरुद होतें. आशिया खंडांत जपान बलाढ्य होता. त्यानें ईस्ट इंडिज बेटें, सयाम, मलाया, ब्रह्मदेश वगैरे जिंकून चीनचाहि मोठा प्रदेश व्यापला होता. १९४४ मध्यें इंफाल–कोहिमाजवळ जपाननें घनचक्कर लढाई सुरू केली. त्यांत जपानचा पराभव झाला. तरीहि जपान ऐकेना. तेव्हां ६ ऑगस्ट १९४५ रोजीं हिरोशिमा या जपानी शहरावर व तारीख ९ ऑगस्ट रोजीं नागासाकी या बंदरावर अमेरिकेनें अणुबॉंब टाकले. अखेर तारीख १० ऑगस्ट १९४५ रोजीं जपाननें शरणागति पत्करली. त्याच सालीं नेताजी विमान-अपघातानें परलोकवासी झाले. तरी पण ' मिशन् वुइथ मौंटबॅटन ' या ग्रंथांत एलन् कँबेल जॉनसन् यानें वर्णन केल्याप्रमाणें ' लोक बंड करून उठलेले, संस्थानिकांतील कित्येक एकमेकांवर तुटून पडणारे, एकंदर मुलकी नोकरशाही आणि रक्षकदल घसरगुंडीला लागलेलें व ब्रिटिश अधिकारी आत्मविश्वासशून्य नि भीषणभवितव्यवादी बनलेले, ' त्यामुळें हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोकांच्या उठावानें ' भयचकित ' झालेल्या इंग्रजांना राज्यकर्ते म्हणून हिंदुस्थानांत नांदावयास आणि लोकइच्छेविरुद्ध भारतांत साम्राज्य टिकवून जगांत स्वतःची प्रतिष्ठा राखण्यास युद्धांतील विजयप्राप्तीनेंहि अवसान उरलें नाहीं. त्यांतून १९४५ सालीं मुंबईला आरमारी संप सुरू झाला. तोहि बदललेल्या वातावरणाचा गमक होता. त्यानें एकदम १८५७ सालची आठवण करून दिली. म्हणून मजूरमंत्रिमंडळ इंग्लंडांत स्थापन होतांच हिंदुस्थानांत नव्या निवडणुका घेऊन हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्याचा संकल्प झाला व तसें जाहीर करण्यांत आलें.

● ● ●

६

★

## स्वातंत्र्याचें झुंजुमुंजु

हिंदुस्थानांतील निवडणुका १९४५ च्या नोव्हेंबरपासून १९४६ च्या फेब्रुवारीअखेर संपल्या आणि अकरापैकीं आठ राष्ट्रांत काँग्रेस बहुमतानें निवडून आली. १९४६ च्या सुरवातीस पार्लमेंटचे दहा सभासद हिंदुस्थानांत आले व दोन महिने प्रत्यक्ष परिस्थिति पाहून त्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटला आपलें इतिवृत्त सादर केलें. निवडणुकीपूर्वींपासूनच सैन्य-आरमारापासून सामान्य माणसापर्यंत प्रत्येकजण भारतीय स्वातंत्र्यासाठीं उत्सुक होता नि त्यामुळेंच काँग्रेसच्या पाठीशींहि होता, असा काँग्रेसच्या अध्यक्षांच्या फिरतींतील अनुभव होता. त्याचाच प्रत्यय ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांना आला असावा ! तेव्हां १९ फेब्रुवारी १९४६ या नामदार गोखल्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं ब्रिटिश पार्लमेंटांत घोषणा करण्यांत आली कीं, ब्रिटिश मंत्रिमंडळांतील तीन मंत्री हिंदुस्थानांत जाऊन हिंदुस्थानची भावी राज्यघटना हिंदी लोकांच्या इच्छेप्रमाणें घडवून आणण्यास ते मदत करतील. त्याप्रमाणें भारतमंत्री लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स व अलेक्झांडर हे तीन मंत्री तारीख २३ मार्च १९४६ या दिवशीं हिंदुस्थानांत आले. त्यांनीं काँग्रेस, मुस्लिमलीग, हिंदुमहासभा व इतर पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या आणि १६ मे १९४६ रोजीं एक योजना जाहीर केली. त्या 'त्रिमंत्रियोजनेंत' अशी व्यवस्था होती कीं, (१) हिंदुस्थानची घटना निश्चित तयार होण्याच्या काळांत एक मध्यवर्ती हंगामी सरकार असावें. (२) हिंदुस्थान अखंड रहावा; कारण आर्थिक, लष्करी व कारभारविषयक दृष्टीनें पाहतां पाकिस्तान-योजना अव्यवहार्य आहे. (३) हिंदुस्थान व संस्थानें यांचे अंतिम संबंध कसे असावेत हें घटना-समितीनें

ठरवावें. (४) ब्रिटिशशासित हिंदुस्थान व संस्थानें यांचें एक संघराज्य असावें. (५) मध्यवर्ती संघराज्य-सरकारकडे परराष्ट्रीय संबंध, संरक्षण व वाहतूक हीं खातीं ठेवून त्याकरितां लागणारा पैसा उभा करण्याचा अधिकार त्या सरकारला असावा. (६) संघराज्य-सरकारकडे असलेल्या खात्यांखेरीज इतर सर्व खातीं शेषाधिकारांसह प्रांतिक सरकारांकडे व संस्थानांकडे रहावींत. (७) प्रांतांना गट बनविण्याचा व आनुषंगिक विधिमंडळें नि कारभारमंडळें बनविण्याचा अधिकार असावा. (८) संघराज्याच्या मध्यवर्ती विधिमंडळांत संस्थानांसुद्धां सर्वांचे प्रतिनिधि असावेत. (९) एक घटना-परिषद् नेमावी. (१०) संघराज्यांच्या व गटाच्या घटनेंत फेरबदल करण्याची वा त्यांतून बाहेर पडण्याची मुभा प्रांताला दहा वर्षांच्या अंतरानें असावी. प्रौढ मतदानपद्धतीनें घटना-समितीची निवड करणें जरूर असलें तर विलंब टाळण्यासाठीं त्रिमंत्र्यांनीं पुढीलप्रमाणें घटनासमिती सुचविली —(१) दहा लाख लोकसंख्येस एक याप्रमाणें प्रत्येक प्रांताला प्रतिनिधित्व मिळावें. (२.) प्रत्येक प्रांतांतील प्रमुख जमातीच्या लोकसंख्येप्रमाणें सभासदांची विभागणी व्हावी. या निवडणुकीसाठीं सर्वसाधारण, मुस्लिम व शीख अशा तीन जमाती समजाव्यात. अल्पसंख्याकांनीं सर्वसाधारण जमातीबरोबर मतें द्यावींत. अल्पसंख्याकांच्या बाबतींत घटनासमितीस एक सल्लागारमंडळ असावें. (३) प्रांतिक विधिमंडळांचे व संस्थानांचे प्रतिनिधी तीन गटांनीं घ्यावेत — मद्रास, मुंबई, संयुक्तप्रांत, बिहार, मध्यप्रांत व ओरिसा यांचा 'अ' गट; पंजाब, वायव्य सरहद्दप्रांत व सिंध यांचा 'ब' गट आणि बंगाल–आसामचा 'क' गट. या तिन्ही गटांनीं आपापल्या घटना ठरवावयाच्या. गटांतून फुटण्याचा हक्क प्रांतास राहील. (४.) प्रांतिक गटांच्या घटना एकदां निश्चित झाल्या कीं, मग घटनासमितीचे तिन्ही विभाग संस्थानी प्रतिनिधींसह संघराज्याची घटना ठरवितील. (५) घटनासमितींत जातीय प्रश्नांचा निर्णय त्या प्रमुख जमातींपैकीं हजर सभासदांच्या बहुमतास मान देऊन बहुमतानें लागेल.

अशी त्रिमंत्रियोजना जाहीर झाल्यावर तारीख १६ जूनला लॉर्ड वेव्हेल यांनीं हंगामी अशा मध्यवर्ती सरकारची व त्या सरकारांत समाविष्ट करावयाच्या चौदा मंत्र्यांचीं नांवें जाहीर केलीं. मुस्लिम लीगला कॉंग्रेसच्या बरोबरीनें प्रतिनिधित्व दिल्यानें कॉंग्रेसनें मान्यता दिली नाहीं. भारतमंत्री लॉर्ड पेट्रिक लॉरेन्स हे तारीख १८ जुलै १९४६ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटांत म्हणाले कीं, 'कॉंग्रेसला अखंड व अविभाज्य हिंदुस्थान हवा आहे तर हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन तुकडे पाडले जावे, असा मुसलमानांचा दावा आहे.' दरम्यान पं. नेहरू व बॅ. जिना यांचा पत्रव्यवहार होऊन एकोणीसशें सोळाच्या लखनौ पॅक्ट-

सारखी कांहीं योजना निघते का, हें पहाण्याचा प्रयत्न झाला. पण जिनांच्या प्रोत्साहनानें १६ ऑगस्ट १९४६ पासून रक्तरंजित जे दंगे झाले त्यापुढें हात टेकण्याची पाळी महात्माजींच्या दंगलभागांतील दौऱ्यानंतरहि आल्यावर, कॉंग्रेसनें हंगामी सरकारची योजना मान्य केली.

तेव्हां सरळच ऑगस्ट १९४६ मध्यें लॉर्ड वेव्हेल यांनीं पं. नेहरूंना हंगामी मंत्रिमंडळ बनविण्यास १९१९ च्या मॉंटफर्ड सुधारणा–कायद्याप्रमाणें निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें २ सप्टेंबरपासून हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झालें. तारीख ७ सप्टेंबरच्या निवेदनांत पंडितजी म्हणाले, 'हंगामी सरकार हें संपूर्ण स्वातंत्र्याच्या मार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्वातंत्र्य हें भारताच्या सर्व जनतेसाठीं आहे. स्वातंत्र्याच्या योजनेचा हंगामी सरकार हा एक भाग असून घटनासमिति हा दुसरा भाग आहे. तीमधून स्वतंत्र भारताची घटना लौकरच तयार होईल. जागतिक शांतता व इतर राष्ट्रांशीं सलोखा वाढविण्याचें आम्ही प्रयत्न करूं. अस्पृश्यतेसारख्या शापाविरुद्ध आम्ही लढत राहूं. भारतभर दोन जमातींत उसळलेल्या विरोधी भावना नष्ट करणें जरूर आहे. आम्ही सहकारासाठीं दरवाजा खुला ठेवलाच आहे."

या धोरणानेंच आठ प्रांतांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळांचा राज्यकारभार मार्च १९४६ पासूनच सुरू झाला होता. सिंध व बंगालमध्यें मुस्लिम-लीगचीं मंत्रिमंडळें होतीं व पंजाबमध्यें कॉंग्रेसचे अध्यक्ष मौ. आझाद यांनीं युनिअनिस्ट पक्षांशीं हातमिळवणी केल्यानें, कॉंग्रेस-युनिअनिस्ट असें संमिश्र मंत्रिमंडळ होतें. कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें रीतसर काम करूं लागल्याबरोबर त्यांना राजबंद्यांबद्दल प्रथम विचार करणें अगत्याचें वाटलें. राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां ज्यांनीं हातावर शिरें घेऊन अघोरी शिक्षा भोगावयास तयारी दाखविली किंवा जे गुप्त होऊन प्रतिसरकार स्थापावयाचा प्रयत्न करीत होते, आणि तसें करतांना 'शूराची अहिंसा' ज्यांना निभली नाहीं, ते देशाच्या स्वातंत्र्याकरितांच धडपडले, हें जाणून त्यांच्यासुद्धां शिक्षा भोगत असलेले सगळे देशभक्त शांततामय व स्वस्थ जीवनासाठीं बंधमुक्त करणें हें कॉंग्रेस-मंत्रिमंडळाचें कर्तव्यच होतें. त्यांनीं तें केलें. एका महिन्यांत हें काम उरकल्यावर १९३७-३९ सालांतील कामकाजाच्या धर्तीवर 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' असा कायदेशीर कारभार दक्षतेनें सुरूं झाला. त्यानें लोकांचें समाधान थोडेंफार होत असलें तरी स्वातंत्र्याच्या मुख्य प्रश्नावरून त्यांचें लक्ष चळलें नव्हतें. त्यामुळें हंगामी राष्ट्रीय सरकारांत मुस्लिम लीग सामील न झाल्याकारणानें, राष्ट्रीय मुसलमानांना घेऊन राज्यकारभार करणाऱ्या पं. नेहरूंच्या द्वारां होणाऱ्या स्वातंत्र्याकडील वाटचालीवर भारतीयांचें

व जगाचें लक्ष होतें. १५ एप्रिल १९४६ रोजींच काँग्रेसचे अध्यक्ष यांनीं पाकिस्तानच्या कल्पनेंतील वैफल्य व घातकपणा नि मुस्लिमांनाहि भोंवणारी नुकसानी यांचें दिग्दर्शन एका पत्रकाद्वारें केलें होतें. व्हाइसरॉयनीं बॅ. जिनांशीं बोलणीं केलीं व भोपाळच्या नबाबांनीं काँग्रेस व लीग यांची तडजोड व्हावी म्हणून खटपटीस बसून धडपड केली. पण घटनापरिषदेंत भाग घेण्याचें कबूल करण्यापलीकडे मुस्लिम लीगचें कांहीं कळेच ना ! तिनें कलकत्ता व नौखाली येथें प्रतिकाराची चळवळ मात्र चालविली होती. तेव्हां व्हाइसरॉयनीं कानमंत्र देतांच १९४६ च्या ऑक्टोबरपासून मुस्लिम लीगचे मंत्रीहि हंगामी राष्ट्रीय सरकारांत आले.

मुस्लिम लीगच्या मंत्र्यांकडे कांहीं महत्त्वाचीं खातीं देऊनहि ते 'किंग्ज् पार्टी' अथवा राजपक्ष म्हणून वागत. ते मंत्रिमंडळाची एकसूत्रता वा सहकारसज्जनता पाळीत नव्हते. काँग्रेसमंत्री सामुदायिक जबाबदारीचें तत्त्व पहिल्यापासूनच पाळीत; पण मुस्लिम लीगच्या मंत्र्यांच्या वृत्तीमुळें बंगाल-पंजाबमध्यें दंगे झाले; हिन्दु–शीख चिडले व अराजक माजल्यानें हंगामी राष्ट्रीय सरकार कमकुवतच ठरलें. तारीख ९ डिसेंबर १९४६ रोजीं घटनासमितीचें काम सुरू करावयाचेंच असा ब्रिटिश सरकारचा निश्चय असल्याकारणानें, ब्रिटिश मंत्रिमंडळानें व्हाइसरॉय, पं. नेहरू, जिना वगैरेंना लंडनला बोलावलें. तेथें वाटाघाटी करून काँग्रेस-लीग तडजोड झाली नाहीं. तेव्हां ब्रिटिश सरकारनें पत्रक काढून जाहीर केलें कीं, 'मोठया जमातींच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितींत घटनासमितीनें ठरविलेल्या घटनेची, तिच्याशीं सहमत नसलेल्या विभागांत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार घेऊं शकत नाहीं." या पत्रकाला काँग्रेसनें मान्यता दिली. ओघानेंच ९ डिसेंबर १९४६ रोजीं डॉ. सच्चिदानंद सिंह यांच्या अध्यक्षतेखालीं घटनासमितीची बैठक सुरू होऊन डॉ. राजेन्द्रप्रसाद यांना कायम अध्यक्ष निवडण्यांत आलें. शुक्रवार तारीख १३ डिसेंबर १९४६ रोजीं घटनासमितीनें हिन्दुस्थानचें राजकीय ध्येय नमूद करणारा ठराव स्वीकृत केला. त्यांत 'हिन्दुस्थान हें स्वायत्त व सार्वभौम लोकराज्य आहे' असें कलम आरंभींच आहे. हा ठराव मांडतांना पं नेहरू म्हणाले:—'माझें चित्त विविध घटना नजरेसमोर येऊन भारावून गेलें आहे. आपल्या इतिहासांतील एक कालखंड संपला व आपण लवकरच नव्या युगास सुरवात करूं. भारताच्या जीवनास सुरवात होऊन आज हजारो वर्षें झालीं. या विस्तृत काळांतील आठवणींत एक प्रकारची मादक उत्तेजकता आहे. त्यामुळें आठवणींनीं माझें चित्त कांहींसें अस्वस्थहि आहे. भारताच्या भव्य भूतकाळाला शोभून दिसण्यास मी पात्र आहे का असा प्रश्न मनांत येतो. त्याबरोबरच

भविष्यकाळाकडेहि नजर जाते. हा भविष्यकाळ माझ्या मतें उज्ज्वलतर असाच आहे. जुन्यांतून नव्या युगाचा उदय होत आहे. या संक्रमणाच्या क्षणांत मला जादू भासते. हा उगवणारा दिवस कदाचित् अभ्रपटलांनीं व्याप्त असेल. परंतु कांहीं झालें तरी दिवस तो दिवस. एकदां आकाश निरभ्र झालें, कीं आपणांस सूर्यदर्शन होणारच !" ( घटनासमिति-चर्चा-खंड १ पहा. )

मुस्लिम लीग घटनासमितींत येईना व हंगामी राष्ट्रीय सरकारांतील जागाहि सोडीना, हा पेंचप्रसंग लॉर्ड वेव्हेलना सोडवितां न आल्याकारणानें ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनीं २० फेब्रुवारी १९४७ रोजीं पार्लमेंटास एक शुभ्रपत्रिका सादर केली कीं, "हिन्दुस्थानांतील सध्यांची परिस्थिति फार बिकट झाली आहे व ती तशी राहूं देणें अनिष्ट आहे. म्हणून आम्ही स्पष्टपणें जाहीर करतों कीं, जून १९४८ च्या पूर्वी हिन्दुस्थानांतील राज्यसत्ता जबाबदार हिन्दी लोकांच्या हातीं कशी द्यावयाची याची व्यवस्था केली जाईल. ती सत्ता मध्यवर्ती सरकार किंवा कांहीं विभागापुरती प्रांतिक सरकारें यांच्याकडे कशी सोंपवावयाची हें ठरविलें जाईल. त्यासाठीं जरूर तर १९३५ चा कायदाहि दुरुस्त करण्यांत येईल. मात्र ब्रिटिश सरकार व हिन्दी संस्थानें यांचे संबंध विचारविनिमय करून ठरविण्यांत येतील. २४ मार्च १९४७ पासून लॉर्ड वेव्हेल यांच्या जागीं लॉर्ड लुई मौंटबॅटन यांची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक करण्यांत येत आहे."

ही संक्रमणाची घोषणा धडाडीची होती. तरी हंगामी राष्ट्रीय सरकारांतील पेंचप्रसंग या घोषणेनें मुळींच सुटला नाहीं. तथापि सत्तासंक्रमण जनसामान्यांच्या जबाबदार प्रतिनिधींच्या हातीं होणार याची निश्चिति होती. म्हणून मौंटबॅटनांच्या धोरणाकडे हिन्दी लोकांचें लक्ष वेधलें. २४ मार्च रोजीं मौंटबॅटन हिन्दुस्थानांत आले. आसाम, सरहद्दप्रान्त, पंजाब व बंगालमध्यें संघटित मुसलमानांचे दंगे गंभीर स्वरूप धारण करीत असल्याचें त्यांना आढळून आलें. या दंग्याचें कारण जेथें १९२९ सालीं कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर केलें होतें, त्याच लाहोरास मुस्लिम लीगनें १९४० सालीं २३ मार्च रोजीं पसंत केलेल्या ठरावांत असल्याचेंहि त्यांना आढळलें. ( सिंह व वानजींकृत 'भारताचा इतिहास' पृ. ६५४-६५६ पहा. ). तो ठराव असा होता कीं, " अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या या अधिवेशनाचें विचारपूर्वक असें मत बनलें आहे कीं, हिन्दी राज्यकारभाराची पुनर्घटना करणारी कोणतीहि योजना पुढील मूलभूत तत्त्वावर आधारलेली असल्याखेरीज ती नीट अमलांत येणार नाहीं. तीं मूलतत्त्वें पुढीलप्रमाणें—भौगोलिक दृष्ट्या सलग अशा ज्या भूप्रदेशांत मुसलमान हे बहुसंख्य आहेत तेवढे प्रदेश, जरूरी-

प्रमाणें प्रादेशिक पुनर्घटना करून वेगळे काढावे. उदाहरणार्थ, हिन्दुस्थानच्या वायव्येकडील व पूर्वेकडील प्रदेशांत असे गट व त्या गटांचें एक सार्वभौम स्वयंशासित सरकार निर्माण करावें. अशा प्रकारच्या तयार झालेल्या नवीन प्रादेशिक घटकांत अल्पसंख्याकांना योग्य, परिणामकारक व घटनेंत नमूद असलेली अशीं धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व इतर हक्कांसंबंधीं संरक्षक बंधनें असावींत व तीं त्यांच्या संमतीनें निर्माण करण्यांत यावींत. हिन्दुस्थानच्या ज्या भागांत मुसलमान अल्पसंख्य आहेत त्या भागांत त्यांच्यासाठीं त्यांच्या संमतीनें धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व इतर हक्कांचें नि हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं योग्य, परिणामकारक व घटनांतर्गत संरक्षक बंधनें निर्माण केलीं जावींत." या ठरावाचें समर्थन करतांना बॅ. जिना यांनीं स्पष्ट सांगितलें होतें कीं, 'कित्येक समजतात कीं, मुसलमान ही एक अल्पसंख्याक जात आहे, तें खोटें आहे. राष्ट्र या शब्दाच्या कोणत्याहि व्याख्येप्रमाणें मुसलमान हें एक राष्ट्र आहे व त्यांना त्यांचें मूळचें घर व व्यवस्थेस आपलें स्वतःचें सरकार असलें पाहिजे.' (इंडियन कॉन्स्टिटयूशनल डॉक्युमेंट्स्, भाग २, पृष्ठ ४२८. पहा—बानर्जी ए. सी )

तेव्हां मौंटबॅटन यांनीं काँग्रेस व लीग यांच्या पुढाऱ्यांच्या गांठीभेटी घेऊन प्रदीर्घ चर्चा केली. त्या चर्चेंतून त्यांनीं स्वतःची एक योजना तयार केली. म. गांधी, नेहरू व इतर पुढारी यांना जरी अखंड हिंदुस्थानच हवें होतें, तरी मुसलमानांना त्यांच्या इच्छेविरुद्ध बळजबरीनें किंवा बहुमताच्या जोरावर गुंतवून ठेवण्यास लोकशाहीच्या व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वनिष्ठेनें अशक्य होतें. शिवाय, दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रज आंतर्राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या कचाटयांत आल्यामुळें हिंदुस्थानांतील राजकीय वर्चस्व सर्वस्वी सोडत असतां, त्यांनाहि स्वतः उभारलेला दुहीचा भस्मासूर आवरतां येत नव्हता. अशा स्थितींत सगळयांच्या सगळया दुःखांना कारणीभूत होत असलेली एकशेंनव्वद वर्षांची परकीय सत्ता अखंड हिंदुस्थानांतून जात आहे एवढ्याच समाधानानें, मौंटबॅटनच्या योजनेंत 'फाळणी अपरिहार्य' आहे असा वास आल्याकारणानें ब्रिटिश सत्तोत्तर अराजकाला आपल्याकडून वाव मिळाला असें होऊं नये म्हणून, घटनासमितीच्या एप्रिलच्या बैठकींत 'फाळणीस तयार रहा' असा इषारा आपल्या अध्यक्षीय भाषणांत डॉ. राजेन्द्र यांनीं दिला. त्यापूर्वींच पंजाब व बंगाल यांची विभागणी करावी अशी काँग्रेसनें इच्छा प्रदर्शित केली होती. पंजाबांत शीख व हिंदु यांचा एक स्वतंत्र विभाग पूर्वपंजाब म्हणून काढावा आणि बंगालमधील पश्चिम भाग एक स्वतंत्र प्रांत व्हावा, असा त्या इच्छेचा रोख होता. काँग्रेसच्या इच्छेला हिंदुस्थानांत पुष्कळच पाठिंबा मिळाला.

१९४७ सालीं सर्व जगभरच राष्ट्राराष्ट्रांचे भौगोलिक नकाशे सावरण्यांत आले. हा मोका ब्रिटननें साधला. हिंदुस्थानला अंकित आणि असंतुष्ट ठेवून जगांत नांदण्यापेक्षां आपला दिलसाफ दोस्त म्हणून त्याला नांदविण्यांत शहाण-पणा आहे, या पोक्त विचारानें ब्रिटननें मौंटबॅटनच्या योजनेचा विचार करून ती काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या पुढाऱ्यांच्या परिषदेंत तारीख २ जून १९४७ रोजीं हिंदुस्थानांत व्हाइसरॉयनीं व इंग्लंडांत ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनीं जाहीर केली. खुलासा करतांना ॲटली कॉमन्ससभेंत म्हणाले कीं, 'या वर्षी हिंदुस्थानला वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य मिळेल. आमच्या योजनेस काँग्रेस, मुस्लिम लीग व शीख पुढारी यांची मान्यता आहे.' व्हाइसरॉयनींहि रेडिओ-द्वारां खुलासा करतांना जनतेला सांगितलें कीं, 'हिंदुस्थानच्या अगर प्रांताच्या फाळणीस व्यक्तिशः मी अनुकूल नव्हतों तरीहि प्राप्त परिस्थितींत हीच योजना योग्य होय.' या योजनेची रूपरेखा अशी—(१) त्रिमंत्रियोजने-प्रमाणें सर्व पक्ष सहकार्यानें घटना करतील ही ब्रिटिश सरकारची आशा व्यर्थ आहे. (२) पंजाब, बंगाल व सिंध या प्रांतांतील बहुसंख्य प्रतिनिधि असलेल्या मुस्लिम लीगनें सध्यां चालू असलेल्या घटनासमितींत भाग घेतला नाहीं. हिंदी राजकीय पक्षांत एकमत झालें असतें तर सत्ता-संक्रमण सोपें होतें. मुसलमानांना वाटलें तर त्यांनीं दुसरी घटनासमिति नेमावी. (३) पंजाब व बंगाल प्रांतांत विधिमंडळाच्या मुसलमान प्रतिनिधींचा एक गट व इतरांचा दुसरा गट यांनीं वेगवेगळें मतदान करून फाळणी करावी कीं नाहीं तें ठरवावें. कोणत्याहि गटांत फाळणीस बहुमत पडल्यास फाळणी निश्चित होईल. (४) फाळणी निश्चित झाली कीं व्हाइसरॉय सरहद्द-समित्या नेमतील. (५) कोणत्या घटना-समितींत भाग घ्यावयाचा तें सिंधचें विधिमंडळ ठरवील. (६) सीमा-प्रांताचे दोन प्रतिनिधी प्रस्तुत घटना-परिषदेंत असले तरी प्रांताचें भौगोलिक स्थान लक्ष्यांत घेतां सीमा-प्रांतानें कोणत्या घटनासमितींत जावें हें सार्वत्रिक मतदानानें ठरेल. तोच शिरस्ता बलुचिस्तानला. (७) बंगालची फाळणी झाल्यास मुस्लिम बहुसंख्य सिल्हेट जिल्हा सार्वत्रिक मतदानानेंच आसाममध्यें किंवा बंगालमध्यें जाईल. (८) जून १९४८ पूर्वींच एक किंवा अधिक स्वतंत्र सरकारकडे सत्ता सोंपविण्याचा ब्रिटनचा इरादा आहे. ब्रिटिश राष्ट्र-कुटुंबांत रहावयाचें कीं नाहीं हें घटनासमित्यांनींच ठरवावयाचें आहे. (९) हिंदी संस्थानांना सार्वभौम सत्ता परत करण्यांत येत आहे. तारीख १६ मे १९४६ च्या घोषणेप्रमाणेंच त्यांची व्यवस्था होईल.

ब्रिटनच्या हितसंबंधाकडे लक्ष देऊनच त्रिमंत्रिमंडळाची योजना बाजूस सारून मौंटबॅटन-योजना ब्रिटनच्या मजूर-मंत्रिमंडळानें पुरस्कारिली.



● ● ●

# ७

★

## स्वातंत्र्याचा उदय

मौंटबॅटन-योजनेप्रमाणें २० जून १९४७ रोजीं बंगालची व २३ जून रोजीं पंजाबची फाळणी होण्याचा निर्णय झाला. सिंध व बलुचिस्तान यांच्या विधिमंडळांनीं पाकिस्तानांत सामील होण्याचें ठरविलें. जुलै महिन्यांत सीमा प्रान्त व सिल्हट जिल्हा पाकिस्तानांत सामील करण्याचा कौल सार्वत्रिक मतदानानें दिला. अशा तऱ्हेनें धर्मांच्या सबबीवर अखंड भारताचें दुखंड भारत होणार हें उघड झालें. मग ऑगस्टच्या मध्याला ब्रिटन सत्तांतर करणार असें बजावून संस्थानिकांचा निर्णय मागण्यांत आला. त्यानंतर ४ जुलै १९४७ रोजीं ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत 'हिंदी स्वातंत्र्याचें बिल' मांडलें. पंधरा दिवसांत तें पसंत होऊन तारीख १८ जुलैला बादशहांची संमति त्यास मिळाली. त्या हिंदी स्वातंत्र्याच्या विधेयकाचें दर्शन असें होतें—

(१.) तारीख १५ ऑगस्ट १९४७ पासून ब्रिटिशशासित हिंदुस्थानांत पाकिस्तान व हिंदुस्थान हीं दोन नवीं राष्ट्रें अस्तित्वांत येतील. (२) या दोन्ही राष्ट्रांवर स्वतंत्र गव्हर्नर जनरल राहील. त्याची नेमणूक इंग्लंडच्या राजाकडून होईल. (३.) दोन्ही राष्ट्रांस निरनिराळीं मध्यवर्ती विधिमंडळें असावीत. पूर्वींचे कायदे, वटहुकूम रद्द वा दुरुस्त करण्याचा त्यास अधिकार राहील. त्यांनीं पास केलेल्या कायद्यांस इंग्लंडच्या राजाच्या वतीनें संबंधित गव्हर्नर जनरलनें संमति द्यावी. तारीख १५ ऑगस्टनंतर ब्रिटिश पार्लमेंटनें पास केलेला कोणताहि कायदा अगर वटहुकूम त्या त्या राष्ट्राच्या विधिमंडळाच्या मंजुरीशिवाय त्या राष्ट्राला लागू होऊं नये. (४.) तारीख १५ ऑगस्टपासून इंग्लंडच्या राजाच्या

विरुदावलींतून हिंदुस्थानचा बादशहा हें बिरुद ( १८७६ पासून धारण केलेलें ) काढून टाकण्यांत यावें. (५) तारीख १५ ऑगस्टपासून हिंदूस्थानच्या राज्यकारभाराची जबाबदारी ब्रिटिश सरकारवर राहणार नाहीं. तसेंच त्या दिवसापासून हिंदी संस्थानांवरील ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता संपुष्टांत येईल आणि त्यांचें इंग्रजांशीं अगर परस्परांत झालेले तह, करार व वहिवाटी रद्दबादल होतील. (६.) ज्या त्या राष्ट्रानें आपापल्या घटनासमितीमार्फत आपापली घटना सिद्ध करावी. तोंपर्यंत कारभार १९३५ च्या सुधारणा-कायद्याप्रमाणेंच चालावा. मात्र त्या वेळीं विधिमंडळाच्या कायद्याबाबत ब्रिटिशसरकारचा अगर गव्हर्नर जनरलांचा हुकमती हक्क चालावयाचा नाहीं, कीं त्यांच्या इंग्लंडच्या राजाच्या मंजुरीची जरूरी नाहीं. (७) ब्रिटिश सरकारनें गव्हर्नर-जनरलांना दिलेलीं आज्ञापत्रें तारीख १५ ऑगस्टपासून रद्द होतील. (८) भारतमंत्री व इंग्लंडमधील हिंदी-हिशोब-खात्याचा तपासनीस हे कांहीं काळ १९३५ च्या सुधारणा कायद्याप्रमाणें कामें करतील; पण तारीख १५ ऑगस्ट-पासून भारतमंत्र्यांचें सल्लागारमंडळ रद्द होईल. (९) प्रस्तुत असलेल्या हिन्दी पायदळ, तोफखाना, आरमार व वैमानिक दल वगैरेंची न्याय्य वांटणी गव्हर्नर-जनरलनीं दोन्ही राष्ट्रांत करावी. (१०) हिन्दी सनदी नोकरींतील लोकांची नोकरी त्यांच्याशीं झालेल्या करारांसह पूर्वीप्रमाणेंच चालावी; (११) दोन्ही राष्ट्रें आपला कारभार करूं लागेपर्यंत हिंन्दी सैन्य सध्यांच्या सरसेनापतींच्या आधिपत्याखालीं राहील. संयुक्त संरक्षण समितीमार्फत लष्करची व्यवस्था व ३१ मार्च १९४८ अखेर दोन्ही राष्ट्रांची कर-आकारणी, जकात-व्यवस्था, चलनपद्धति प्रस्तुत रहावयाची आहे. गव्हर्नर जनरलांची मुदतहि त्याच तारखेला संपेल. (१२) प्रस्तुत कायद्याची अंमलबजावणी, नव्या राष्ट्रांतील व त्यांच्या प्रांतांची अधिकार-वांटणी वगैरे, हिन्दी रिझर्व बँक व आर्थिक धोरण यांचें नियंत्रण आणि विधिमंडळें नि न्यायालयें यांच्या अधिकार-स्वरूपांत जरूर ते बदल, यांबाबत सर्व अधिकार प्रस्तुत कायदा पास झाल्या तारखेपासून गव्हर्नर जनरल यांस देण्यांत येत आहे.

अमेरिकन स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर मांडल्या गेलेल्या या हिंदी स्वातंत्र्याच्या विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाच्या वळीं ॲटली यांनीं लॉर्ड मौंटबॅटन व बॅ. जिना यांची अनुक्रमें हिंदुस्थान व पाकिस्तान यांचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाल्याचें जाहीर केलें. तसेंच तिसऱ्या वाचनाच्या वेळीं मालदीव व अंदमान-निकोबार हीं बेटें नव्या हिंदुस्थानांत सामील होतील व वऱ्हाडचें भवितव्य हिंदुस्थान सरकार व निजाम यांच्या वाटाघाटींनेंच ठरेल असेंहि जाहीर झालें.

काँग्रेसनें हिंदुस्थानचें विभाजन स्वीकारल्यावर ( From Quit India to Split India ) ‘ छोडो हिंद ’ वरून ‘ फोडो हिंद ’ अशी तिची चेष्टा झाली. पण १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थान स्वतंत्र्य झाल्याचा उत्सव जेव्हां सार्वत्रिक झाला तेव्हां त्यांत बहुधा सर्वत्र भारतवासीय सामील झाले. जे भारत दुखंड झाल्याकारणानें दुःखित होते त्यांना जागतिक कीर्तीचा नेताजी सुभाषचंद्रासारखा नेता नेटकेपणानें भेटलाच असता, तर कदाचित् काँग्रेस, मुस्लिम लीग, ब्रिटिश सरकार वगैरे सर्वांनाच गुंडाळून घेऊन त्यांनीं अखंड हिंदुस्थानचा पिच्छा पुरविला असता. ज्यांनीं दुखंड हिंदुस्थान पत्करला त्यांनीं तो अपरिहार्य म्हणूनच पत्करला. स्वातंत्र्याचा उत्सव करून आनंद करीत असतांहि, पारतंत्र्य नाहींसें झाल्यानें विचारवन्त देशभक्तांस आपल्यावरील जबाबदारी वाढल्याची तीव्र जाणीव होती. पूर्वीच्या गुलामगिरींत, लोकांतील जातिभेदास जें जातिद्वेषाचें स्वरूप प्राप्त झालें होतें, त्या दोषापासून मुक्त होणें हें पहिलें कर्तव्य पुढें ठाकलें. त्यापेक्षांहि जोरकस विचारधारा अशी होती कीं, परकीय अमलामुळें हिंदुस्थानवर आलेलें दारिद्र्याचें महान् संकट कसें निवारण होईल व या देशांतील प्रत्येक लहानमोठ्या नागरिकास शिक्षणद्वारा नि सांपत्तिक दृष्ट्या आपला पूर्ण विकास करून घेऊन देशांत संधिसमानता आणि गुणगौरव कसे निर्माण होतील ?

# ८

*

## भारताचें प्रजासत्ताक स्थिरासन झालें

एकोणीसशें शेहेचाळीसच्या निवडणुका झाल्यानंतर प्रान्ताप्रान्तांतून आणि तारीख २ सप्टेंबर १९४६ पासून मध्यवर्ती सरकारांत हंगामी मंत्रिमंडळ बनल्यापासून काँग्रेसजनांची जबाबदारी दुहेरी वाढली होती. आपल्याला मिळवावयाचें असलेलें देशाचें स्वातंत्र्य लवकरांत लवकर कसें प्राप्त होईल, या दिशेनें पावलें टाकून त्या पावलांना आपल्या मूळ संस्थेची म्हणजे काँग्रेसची मान्यता घ्यावयाची होती; दुसरें, जेथें जेवढ्या प्रमाणांत राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं आलीं तेथें तेवढ्या प्रमाणांत स्वराज्यापेक्षित कल्पनांना साकार करावयाचें होतें. हीं दोन्हीं कर्तव्यें काँग्रेस निष्ठेनें करीत होती. १५ ऑगस्ट १९४७ पासून तर सर्व भारत या नांवें चाललेल्या हिन्दुस्थानांत, भारतीय जीवनाला उच्चता आणण्याच्या दृष्टीनें कायदेकानू बनविण्यापासून लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्यापर्यंत, त्याचप्रमाणें सामाजिक नीतिमत्ता सोज्ज्वळ करण्यापर्यंत काय काय करतां येईल, या विचाराला देशभक्त अंतःकरणें लागलीं. परिस्थितिसापेक्ष कर्तव्यें लोकसेवक करूं लागले.

स्वतंत्र भारताच्या रचनेला मनापासून सुरवात झाली, पण भारताच्या रक्तहीन राज्यक्रांतीला एक गालबोट लागलें. तारीख ७ सप्टेंबर १९४७ पूर्वीं चोवीस तास खुद्द दिल्लींत अशी परिस्थिति निर्माण झाली कीं, दिल्लींत प्रवेश केला तर आपण खलासच होऊं, असा इशारा मौंटबॅटननींच आपल्या माणसांना दिला. तारीख १० सप्टेंबरला सर्व हिन्दुमंत्र्यांना स्वर्गवास घडवून लाल किल्ल्यावर मुस्लिम लीगचा झेंडा फडकणार, असा सुमार दिसूं लागला. त्याची बित्तंबातमी राष्ट्रीय स्वयंसेवक-संघानें वल्लभभाई पटेलांना वेळेवर

दिली म्हणून निभावलें, असें भारतरत्न डॉ. भगवानदास यांनीं १६ सप्टेंबर रोजीं नमूद केलें आहे. सत्तासंक्रमण होत असतांना पंजाब, बंगाल, संयुक्त-प्रान्त, बिहार या प्रान्तांत धर्माच्या नांवावर अनान्वित प्रकार घडले. पाकिस्तानांतील हिन्दूंची व शिखांची कत्तल मुसलमानांनीं चालविली. शेंकडों लोक ठार झाले; कोट्यवधि रुपयांच्या मिळकती नष्ट झाल्या; शेंकडों स्त्रियांचें अपहरण झालें. घरें, दारें, जमीनजुमला सोडून लाखों निर्वासितांचा लोंढा भारतांत येऊं लागला. याचें कारण मौंटबॅटनच्या योजनेंतील ९ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें पंजाब व बंगालच्या फाळणीनंतरच्या सीमारेषा ठरविण्याचें काम सर सिरिल रॅडक्लिफ या कशांतच तज्ज्ञ नसलेल्या पण एक वेळ लंडनमध्यें जिनांचा ज्युनिअर प्लीडर असलेल्या बेफिकीर गृहस्थानें केलें होतें!! आणि त्यांच्या कमिशनला नकाशे पुरवण्यांत नोकरशाहीनें, क्लाइव्हनें उमीचंदला फसविलें तशी, फसवणूक केली होती (प्रा. वाली कृत 'नाऊ इट् कॅन् बी टोल्ड' पहा). हा निर्वासितांचा प्रश्न जगांत अपूर्व होता. त्यांची सोय लावणें हें अनपेक्षितपणें भयंकर पण आवश्यक कर्तव्य भारत सरकारवर येऊन पडलें. बाल्यावस्थेंत असलेल्या स्वतंत्र भारतानें तो प्रश्न नेटानें व धैर्यानें सोडविला.

पाकिस्तानच्या प्रोत्साहनानें दुसरीहि एक समस्या उभी राहिली. काश्मीरवर सरहद्दीकडील पठाणांनीं हल्ला केला. काश्मीरचा राजा व काश्मीर जनतेचे पुढारी शेख अबदुल्ला यांच्या विनंतीवरून भारत सरकारनें ताबडतोब लष्करी मदत देऊन तो हल्ला थांबविला. पण तेवढ्यानेंच भारत-पाकिस्तानमध्यें काश्मीर-प्रकरण चिघळून राहिलें.

भारताच्या व काँग्रेसच्या इतिहासांतील १९४७ हें वर्ष घडण-चमत्कारांचेंच म्हटलें तरी चालेल. काश्मीर संस्थानचे अधिपति हिंदु असले तरी बहुसंख्य जनता मुसलमान. तेव्हां काश्मीरसारखें हिंदुस्थानचें नंदनवन पाकिस्तानांत सामील व्हावें, अशा बहुतांशीं इराद्यानेंच काश्मीरचा प्रश्न पाकिस्ताननें चिघळविला. काश्मीरच्या सर्वत्र पसरलेल्या दोस्त सैन्यांत फितुरी घडवून पाकिस्ताननें आझाद फौज खडी केली व टिचकी मारून कबजा घेण्याचा घाट घातला. आपण स्वतंत्र रहावयाचें, कीं कोणत्या संघराज्यांत सामील व्हावयाचें हा निर्णय संस्थानिकांनीं घ्यावयाचा होता. म्हणून पठाणी हल्ल्याचें तें दडपण होतें. पुष्कळशा संस्थानिकांनीं भारतांत समाविष्ट होण्याचा निर्णय घेतला. काश्मीरनें तसा निर्णय २४ ऑक्टोबर रोजीं घेतल्यामुळेंच पाकिस्तानचा राग असावा! भारतांतील घटना-समितीचें काम चालूच होतें. त्यांत ५ जुलै १९४७ रोजींच सरदार वल्लभभाई पटेलांनीं उद्घोषिलें होतें कीं, "इतिहासाचा धडा आपणांस

ठाऊक आहेच कीं, या देशांत अनेक सत्ताधीशांचें अस्तित्व व बाहेरील स्वाऱ्यांस एकदिलानें तोंड देण्याची असमर्थता यामुळेंच एकामागून एक येणाऱ्या स्वाऱ्यांना हिंदुस्थान बळी पडला! आपण स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर आहोंत. मागील चुका करणें किंवा त्या सांपळ्यांत पुन्हां सांपडणें आपल्याला परवडणार नाहीं......ब्रिटिशांनीं राज्य स्थापलें तेव्हां त्यांनीं सत्ताधीश-श्रेष्ठतेचा सिद्धान्त ( Doctrine of Paramountcy ) मांडला.. .. आतां ब्रिटिश राज्य संपुष्टांत येत आहे. भारताच्या सार्वजनिक हितसंबंधाला बाधक होणारें धोरण स्वीकारण्याची संस्थानिकांची इच्छा आहे, असें मला वाटत नाहीं. बहुतेक संस्थानें घटनासमितींत आलीं आहेत यामुळें तें स्पष्ट आहे. सर्वांच्या समान यत्नानें आपण आपल्या देशाला नव्या वैभवास नेऊं शकूं." (भारत सरकारच्या श्वेतपत्रिका, पृ. ४७ व ४८ सन १९४८ पाहा ).

सरदारांच्या या घोषणेनंतर आणि स्वातंत्र्योदयानंतर काश्मीर-प्रकरण चिघळूनहि १२ डिसेंबर १९४७ रोजीं जेव्हां लोकसभेंत जाहीर करण्यांत आलें कीं, नव्या दिल्लींत व लाहोरांत भारत-पाकिस्तान प्रतिनिधींच्या बैठकी होऊन दोघांमधील आर्थिक व संरक्षक बाबींसंबंधीं एकमत झालें आहे, तेव्हां सर्वांनीं समाधानाचा श्वास सोडला. पण त्यासाठीं आपल्याच अनुयायांविरुद्ध महात्मा गांधींना शेवटचा सत्याग्रह करावा लागला होता. स्वातंत्र्यानंतर चार महिन्यांनीं हिन्दु-मुस्लीम द्वेष शमविण्यासाठीं व काश्मीरमध्यें लढाई चालू असली तरी, भारतानें आपल्या खजिन्यांतील पंचावन्न कोटि रुपयांचा पाकिस्तानचा वांटा देऊन टाकावा म्हणून गांधींनीं आमरण उपवास सुरू केला होता. त्याप्रमाणें तो दिला गेला.

सप्टेंबरमध्यें उसळलेल्या दंग्याधोप्यांचा उपशम झाल्यावर, भारताच्या स्वतंत्र सरकारला कांहीं विधायक राष्ट्ररचनेकडे लक्ष द्यावयास उसंत सांपडली. इंग्रजी राज्यांतच सुरू झालेलें अन्ननियंत्रण काढून टाकण्याची घोषणा तारीख १० डिसेंबरला भारत सरकारनें केली. शेती-सुधारणेचा प्रश्न हातीं घेऊन पांच वर्षांची एक व पंधरा वर्षांची दुसरी अशा योजना आंखण्यांत आल्या. अगदीं मोडकळीस आलेल्या 'आगगाड्यांच्या वाहातुकीच्या सुधारणे'स हात घालण्यांत आला. दगडी कोळसा व कापडाची निर्मिति यांकडेहि लक्ष पुरवण्यांत आलें. दक्षिण आफ्रिकेंतील भारतीयांच्या प्रश्नांची सोडवणूक १२ नोव्हेंबर रोजीं तो प्रश्न राष्ट्रसंघाकडे नेऊन करवून घेतली.

अशा रीतीनें स्वतंत्र भारताच्या राज्यकारभाराला धीम्या नेटसपणें सुरुवात झाली असतां, भारताकडून मुसलमानांना, वाजवीपेक्षां जास्ती सवलती

देण्यास महात्माजी हेच कारणीभूत आहेत अशा समजुतीनें चिडलेल्या एका माथेफिरूनें ३० जानेवारी १९४८ रोजीं, म्हणजे पंचावन्न कोटींसाठीं झालेला उपवास सुटल्यावर दहाव्याच दिवशीं, दिल्लींत तो ‘ दरिद्रीनारायणा ’ चा भक्त निराधार निर्वासितांना धीर देण्यासाठीं सायंप्रार्थनेस जात असतां, त्या महात्म्याचा गोळी झाडून खून केला. त्यामुळें राजकीय पक्षांत तेढी आल्या; अविचारी नि स्वार्थी लोकांनीं म. गांधींवरील श्रद्धा-प्रेमानें ‘ उसळून ’ खाजगी हेवेदावे उगवले नि आपल्याच देशबंधूंवर अत्याचार केले.

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हें जनमनावर ठसविण्यापासून काँग्रेस-जनांना व भारत-सरकार चालविणाऱ्या काँग्रेसी मंत्रिमंडळाला आपली कर्तव्य-प्रणाली, महात्मा गांधींच्या मृत्यूमुळें झालेल्या दुःखाचे अश्रु पुसत-पुसतच, चालू ठेवणें आलें. तीं राष्ट्रांतर्गत कर्तव्यें करीत असतांच २७ एप्रिल १९४९ रोजीं हिंदुस्थानचे मुख्य प्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं हिंदुस्थानांत लोक-राज्य स्थापन झाल्यावरहि हिंदुस्थान ऊर्फ भारत हा ब्रिटिश राष्ट्रकुलाचा ( कॉमनवेल्थचा ) समान दर्जाचा सभासद राहील, असें इंग्लंडमध्यें जाहीर केलें. ते म्हणाले, “ हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा तृप्त व्हाव्या म्हणून हिंदु-स्थानांत सार्वभौम लोकराज्य स्थापन होणें आवश्यक आहे. परंतु हिंदुस्थानला राष्ट्रकुलाचें ( कॉमनवेल्थचें ) सभासदत्व सोडून जाण्याची इच्छा नाहीं. त्या सभासदत्वाच्या सर्व सवलती मिळण्यास हिंदुस्थान पात्र आहे. ”

( ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ २८ एप्रिल १९४९ पाहा. )

त्या अगोदरच १९४८ सालींच सरदार वल्लभभाई पटेलांच्या कणखर धोरणामुळें हिंदी संस्थानांचा प्रश्न सुलभ रीतीनें सुटला होता. राजेरजवाड्यांना नेमणुका देण्यांत येऊन छोटीं संस्थानें जवळच्या प्रांतांत विलीन करण्यांत आलीं. हैद्राबाद हें निजामी संस्थान स्वतंत्र राहून भारतविरोधी उपद्व्याप करूं लागतांच भारत-सरकारनें सप्टेंबर १९४८ मध्यें पोलीस-कारवाई करून तें भारतांत समाविष्ट करून घेतलें. काश्मीरच्या घटनासभेनें हिंदुस्थानशीं केलेला सामीलनामा मान्य केला. त्याचप्रमाणें भारताचे वकील सर्व प्रमुख देशांत गेले. आणि घटनासमितीनें १९४९ च्या जूनमध्यें विभक्त मतदारसंघ पद्धतीहि भारतांत बंद केली. ब्रिटिश राजवटींत मुसलमान, शीख, ख्रिस्ती, अँग्लो-इंडियन, हरिजन इत्यादि जमातींना स्वतंत्र मतदारसंघांतून कायदेमंडळांत प्रतिनिधित्व होतें. घटनासमितीनें तें बंद करण्याचा निर्णय घेतला. सरदार पटेल त्यासंबंधीं स्पष्टीकरण करतांना म्हणाले कीं—

“ आमचा उद्देश असा आहे कीं, शक्य तितक्या लवकर द्रुतगतीनें राजकीय क्षेत्रांतील जातवारी व भेदाभेद नाहींसे करून सर्वांचा दर्जा समान

करावा, हरिजनांसाठीं राखीव जागांची पद्धतिदेखील आपण तात्पुरती स्वीकारीत आहोंत. बहुसंख्याकांनीं आपल्या औदार्यानें अल्पसंख्याकांमध्यें विश्वास उत्पन्न करावा व अल्पसंख्याकांनींहि भूतकाळ विसरावा. स्वतःवरील पक्षपाताचा आरोप टळावा म्हणून परकीयांनीं जें केलें त्यामुळें या देशाला किती संकटें सोसावीं लागलीं याचा अल्पसंख्याकांनीं एकवार नीट विचार करावयास हवा. सर्वांच्या चिरंतन कल्याणासाठीं ही कल्पनाच आपण विसरली पाहिजे कीं, या देशांत कोणी अल्पसंख्य वा कोणी बहुसंख्य आहेत. भारत हें एकजिनसी राष्ट्र आहे." ('इंडियन इन्फर्मेशन' १५ जून १९४९, पृ. ५५८ पाहा.)

अशा तऱ्हेनें प्रगति करीत करीत २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं सर्वतंत्र स्वतंत्र भारताची घटना विधिविशारद डॉ. आंबेडकर यांनीं तयार केली. तींत 'भारत' हें आपल्या देशाचें नामाभिधान नक्की करण्यांत आलें. देवनागरी लिपींतील हिंदी ही राष्ट्रभाषा ठरली. 'वंदे मातरम्' व 'जनगणमन' यांना राष्ट्रगीतांचा मान मिळाला. "कायद्याच्या क्षेत्रांत सर्वांना समानता व संरक्षण मिळालें पाहिजे, धर्म–वंश–जात–लिंग–जन्मस्थान यांपैकीं कशानेंहि पक्षपात होता कामा नये; सार्वजनिक स्थानांचा उपभोग सर्व नागरिकांना सारखा मिळाला पाहिजे; सरकारी नोकरीबाबत सर्वांना सारखी संधि मिळाली पाहिजे; अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे; भाषण–स्वातंत्र्य, मुद्रण–स्वातंत्र्य, सभा-स्वातंत्र्य, संघ–स्वातंत्र्य वगैरे बाबतींतील हक्क सर्व नागरीकांना सारखे उपभोगतां आले पाहिजेत; भाषा, लिपी, संस्कृति यांचें संरक्षण करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे" अशा मूलभूत हक्कांनिशीं भारताचें [redacted] प्रजाहितदक्ष स्वातंत्र्य (Welfare State) म्हणून जगांत नांदावयाचें. हिंदी पार्लमेंटचीं तीन अंगें रहावयाचीं–राष्ट्रपति, राज्यसभा व लोकसभा. राष्ट्रपतींच्या हातीं संघराज्याच्या कारभाराचा सर्व अधिकार असणार. संघराज्याचें पार्लमेंट आणि सर्व घटक-राज्यांतील विधानसभा यांच्या सभासदांनीं राष्ट्रपतींची निवडणूक करावयाची. राज्यसभेच्या अर्धाचशें सभासदांपैकीं बारा राष्ट्रपतींनीं नेमावयाचें. भारताचें सरकार सर्व–धर्म–समान (सेक्यूलर) असणार.

अमेरिका व ब्रिटन यांच्या अनुभवांचा उपयोग करून भारताची संसदीय राज्यपद्धति तयार झाली आहे. हरिजनांस सर्व कायदेशीर हक्क मिळाले आहेत. इतर कोणत्याहि राष्ट्रांत असतील तितके अधिकार स्त्रियांनाहि मिळाले आहेत.

अशा लोकशाहीप्रधान सर्वधर्मसमान प्रजासत्ताकाची स्थापना कायदेशीर-रीत्या २६ जानेवारी १९५० ला झाली. डॉ. राजेन्द्रप्रसाद पहिले राष्ट्रपति निवडले गेले. लोकांनीं सर्वत्र आनंदोत्सव केला.

१

★

## दशवार्षिक समीक्षण

We had to come to close quarters with English democratic organisation, draw it into oursleves and absorb the democratic spirit and methods so that we might rise beyond them. We have to learn and use democratic principles and methods of Europe, in order that hereafter we may build up something suited to our past and to the future of humanity. We have to solve for the human race, the problem of harmonising and spiritualising its impulses towards Liberty, Equality and Fraternity. In order that we may fulfill our mission, we must be masters of our own...... In next great stage of human progress, it is not a material but a spiritual, moral and physical advance that has to be made and for this a free Asia and in Asia, a free India must take the lead." — "The Liberatcr Shri Aurobindo, India and the world," by Sisirkumar Mitra ( 1954 ) at page 106.

सर्वतंत्र-स्वतंत्र, लोकशाहीप्रधान आणि सर्वधर्मसमान प्रजासत्ताक भारतांत स्थापन झाल्यानें भारतांत आणि आशियांत एक नवजीवन संचारलें. आशियांत एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण झालें, एवढेंच त्याचें महत्त्व नसून त्यायोगें एका नवीनच 'संजीवना'ची ( civilization ) ती सुरवात आहे. भारताच्या नवजीवनाचीं मुख्य अंगें म्हणजे राजकारणाला अध्यात्माची पार्श्वभूमी, समाजरचनेची नवजागृत पायाभरणी आणि मानवतावादाचा व्याप-आटोप पेलण्या-झेपण्यासाठीं चैतन्यमय बुद्धिवाद, हीं होत. भारतांत ब्रिटिशांकडून कॉंग्रेसद्वारां झालेलें संक्रमण शान्तिसहकारानें झाल्याकारणानें घडून आलेल्या

बदलांचें क्रांतिस्वरूप नजरेंत भरलें नाहीं. भारतांत लोकशाहीचें वळण असल्यानें काँग्रेससारख्या लोकप्रिय संस्थेकडे सत्ता सुपूर्त करतांना लोकांना बरेंच वाटलें. काँग्रेसनेंहि निःपक्षपातीपणें राष्ट्रीय व निष्ठावन्त संरक्षणदलाचा ताबा घेतला. भारतांतील स्वातंत्र्यानें निर्माण होणारी नवसंजीवनी म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा संस्कृतिसंगमानें, विशेष व्यक्तिमत्त्वाचें जीवनप्रतीक निर्माण करणारी शक्ति होय. भारतीय नवजीवनाची ही प्रयोगशाळा यशस्वी झाली तर जगाचें नेतृत्व भारताकडे येईल; पण जर का भारतीय नवजीवनाला अपयश आलें तर कम्युनिझमच्या बऱ्यावाईट अंगोपांगांसह त्या जीवनाची परिणति दुसऱ्या कशांतहि नाहीं. एका पिढीभरांतच या भविष्याचा निर्णय लागणारा आहे. भारतीय नवजीवनांतील कम्युनिझमला प्रतिबंधक शक्ति म्हणजेच काँग्रेसचा भारतीय सोशालिझम् किंवा सामाजिक सहजीवनाचा उपक्रम ऊर्फ समाजवाद. ( चाणक्यकृत इंडियन रेव्होल्यूशन १९५१, पृ. ६, १६, १८५, २०२, २०४, २१५, २३१, २३२ पहा. )

या दृष्टीनें भारताचें परराष्ट्रीय धोरण असें आहे कीं, ज्याबद्दल कसल्या शंका निर्माणच होऊं नयेत. भारताचे परराष्ट्रीय संबंध पं. नेहरू हाताळीत असतां, त्यांचें व्यक्तिमत्त्व खरें तळपतें. त्या धोरणांत भारताचा इतिहास, भूगोल, धर्म, संस्कृति व इतर परंपरा याचें उत्तम प्रतिबिंब पडलेलें असतें. मद्रास (१९२७) काँग्रेसमध्यें ठरल्याप्रमाणें सत्ता-गटापासून दूर राहणें, सर्व स्वातंत्र्य-चळवळींना विधायक पाठिंबा देणें, साम्राज्यशाही-वसाहतवाद आणि वंशभेद यांना विरोध करणें; थंड्या व गरम युद्धांवर उतारा म्हणून शांतिमय सहजीवनाचें क्षेत्र वाढवीत राहणें वगैरे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची सूत्रावली म्हणून सांगतां येईल. अमेरिकेचे आयसेनहॉवर आणि रशियाचे क्रुश्चेव यांना शांततामय सहजीवनाच्या संदर्भांत विचार व कृति करावयास भारतानेंच उद्युक्त केलें. भारताच्या आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याच्या तुलनेनें 'कोरिया' प्रश्नापासून 'कांगो' प्रश्नापर्यंत किती तरी महत्त्व भारताच्या परराष्ट्रीय धोरणाला लाभलें आहे. पोर्तुगीज सत्तेखालील गोवा भारतांत विलीन झाल्या-शिवाय आणि सरहद्दीचे प्रश्न सलोख्याचे झाल्याशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णता नाहीं, याची जाणीव पं. नेहरूंना व काँग्रेसला आहे. पश्चिम आशिया, दक्षिण आशिया आणि अतिपूर्व यांच्यामधील मोक्याच्या जागीं भारत उभा आहे. त्यामुळेंच आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या कांहीं जबाबदाऱ्या भारताला टाळतां येत नाहींत. विरोधी राष्ट्रगटांमध्यें दुवे निर्माण करण्याचें व त्यायोगें सह-जीवनाचे मार्ग तयार करण्याचें धोरण भारताचें आहे. शांततामय सहजीवन हेंच जिच्या मुळाशीं आहे अशी राष्ट्रकुल ही संघटना आहे. त्यामुळेंच लंडनमध्यें

दक्षिण आफ्रिकेंतील वंशभेदाचा निषेध भारताचे पंतप्रधान करूं शकले. आफ्रिकेंतील स्वातंत्र्य व वंशसमानता यांचा पुरस्कार आणि आशियांतील नवी जागृति यांच्यामधील जोडदुवा भारत ठरत आहे. कोरियाप्रमाणेंच इंडोचायना व सुवेझ येथील युद्धपरिस्थिति संपावी म्हणून भारताचा हातभार लागलाच आहे. १९४७ व १९५४ सालीं आशियन आप्तसंबंध-परिषदा भरवून कम्युनिस्ट व तदितर राष्ट्रांना भारतानें हें पटवून दिलें आहे कीं, आशियाई राष्ट्रांनीं त्यांच्यापैकीं कोणत्या तरी गटाला वा तत्त्वप्रणालीला बांधून घेतलेंच पाहिजे असें नाहीं. काश्मीरच्यामुळें आरंभापासून पाकिस्तान व १९५९ पासून तिबेट-मुळें चीन यांच्याबरोबरचे भारताचे संबंध बिघडलेले आहेत. चीनचा वांधा १९५० पासून म्हणजे चीननें तिबेटमध्यें केलेल्या पहिल्या आक्रमणापासूनच चालू असून, १९५४ मध्यें चिनी-हिंदी व्यापारी-करारानें पंचशील जाहीर केलें तरी अजून संपलेला नाहीं. १९१४ च्या सिमला-परिषदेंत चीन-भारताची सरहद्द मॅक्मोहन रेषा म्हणून ८५० मैलांची ठरली असतांहि तिच्याबद्दलच चीन वांधा घालूं लागला आहे. काश्मीरनें स्वतःचें सामीलीकरण भारताशीं केलें असलें तरी त्यावरील पाकिस्तानचा डोळा १९६० सालींहि सुटलेला नाहीं. गोवा-विमोचनाचा सत्याग्रह भारतीयांनीं केला व दादराहवेली मुक्त झाली तरी राष्ट्रसंघापर्यंत नेऊनहि एकंदरीनें अजून गोव्याचा प्रश्न भिजत पडला आहे. पण ते सारे प्रश्न भारत धिमेपणानें सोडवीत आहे. भारताचें धोरण लष्करी गटांच्याबाबत अलिप्ततेचें आहे. सारी मानवजात ज्यामुळें नष्ट होईल असें महायुद्ध त्याज्य आहे, ही गोष्ट जगाला स्वकृतीनें पटविण्याचें कार्य भारतानें एक तपभर केलें आहे. पं. नेहरूंचें व्यक्तिमत्त्वच त्यास कारण आहे. आशियांतील सर्वांत मोठें पण कम्युनिस्ट नसलेलें राष्ट्र व पाश्चिमात्य नि पौर्वात्य संस्कृतींना जोडणारा दुवा म्हणून भारताचा आंतरराष्ट्रीय लौकिक आहे. तो भारताच्या आर्थिक व लष्करी स्वायत्ततेच्या मानानें मोठा आहे. पं. नेहरूंचें व्यक्तिमत्त्व भारताच्या अंतर्गत कारभारांतहि प्रतीत होत असतें. पंडितजी व काँग्रेसपक्ष घटनेच्या चतुःसीमेंतूनच कर्तव्यें पार पाडतांना आढळतात. तथापि लोकशाहीच्या निर्मळ पातळीवरूनच प्रत्येक निर्णय होतोच असें घटना-शास्त्राचे अभ्यासक म्हणणार नाहींत. घटनेच्या १७ व्या रकान्याप्रमाणें भारतांत 'अस्पृश्यतेला' थारा नाहीं; पण व्यवहारांत ती किती तरी ठिकाणीं राजरोसपणें नांदत आहे. भारताचें सुप्रीम कोर्ट हें घटनेची ढाल होय. पण घटनेच्या ३१ व्या रकान्यांत दुरुस्ती करून सुप्रीम कोर्टाच्या कर्तव्यक्षेत्राला संकोच देण्यांत आलाच !

तथापि स्वातंत्र्याच्या बाल्यावस्थेंत कायदेशीरपणाच्या काटेकोरपणानें चालण्यापेक्षां माणुसकीच्या व्यवहारानें चालण्यावर काँग्रेसश्रेष्ठींनीं अधिक भर दिलेला दिसतो. तारीख १ एप्रिल १९५१ पासून सुरू झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सरकार व जनता यांनीं प्रत्येकीं २००० कोटी रुपये विकास-कार्यावर खर्च केले. त्यांपैकीं फक्त दहा टक्केच रक्कम परदेशांतून आणविली. पहिल्या पंचवार्षिकचा भर शेती-उत्पादनावर अधिक होता. त्यामुळें २०% पीकवाढ व एकंदर राष्ट्रीय उत्पादनांत १८% वाढ झाली.

मॉंटफोर्ड सुधारणांच्या अगर पहिल्या काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारभाराच्या तुलनेनें स्वतंत्र हिंदुस्थानचा कारभार पुष्कळच प्रगतिपर व कार्यक्षम चालला आहे; शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, शेती, उद्योगधंदे अशी सर्वांगीण जीवनाची उंची वाढत आहे. तथापि स्वातंत्र्याच्या उदयाबरोबर, ज्या सामान्य माणसाचें जीवनमान उंचावेल म्हणून आकांक्षा निर्माण झाल्या होत्या, त्या आकांक्षांच्या मानानें अगर इतर स्वतंत्र देशांच्या मानानें भारतीय कुशलता भरधांव नाहीं. अगदीं थोड्याच वर्षांत चीननें वेश्याव्यवसाय व भिक्षांदेही यांची समाप्ति केली; मानवी शक्ती एकवटून सार्वजनिक बांधकामें उठवलीं; त्यासारखा सार्वत्रिक जिव्हाळा भारतांत कां निर्माण होऊं नये ? कारण आमच्या योजना आणि त्यांतून निर्माण होणारी जीवनक्रांति सामान्य माणसाच्या अंत:करणावर व मेंदूवर 'आपली आहे' असा ठसाच उमटत नाहीं. आर्थिक विकासाच्या बाबतींत भारतानें नियोजनाचा शास्त्रीय मार्ग निवडला आहे व व्यक्तिगत उद्योगधंद्यांचा आणि खुल्या स्पर्धेचा मार्ग मोकळा सोडला आहे. जवळ असलेल्या सर्व साधनसामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग आणि स्वखुषीनें उपलब्ध होण्याच्या नि समाजाचें हित साधण्याचा दृष्टीनें ज्यांना योग्य मार्गदर्शन केलें जात आहे, अशा कामकऱ्यांकडून काम घेणें म्हणजे लोकशाही पद्धतीचें नियोजन. या नियोजनाचें मूल्यमापन भारताच्या वांट्यास जें १९४७ सालीं ऐहिक भाग्य आलें त्यावरून आणि जनसामान्याला उपभोगावयास मिळणाऱ्या जीवनसाधनसुलभतेवरून करावयाचें आहे. श्री. एस्. डी. बिर्ला यांनीं भारताच्या वांट्यास आलेल्या ऐहिक भाग्याचें मोजमाप ३ जून १९४७ नंतर लगेच केलें होतें. तें असें—

सूत-गिरण्या ३८९ पैकीं ३८०; पडमाच्या गिरण्या १०८; साखर-कारखाने १६६ पैकीं १५६; लोखंड-पोलाद कारखाने १०; सिमेंट-कारखाने १९ पैकीं १६; कागद-कारखाने १६; कांच-कारखाने ७९ पैकीं ७७; खाणी-उद्योगधंदे उत्पादन ११,७६,८८,५०४ रु. पैकीं ९,५१,४७,६२४ रु. चें, कापड-उत्पादन रु. ४७,५९,००,०८३ पैकीं ४४,८६,८१,८६० रु. चें,

धातु नि धातुसाधितें रु. ८,४८,७६,८०९ पैकीं ६,६२,४४,८३५ रु. चीं, इमारती वगैरे रु. ९,७८,४०,७३५ पैकीं ७,८६,६७,४६२ रु. च्या, वाहतूक रु. १,२३,११,०१,१९३ पैकीं १,०४,६३,५४,४७२ रु. ची, हुंडणावळ रु. २४,५०,१८,९९१ पैकीं २०,६२,११,५१९ रु. ची.

तागाचें २३,८७,२१९ एकरांपैकीं ९,८३,५१९ एकर; कापसाच्या १,५४,००,००० एकरांपैकीं १,३७,७०,००० एकर; चहाच्या ७,३७,९०० एकरांपैकीं ६,४१,२४३ एकर; तांदुळाच्या २,२६,०५,००० टनांपैकीं १,७२,२९,००० टन; गव्हाच्या ६९,८५,००० टनांपैकीं ४१,९९,७४० टन, गुळाच्या ३१,४८,००० टनांपैकीं २६,३१,००० टन, भुईमुगाचें २२,७४,००० टन.

कोळसा २५,२७,७१,२७८ टनांपैकीं २५,०७,९०,८०२ टन; पेट्रोल ८७,०१,९९,३७१ गॅलनपैकीं ६५,९०,६८,९५१ गॅलन; क्रोमाईट २७,०८६ टनांपैकीं ५,१९४ टन; तांबें २,८८,०७६ टन; लोखंड १४,२१,७०१ टन; मँगनीज ७,६६,३४१ टन; मॅग्नेसाईट २३,०५२ टन; आगगाड्या ४०,५१२ मैलांपैकीं २५,९०० मैलांच्या व ८५८,४९ कोटी रु. पैकीं ६२२,६८ कोटी रु. च्या; रस्ते २,९६,४६८ मैलांपैकीं २,४६,६०५ मैलांचें; जलोत्पादित वीज १,४१,९०,००० किलोवॅट्सूपैकीं १,१३,४३,००० किलोवॅट्स्.

विस्तारक्षेत्र १५,८१,००० चौरस मैलांपैकीं १२,४१,००० चौरस मैल; ३८,८९,००,००० लोकसंख्येपैकीं ३१,६३,३०,००० लोकसंख्या.

भारतांतील अन्न-प्रश्नाची तीव्रता पंजाब–बंगालच्या फाळणीनें उद्‌भवली हें स्पष्टच आहे.

भारत हा एक विशाल देश आहे. अनेक धर्म, भाषिक गट व जीवनाच्या वेगवेगळ्या पद्धति येथें आहेत. त्यामुळें राष्ट्र म्हणून अस्तित्व टिकविण्यासाठीं सहजीवन हा एकमेव मार्ग आहे. भारतांत साडेचार कोटी मुसलमान सुरक्षितपणें संपूर्ण नागरिकहक्क भोगीत आहेत. एक कोटी निर्वासितांहून अधिक निर्वासितांना भारतानें शांतपणें सामावून घेतलें आहे. त्यामुळें मरण आणि पशुता यांपासून त्यांची सुटका झाली आहे. पूर्व पाकिस्तानांतून १९६० सालींहि निर्वासित येतच आहेत. बेरूवाडी पाकिस्तानला नेहरू-नून कराराप्रमाणें द्यावयाचें असें १९६० सालीं लोकसभेनें ठरविल्यावर तरी पाकिस्तानचा बकासूर शांत होईल अशी अपेक्षा आहे ! ! प्रौढ मतदान व लोकशाही कारभार-यंत्रणा म्हणजेच संसदीय

लोकशाही असेल तर पंचवार्षिक योजना, औद्योगीकरण व जीवनाधार कारखानदारी, यंत्रोत्पादन या सर्वांतील राष्ट्रीय दृष्टी आणि स्वयंसिद्ध अशी स्वयंचलित अर्थव्यवस्था म्हणजे टप्प्याटप्प्यानें साधावयाचें आर्थिक समानीकरण व सामाजिक न्याय या तत्त्वावर आधारलेली समाचरचना. हा भारतीय समाजवाद आहे. तो जनसामान्यांत मुरला पाहिजे. त्याकडे जग पहात आहे. भव्य निर्मितिक्षम मार्गानें काम करणारा एकमेव अविकसित देश म्हणून भारताकडे जगाचें लक्ष आहे.

कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक विकासाच्याबाबत पुष्कळ प्रगति झाली आहे. शेतकीच्या क्षेत्रांतील वाटचाल तितकी प्रगत नाहीं. भारतीय शेतकरी सुरतगडसारख्या यांत्रिक पद्धतीच्या शेतींतील विविध प्रात्यक्षिकानें शाहाणा होणारा आहे. दिल्लीच्या शेती प्रदर्शनानें तो पुष्कळ शिकला आहे. बड्या जमीनदारीची पद्धत भारतानें नष्ट केली आहे. जमिनीचें वांटप अधिक समानतेनें होत आहे. ग्रामीण समाज–प्रकल्प, ग्रामपंचायती, सहकारी संस्था यांच्या द्वारां सहजीवनाची आस्तेकदम प्रगति होत आहे. सत्तेचें विकेंद्रीकरण करण्यासाठीं ग्रामपंचायती व ग्रामीण सहकारी संस्था यांना अधिकाधिक अधिकार देण्याकडे पाऊल–टाक होत आहे. या सर्व लोकशाही कारभारांत न्याय्य ध्येयें न्याय्य मार्गांनींच साध्य करावयाचीं हें महात्माजींचें व्रत पं. नेहरूच फक्त निष्ठेनें पाळूं शकतात. त्यामुळेंच स्वातंत्र्य येतांच काँग्रेसनें लोक-सेवकसंघ म्हणून काम करावें, राजकीय प्रचारक वा प्रशासक पक्षाची संघटना म्हणून राहूं नये, या महात्माजींच्या कल्पनेस नेहरूंच्या कारभार-कुशलतेनें 'भारतसेवक समाजाचें' स्वरूप मिळून नोकरदारांच्या सहकारासाठीं व मार्गदर्शनासाठीं लोकसंपर्काची योजना झाली. पण सगळेच काय नेहरूंच्या देशभक्तीनें अगर गांधी-प्रणालीनें साध्यसाधनांकडे पहात असतात ?

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीं त्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्यापैकीं फक्त ६% पाण्याचा वापर बागाइतीकडे होई आणि १८% जमिनीला पाणी मिळे. हिंदुस्थान दुभंग झाल्यावर गहूं, कापूस, ताग यांची भारतांत स्वाभाविक-पणेंच कमताई झाली; कारण त्या जिनसांचीं माहेरघरें पाकिस्तानची मत्ता बनलीं. म्हणून बहुदेशक योजना ( मल्टिपर्पज प्रॉजेक्ट्स् ) काढून बागायती, वीज वगैरेबाबत अवाढव्य पसारा भारतानें मांडला आहे. पुरांचा आवर, जल-वाहतूक, जमीन-मजदुरांचें संरक्षण, मासेसंवर्धन वगैरेबाबत आंखण्या झाल्या आहेत. ४०% जमिनीला भरपेट पाणी मिळावें आणि १४० लक्ष टन धान्य-निर्मिति दरसाल पदरीं पडावी अशी योजना आहे. वीजहि ८७० लक्ष किलोवॅट्स् निर्माण करण्याचा संकल्प आहे. ( रिव्हर व्हॅली बोर्डपुढें १९५४

ऑक्टोबरमध्यें दिल्ली येथें केलेलें मंत्र्याचें भाषण पहा.) पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ४३४ कोटी रुपये खर्चून १०२ कालवे तयार व्हावयाचे होते. दामोदर व्हॅली (प. बंगाल), मयूराक्षी (ओरिसा, प. बंगाल), कोसी (बिहार), महानदी (ओरिसा), भाक्रा (पू. पंजाब), रामपदसागर नि तुंगभद्रा (आंध्र व मद्रास), कृष्णापेन्नार (आंध्र), मुचकुंद-हैड्रोइलेक्ट्रिक-स्कीम (आंध्र-ओरिसा), म्हैसुरांतील भद्र-रेसव्हॉयर, हॉनरमरेड्ड (शरावती नदीवरील योजना), चंबळ व्हॅली प्रॉजेक्ट (राजस्थान), कोयना-वीज (महाराष्ट्र) अशा योजनांचीं नांवेंच नुसतीं ऐकलीं तरी परराष्ट्रीय धोरण आणि निर्वासितांचा प्रश्न ज्या अतुल धैर्यानें भारताच्या स्वतंत्र सरकारनें हाताळला, तें धैर्यच वरीलसारख्या योजनांतूनहि प्रगट होत असल्याचें दिसेल. याशिवाय चित्तरंजनचा रेल्वे इंजिन्स तयार करण्याचा कारखाना, आगबोटी तयार करण्याचे उद्योग, अनेकानेक विमानतळ, यांच्या उभारण्या भारत सरकारनें केलेल्या आहेत, त्या पाहून आनंदच मानला पाहिजे.

कापूस-कापड, लोखंड-पोलाद, साखर, कागद, आगकाड्या, सीमेंट, कातडीं, कांच, औषधें यांचे जुने उद्योगधंदे नव्या स्वरूपांत उत्तेजनानें वाढीस लावण्याचें कार्यहि भारताच्या स्वराज्य-सरकारनें केलें असून बंगलोरची ऑटोमोबाईल व एअरक्रॅफ्ट फक्टरी, जमशेटपूरच्या पोलादी कारखान्याप्रमाणेंच मुरादाबाद व बनारसचा तांब्या-पितळेचा कारखाना, मुंबई-पुण्याचे चांदीच्या जिनसांचे कारखाने, जयपूरचा सोन्याच्या जिनसांचा कारखाना, माऊभांडार (बिहार) चा तांब्याचा कारखाना, महाराष्ट्र, प. बंगाल, पूर्व पंजाब व मद्रास-मधील कृत्रिम रेशमाचे कारखाने, ठिकठिकाणचे मिठाचे कारखाने, सिंद्रीचा खत-कारखाना यांचीं इतिवृत्तेंच अशीं आहेत कीं, स्वतंत्र भारताच्या प्रगतीकडे कोणाहि चाणाक्षाचें लक्ष वेधावें.

हवामानामुळें कांहीं वर्षांत पिकांची हानि झाली असली तरी १९५०-५१ ते १९६०-६१ या दहा वर्षांत शेतकी उत्पादनांत ३०% वाढ झाली आहे; पाटाच्या पाण्याखालील जमिनीचें क्षेत्र ५ कोटी १५ लक्ष एकरांवरून ७ कोटी एकरांपर्यंत गेलें आहे. औद्योगिक उत्पादनांतहि याच वर्षांत ६०% वाढ आहे. विद्युत्‌निर्मिति २३ लक्ष किलोवॅट्सूवरून ५८ लक्ष किलोवॅट्सूवर आली आहे. वाहतुकीच्या क्षेत्रांत त्याच दहा वर्षांत १२०० मैलांच्या नव्या रेल्वेमार्गांची भर आहे व १३०० मैलांवर डबल लाईन टाकली आहे. सडका ९७५०० मैल लांबीच्या होत्या, त्या १४४००० मैलांच्या झाल्या आहेत. शिक्षण, आरोग्य व समाजसेवा यांच्यायोगें किमान आयुर्मान ३३ वरून ४२ वर आलें आहे.

तथापि वाढत्या लोकसंख्येला आळा न घालतां आल्यामुळें व अन्यहि कारणांनीं बेकारी व अर्धबेकारीचे प्रश्न भारताला सोडवितां आले नाहींत. अर्थात् देशांतील सामाजिक व आर्थिक विषमता अपेक्षेच्या मानानें मुळींच दूर झाली नाहीं. (श्रीमन्नारायण)

भाषिक वादानें भारताला ग्रासलें व विनाकारण उत्साह-कीर्तीला कमीपण आणलें. १९१७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्यें भाषावार प्रांतरचनेची मागणी झाली होती व १९२० च्या नागपूर काँग्रेसनंतर भाषावार काँग्रेस-कमिट्या अमलांत आल्या होत्या. स्वतंत्र भारतांत भाषावार प्रांतरचना झाली त्या वेळीं महाराष्ट्र, गुजराथ व पंजाब यांना तो दिमाख मिळाला नाहीं. त्यामुळें लोकांत अन्यायाच्या जाणिवेनें तीव्र असंतोष माजला. काँग्रेसच्या विरोधकांना हें एक घबाड मिळालें व त्याचा त्यांनीं फायदा घेतला. १९५१-५२ च्या निवडणुकींनंतर काँग्रेसमन् पोटल्लू श्री. रामल्लू यानें आमरण उपोषण करून तेलगूभाषी आंध्र हौतात्म्यानें तयार केला. तेव्हां काँग्रेस-जनांतील भाषावार प्रांतरचनेच्या अभिमान्यांनीं अन्यपक्षीयांची साथ काँग्रेसबाहेर पडून केली.

काँग्रेसश्रेष्ठींना भाषावार प्रांतरचनेला विरोधी असण्यांत आनंद नव्हता. मुंबई-इलाख्याचा कारभार एल्फिन्स्टनच्या काळापासून परिणति-प्रगति राखून लौकिकानें चालत आलेला होता. भारताच्या एकजिनसीपणाचें प्रात्यक्षिक छोट्या प्रमाणांत सतत डोळ्यापुढें असावें आणि व्यापार-कुशल गुजराथी व पराक्रम-प्रभावी महाराष्ट्रीय यांच्या एकजीव मिळणीनें व सामाजिक आर्थिक सरणीनें मुंबई राज्य स्वावलंबी व समर्थ राहावें, अशी द्विभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितींत अपेक्षा होती. ती जनतेला पटविण्याचें बाजूला राहून तो एवढ्या इज्जतीचा प्रश्न झाला कीं, गोळीबारांनीं लोकमताची बेपर्वाई ब्रिटिशांनाहि मागें सारणारी झाली. तथापि १९५७ च्या निवडणुकीनंतर ना. यशवंतराव चव्हाण यांच्या धोरोदात्ततेनें व पं. नेहरूंच्या सौहार्दानें १९६० च्या मेपासून गुजराथ व महाराष्ट्र अशीं स्वतंत्र राज्यें होऊन लोकमताचा विजय झाला.

देशांत सर्वांत मोठी समस्या जर कोणती असेल तर नागरिकांत भावनात्मक व सांस्कृतिक एकता निर्माण करण्याची. त्या एकतेशिवाय आर्थिक नियोजन कार्यक्षम होणार नाहीं. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालखंडांत, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमाद्वारें राष्ट्राची एकता अभंग राहण्याच्या दृष्टीनें योजनाबद्ध रीतीनें ती समस्या सोडविली जाईल. दहा हजार दोनशें कोटि रुपयांची तिसरी योजना यशस्वी करावयास भारतांतील राज्यांनीं आणि नागरिकांनीं आपले

सांस्कृतिक संबंध दृढतर केले पाहिजेत. ‘ मी सर्वप्रथम भारतीय आहे आणि मग कोणी तरी प्रादेशिक वा अन्यथा आहे’ ही ना. गोखले-प्रमाणित वृत्ति बळावली पाहिजे. ‘आज जग चांचपडतें आहे तें मानवी अस्तित्वाच्या नव्या तोलासाठीं. आध्यात्मिक सखोलता आणि नैतिक शक्ति यांनीं सज्ज झालेला, पूर्णपणें संघटित आणि सुनिबद्ध व्यक्तित्वाचा माणूसच नव्या काळाचीं विज्ञानमय आव्हानें स्वीकारूं शकेल. ’ युरोप आणि अमेरिका यांचें जीवन बदलून टाकणाऱ्या औद्योगिक क्रांतीनें भारतांत पाऊल टाकलें आहे. तिच्या पाठोपाठ तंत्र आणि विज्ञान यांनीं सुरू केलेली अधिक वेगवान् क्रांति येत आहे. या जोरकस भौतिक बदलांचें आव्हान स्वीकारण्यासाठीं भारतनिष्ठ नैतिक शक्तीची जोपासना भारतीयांनीं केलीच पाहिजे. उद्यांच्या भारताची घडण आजच्या भारतीयांच्या परिश्रमांवर अवलंबून आहे. निश्चित ध्येय पुढें ठेवून शुद्ध अंतःकरणानें भारत जीवनाची तीर्थयात्रा साधीत आहे. अशा वेळीं सत्तेला शहाणपणाची जोड मिळून भारताचा इतिहास निर्माण झाला पाहिजे. ( करंजियाकृत ‘पं. नेहरूंचें अंतरंग’, पं. जवाहरलाल नेहरूकृत ‘भारत—आज व उद्यां’ पाहा.)

●●●

## १०

★

# काँग्रेसचें नेतृत्व

काँग्रेसच्या नेतृत्वाचा विचार करतांना हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीचा उभारच मुळीं पाश्चात्त्यांशीं आलेल्या संबंधसंपर्कामुळें झाला, ही गोष्ट दृष्टीआड करतां येत नाहीं. तथापि, भारतीय जीवनाचें युरोपियनीकरण होऊं न देतां, भारतीय लोकमताच्या नाडीवर हात ठेवून लोकांच्या भावनांची व अपेक्षांची एकजिनसी आराधना साधून एकंदरीनें राष्ट्रीय ध्येयसाध्यांचा आविष्कार करीत राहणें व त्यासाठीं सुसंघटितरीत्या लोकमताला सरकार-दरबारपर्यंत भिडविणें हें काम काँग्रेसच्या नेतृत्वानें कालखंडोचितरीत्या केलें आहे.

काँग्रेसचें नेतृत्व तिच्या प्रारंभकाळांत नेमस्तांच्याकडे होतें. सुशिक्षित आणि बरी आर्थिक परिस्थिति असलेल्या मंडळींचा भरणा त्या नेतृत्वांत असून बहुजनसमाजाच्या दुःखांना वाचा फोडतांना व त्यांची दाद लावून घेतांना, राज्यकर्त्यांच्या कपाळाची शीर न उठेल इतक्या बेतानें ते आपला कार्यभाग साधित असत. त्यांच्या राजकीय चळवळी अगदीं सनदशीर मार्गानें चालावयाच्या आणि बदललेल्या कालानुरूप सामाजिक सुधारणांवर त्यांचा भर असावयाचा. यायोगें त्यांना बहुजन समाजाच्याबद्दल कळकळ असूनहि ते जनसामान्यांशीं समरस फारसें नसायचे. अरेराव राज्यकर्ते त्यामुळेंच त्यांना 'परमाणुतुल्य अल्पसंख्य' म्हणून हिणवीत. ('अॅड्व्हान्स्ड् हिस्टरी ऑफ इंडिया,' मॅक्मिलन कंपनी, २ री आवृत्ति, १९५० पहा.)

सामूहिक चळवळीचा उठाव करणें अथवा तिचा पुढाकार घेणें ही गोष्ट उदारमतवादी नेमस्तांना जमण्यासारखी नसल्यामुळेंच, एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत पाश्चात्त्य इतिहासाचें, भौतिक सुधारणांचें

आणि इंग्रजी भाषेंतील वाघिणीच्या दुधाचें ज्ञान झालेल्या गरीब-मध्यम-वर्गीयांतील तरुण, नेमस्तांचें नेतृत्व निकामी लेखूं लागला. जनसामान्याची भाषा, विचारसरणी आणि अभिलाषा त्या तरुणाला अंगवळणीं असल्यामुळें ('इंडियन पॉलिसीज सिन्स दि म्यूटिनी,'–सी. वाय्. चिंतामणी, पहा.) त्या सामान्याला जग समजावून देऊन, त्या जगाबरोबर चालावयासाठीं, राष्ट्रीय नेतृत्वाचा पाठपुरावा करावयास तयार करणें त्या तडफेच्या नव्या तरुणाला शक्य होतें. त्यानें प्लेग-दुष्काळ, हिंदु-मुसलमान- दंगे अशा आपत्तींनीं ग्रस्त झालेल्या समाजाला 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काळ।' अशी शिकवण देऊन, आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या परंपरांनीं आपण स्वावलंबी होऊं आणि इंग्रजांचें पारतंत्र्य झुगारून देऊं, तसेंच 'ज्याचें नशीब त्याच्याबरोबर!' या न्यायानें राष्ट्राचें तेज वाढवूं व सुखी होऊं, अशी विचारसरणी पेरली. तरुणांच्या या पक्षाचें नेतृत्व लोकमान्य टिळकांच्या द्वारां १८९३ पासून काँग्रेसमध्यें हळूंहळूं प्रभावी होत गेलें आणि त्यांच्या 'स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण' या चतुःसूत्रीनें, त्याचप्रमाणें त्यांच्या 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवीनच' या सिंहगर्जनेनें विसाव्या शतकाचीं पहिलीं दोन दशकें काँग्रेसला त्यांनीं एका बाजूनें लोकाभिमुख तर दुसऱ्या बाजूनें परकीय सत्तेशीं झुंझार असें नेतृत्व दिलें.

आर. आय्. क्रेन यांनीं म्हटल्याप्रमाणें पहिल्या जागतिक महायुद्धानें म्हणजेच कैसरी कंदनानें जगाबरोबर काँग्रेसच्या राजकारणाला आणि म्हणूनच नेतृत्वालाहि नवीन तेजस्वी वळण लागलें. युद्धामुळें हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवहारांना वळण लागलें तसेंच स्वयंनिर्णयाच्या तत्त्वासाठीं इंग्रजांसुद्धां सर्व दोस्त राष्ट्रें त्यांत पडल्यामुळें, तेंच स्वयंनिर्णयाचें तत्त्व हिंदुस्थानला लागू करण्याबद्दल होमरूलच्या चळवळीनें टिळक उठाव करूं लागले. माँटफोर्ड सुधारणांत तें तत्त्व न दिसल्यानेंच, 'उजाडलें, पण सूर्य कोठें आहे?' असा सवाल त्यांनीं केला. पण त्याबाबत जगाच्या वेशीवर हिंदुस्थानचा प्रश्न मांडण्यास ईश्वरानें त्यांना सवड ठेवली नाहीं. त्यांनीं देवाघरीं प्रयाण केल्यावर राष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी काँग्रेसमध्येंच म. गांधींवर येऊन पडली.

काँग्रेसचें लोकाभिमुख नेतृत्व समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत न्यावयाचें, त्याचबरोबर समाजासमाजांतील अलग–विलगपणा तुरपून काढावयाचा, दलितांसुद्धां सर्व समाजाच्या आवाजाला समाज-पुरुषाकडून व सत्ताधाऱ्यांकडून ओ मिळावी अशी चळवळ उभारावयाची आणि हें सर्व करतांना स्वयंनिर्णया-धिष्ठित स्वातंत्र्याची वाटचाल काँग्रेसच्या राजकारणाला लावावयाची अशी

मोठी जबाबदारी गांधींच्या नेतृत्वावर येऊन पडली होती. दक्षिण आफ्रिका, चंपारण्य आणि खेडा येथील सत्याग्रह यशस्वी करून शेतकरी व श्रमजीवी लोकांत आपणांस मिसळतां येतें नि त्यांच्या संघटनेनें कारभारी कुरेबाजीला नमवितां येतें हें महात्मा गांधींनीं आधींच सिद्ध केलें असल्यामुळें, किसान कामगारांसह खेडूत-नागरी जनतेला घेऊन सामूहिक आणि सर्वव्यापी सत्याग्रहाच्या चळवळी गांधींनीं आपल्या 'साधेपणीं चारुतेच्या' जोरावर अशा सामर्थ्यशाली केल्या कीं, त्यापायीं काँग्रेसला शिस्त-शिरस्ता-संघटनात्मक यंत्रणेनें दैनंदिन प्रश्न हाताळावे लागले व काँग्रेसच्या सत्य-अहिंसेच्या व्रतधारी अग्निदिव्यामुळें अरेराव राज्यकर्त्यांना लोकांबद्दल सहानुभूति, सदिच्छा, सहकार आणि सेवा अशा चतुर्विध वृत्तींनीं मिळतें घ्यावें लागलें. गांधी-आयर्विन-करारानें गांधींनीं काँग्रेसला आंतरराष्ट्रीय व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राजकारणांत जसें उंचावलें तसेंच भारतीय लोकमतांत अद्वितीय स्थान प्राप्त करून दिलें.

ग्रामपुनर्रचना हा एक गांधीजींचा प्रमुख कार्यक्रम असल्यानें, पारतंत्र्यविनाशाबरोबर स्वातंत्र्यविकासाचीं बीजेंहि त्यांच्या धोरणांतून उमटूं लागलीं. त्यामुळें स्वतः काँग्रेसलाच स्वतःची संघटना खेडेगांव हा घटक धरून उभारणें भाग झालें. त्यांतूनच काँग्रेसपुढें अनेकविध हितसंबंधांच्या बहुविध समस्या उभ्या राहिल्या. पहिल्या सार्वजनिक सत्याग्रहाच्या चळवळीपासूनच, त्या बहुविध समस्यांचा नि हितसंबंधांचा समन्वय साधूनच काँग्रेसला ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपला पवित्रा बदलून घ्यावा लागे. त्यांपैकीं १९३७ सालीं काँग्रेसनें सत्तास्वीकार केल्यावर शेतकरी कल्याणाच्या समस्येनें साहजिकच उचल केली. त्यामुळेंच १९३४ पासून तरारून आलेल्या समाजसत्तावादी (सोशालिस्ट) विचारसरणीचा प्रभाव काँग्रेसच्या नेतृत्वावर प्रामुख्यानें पडूं लागला. देशांतील शेतकरी वर्गाचीं दुःखें दूर केल्याशिवाय शेतकीप्रधान देशाच्या स्वराज्याला काय मोल? म्हणून काँग्रेसचा स्वातंत्र्याचा लढा तीव्रपणें चालला होता तोंपर्यंत म्हणजे हिटलरी होरपळीअखेर काँग्रेसमध्यें अगर काँग्रेसचे सहकारी म्हणून समाजवादी (सोशालिस्ट) राहिले. दे. सुभाषचंद्र बोस यांचा फॉरवर्ड ब्लॉकहि १९४० पासून सोशालिस्ट मताचाच राजकीय पक्ष म्हणून काम करीत आला. जयप्रकाश नारायण प्रभृति सोशालिस्ट गुप्तचर होऊन परकीय सत्तेच्या युद्धप्रयत्नाला विरोध करीत होते. काँग्रेसमध्यें युद्धसाहाय्य करावें म्हणणारा समन्वयवादी एक गट असूनहि, मंत्रिमंडळें सोडून वैयक्तिक सत्याग्रहापासून 'चलेजाव'च्या चळवळीपर्यंत काँग्रेसला उग्र स्वरूप धारण करावें लागलेंच. त्या निमित्तानें दऱ्याखोऱ्यांतील खेडुतापर्यंत राष्ट्रीयत्वाची भावना पोंचली.

समाजसत्तावादांत मार्क्सवाद, ब्रिटिश मजूर पक्षाचा सामाजिक लोकशाही-वाद आणि अनत्याचारी सत्याग्रह-प्रतिकारानें सत्तासंपत्तीच्या विकेंद्रीकरणावर आधारलेलें गांधीपद्धतीचें लोकशाहीप्रधान समाजजीवन असे तीन प्रकार आहेतच. जयप्रकाशनारायण व आचार्य नरेन्द्रदेव हे पहिल्याचे, मिनू मसानी व अशोक मेहता हे दुसऱ्याचे आणि अच्युत पटवर्धन आणि राममोहन लोहिया हे तिसऱ्याचे आदर्श म्हणून मानण्यास हरकत नाहीं. काँग्रेसचें धुरीणत्व त्या काळांत व पुढें ज्यांच्याकडे राहिलें त्यांपैकीं सरदार वल्लभभाई पटेल यांना गांधीतत्त्वज्ञानापैकीं ' धनिक हे समाजाचे विश्वस्त आहेत आणि त्यांनीं शेतकरी, श्रमजीवी, दलित व दुःखित यांसाठीं आपल्या वैभवाचा उपयोग करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, ' हें तत्त्व मान्य होतें. पण त्यापेक्षां समाजवाद म्हणून ज्याला म्हणतात तो त्यांना तितकासा पसंत नव्हता. खाजगत मिळकत आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांची महती संस्थानांचें विलीनीकरण घडविणाऱ्या त्या कर्तृत्व-वंताला खास वाटत होती. शेतकरी-कामकरी यांच्या हितसंवर्धनाची त्यांना कळकळ होती. पण समाजवादी संघटनेचें संवर्धन हाच एकमेव भारताच्या उन्नतीचा नवीन युगांतील जगाबरोबरीनें राहण्याचा मार्ग असें त्यांना वाटत नव्हतें.

काँग्रेस सोशालिस्ट पक्षालासुद्धां १९४८ अखेर काँग्रेसमध्यें आपला एक-जिनसीपणा राखतां आला. पुढें त्यानें स्वतंत्रपणें संघटना करून १९५२ मध्यें किसान-मजदूर पक्षाशीं संगनमत करून प्रजासमाजवादी पक्ष निर्माण केला.

आणि तरीहि काँग्रेसचें नेतृत्व आंतरराष्ट्रीय कीर्तीनें करणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या समाजवादाचा उलगडा पडल्याशिवाय, अभ्यासकाचें काम होणारें नाहीं. त्याबाबत पंडितजींचेंच म्हणणें अभ्यासलेलें बरें. पंडितजी म्हणतात—

" वेगानें बदलणाऱ्या आजच्या जगांत स्वच्छ, नितळ अशा विचार-शीलतेची आवश्यकता आहे. मानवी सुख-समाधान, मानवी प्रगति व स्वतःचा पूर्ण विकास साधण्याची प्रत्येक व्यक्तीला संधि मिळवून देणें; त्यासाठीं प्रत्येक गटांत स्पर्धा कमी कमी होऊन सहकाराची भावना वाढणें, खाजगी मिळकत किंवा व्यक्तिगत नफा या लोभी प्रेरणांचा पगडा कमी करणें आणि राजकीय व आर्थिक सत्तेचें न्याय्य वांटप करणें; अर्थात् हें सारें लोकशाही नि शांततेच्या मार्गांनीं घडविणें, असें समाजवादी घडणीचें धोरण आहे.

आमचा समाजवादी दृष्टिकोन मुख्यतः आर्थिक आहे. स्वातंत्र्यप्राप्ती-पासून तरी या देशांत राजकारण अर्थकारणाभोंवतीं फिरतें आहे. स्वतःचें पोषण

करणारी, स्वतःलाच गति देणारी आणि स्वतःचा विकास करणारी अर्थव्यवस्था भारताला स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध अशी बनवावयाची आहे. जागतिक पातळीवर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत समतोल निर्माण करण्याचा हा प्रश्न आहे. जागतिक उत्पादनाचा योग्य उपयोग आणि त्याची समान वांटणी केव्हां तरी साधावयास हवी. "

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्माजींनीं काँग्रेसच्या विसर्जनाचा सल्ला दिला होता. पण ज्या संस्थेनें राष्ट्राचें जागृतिपूर्वक राष्ट्रीय जीवन निर्माण केलें, त्याला साकार करून व्यावहारिकरीत्या प्रभावशाली करण्याची संधि आली असतां, त्या संस्थेनें ती जबाबदारी कर्तव्य म्हणून उचललीच पाहिजे. या दृष्टीनेंच राज्यकर्ता पक्ष म्हणून सर्वतंत्र स्वतंत्र भारतांत नांदणाऱ्या काँग्रेसपक्षाची काँग्रेस ही संस्था १९५० पासून तरी आहे. तिचें एकमेवाद्वितीयं नेतृत्व राष्ट्राचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडेच व्यवहारतः असल्यामुळें, जुनीं जळमटें झाडून भारतांत नवचैतन्य आणि जगांत भारताची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या या नेत्याची परंपरा बुद्धानुयायी अशोकाची आठवण करून देणारी आहे. सक्तीनें नव्हें सत्तेनें ( चांगुलपणानें ) मिळवलेला विजय हाच खरा विजय होय, हें त्या परंपरेचें सूत्र आहे. समंजसपणा, सहिष्णुता व एकमेकांच्या गरजांची जाणीव यांच्या प्रकाशांत तें सूत्र चालवयाचें आहे. सत्य, शिव आणि सुंदर अशा साध्यासाठीं जें कार्य असतें तें, घाटहि सत्य शिव आणि सुंदर निर्माण करतें.

काळाच्या ओघांत काँग्रेसचा एकजिनसीपणा नाहींसा झाला असून सर्वांना संभाळून घेण्याच्या समन्वयपद्धतीनें तींत ओढाताण सुरू आहे. तिनें राज्यकारभाराची यंत्रणा भूतकाळांतून उसनी घेतली व संस्थात्मक लोकशाही पत्करली. त्यामुळें नेहरूप्रेरित राष्ट्राचीं उद्दिष्टें दूर रहात आहेत कीं काय अशी भीति वाटते. त्यासाठीं नेहरूनिष्ठ अशा तीव्र विचारांच्या काँग्रेसजनांनीं तें कार्य हातीं घेतलें तरच तें पुरें होईल. काँग्रेस-चळवळीचा सारा इतिहास पाहिला तर तिच्यांतला मुख्य ओघ हा अधिकाधिक पुरोगामी आणि लोकशाही अशा मतप्रणालीकडे नेहमींच वाहात आलेला दिसतो. ज्याला मूलतः भारतीय म्हणतां येईल अशा दृष्टिकोनानें काँग्रेस प्रेरित झालेली आहे, असें एकंदरीनें म्हणतां येईल. हा भारतीय दृष्टिकोन मात्र आधुनिक आहे व शास्त्रीय असा समाजवादी आहे. त्या आपल्या दृष्टिकोनासह काँग्रेस भारतीय जनतेच्या इच्छा-आकांक्षांच्या पायावर उभी आहे.

काँग्रेसचे सूत्रधार पं. जवाहरलाल नेहरू यांनीं स्वातंत्र्याच्या अल्प चैतन्यमय काळांत भारताचे प्रतिनिधि म्हणून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्यें अनेक विजय संपादन केले आहेत. ऐतिहासिक पावित्र्य लाभलेल्या भारतीय परंपरेची मर्यादा राखून शान्तियुगाच्या ध्येयावर अढळ निष्ठा ठेवणारें पंचशील भारतीयांपुढें आणि जगांतील राष्ट्रसमूहांपुढें ठेवून त्यांच्या दृष्टीला सौभाग्यसंपन्न केलें आहे. पंचशीलच्या आधुनिक वेषांत सहजीवनाचें आणि वैध समन्वयाचें पुरातन भारतीय तत्त्वज्ञान नेहरूंनीं जगापुढें किता म्हणून अढळ राखलें आहे. पाश्चिमात्य आणि पौर्वात्य विचारपरंपरांनीं संस्कारित झालेला देदीप्यमान मानवतावादी म्हणून नेहरूंकडे जग पहात असतें.

नेमस्तांच्या अर्जविनंत्या—निषेधांतून लो. टिळकांनीं काँग्रेसला आक्रमक कृतिप्रवण केलें. महात्माजींनीं त्या कृतिप्रवणतेला अनत्याचारी पण अन्यायविनाशक प्रतिरोधाचें अध्यात्मरूप मांगल्य दिलें. १९३५ पासून कुटुंबांतील कर्त्या व पूज्य वडीलधाऱ्याप्रमाणें महात्माजी काँग्रेसमध्यें राहून जवाहरलाल नेहरू प्रभृतींच्या हातून होणारी कर्तबगार काँग्रेस पहाण्यांत धन्यता मानीत होते.

• • •

# ११

★

## काँग्रेसमधील विवेक-वर्धक

काँग्रेसमध्यें संसदीय मनोवृत्ति घर करूं लागल्यानंतर म्हणजे काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवाच्या वर्षापासून काँग्रेसमध्यें महात्माजी व पं. नेहरू यांच्याशिवाय ज्यांच्या विचारसरणी कांहीं कालखंड गाजवून गेल्या, त्यांचें स्मरणहि काँग्रेस-मधील विचारधारांच्या सम्यक् दर्शनासाठीं आवश्यक आहे. त्या दृष्टीनें मानवेन्द्रनाथ रॉय यांचा नवमानवतावाद चटकन डोळ्यांत भरतो. नरेन्द्र भट्टाचार्य हे मानवेन्द्रांचें मूळ नांव. तो वयाच्या बाराव्या वर्षीच अरविन्द घोषांच्या क्रांतिकार्याकडे आकर्षित झाला. कैसरी कंदनाच्या वेळीं जर्मनीच्या साहाय्यानें ब्रिटिशांच्या विरुद्ध सशस्त्र बंडाची उठावणी करणाऱ्या प्रयत्नवाद्यांत हा तडफेचा तरुण होताच. त्या कालांत मानवेन्द्रनाथ रॉय या नांवानें अमेरिकेंतील गदर-आंदोलनांत सामील होऊन हा शूर लाला लजपतराय यांच्याबरोबर रहात असतां, रशियांतील मार्क्सक्रांतीनें या गड्याला वेड लावलें. कम्युनिस्ट–इंटर नॅशनलचे प्रतिनिधि म्हणून चीनमध्ये ते गेले होते. त्यानंतर त्यांना कॉमिन्टन्‌चा संबंध सोडून हिंदुस्थानांत यावें लागलें. हिंदुस्थान सरकारनें त्यांना सहा वर्षांची शिक्षा दिली. ती भोगून सुटल्यावर १९३६ सालीं तें काँग्रेसमध्यें आले. 'सर्व सत्ता जनतेच्या हातीं' हें त्यांचें घोषवाक्य होतें. फॅसिझम्‌विरोधी युद्धांत भाग घेण्याच्या मुद्द्यावर मतभेद होऊन त्यांनीं काँग्रेस सोडली. १९४६ मध्यें त्यांनीं आपला नवमानवतावाद मांडला. तो असा—

व्यक्ति हीच सर्व गोष्टींचा मानदंड आहे. स्वातंत्र्याची लालसा आणि जगाची जिज्ञासा या प्रगतीच्या प्रेरक होत. विवेक व इच्छाशक्ति यांच्या जोरावर मनुष्य इतिहास घडवितो. हा हक्क प्रत्येक व्यक्तीचा आहे. हेच विचार लोकशाहीस

पायाभूत होत. म्हणून कोणावर कोणाची सक्ती होता कामा नये. हाच मानवतावाद. समाजसुधारणेची ज्यांना उत्कट इच्छा आहे, त्यांनीं वरील गोष्टी ध्यानीं घेणें अवश्य आहे. व्यक्तिवाद अथवा समूहवाद, कोणत्याहि स्वरूपांत असला तरी, विद्यमान युगाचा शाप आहे. ज्योतीनें ज्योत पेटावी त्याचप्रमाणें व्यक्तिविकास ही निरंतराची साधना आहे.

या नवमानवतावादाचा पुरस्कर्ता मानवेन्द्र रॉय १९५४ च्या जानेवारींत दिवंगत झाला. ( ' एम्. एम्. रॉय ' श्रीनिवास अनंत भट कृत पाहा. )

काँग्रेसच्या ( १९३६–६० ) पंचविशींतील दुसरी विचारप्रवर्तक व्यक्ति जयप्रकाशनारायण होय. बिहारचा हा सुपुत्र अमेरिकेंतील पांच विद्यापीठांत १९२२ ते १९२९ पर्यंत विद्या संपादून हिंदुस्थानांत आला. त्याच्याकडे काँग्रेसनें १९३०–३२ सालीं चिटणिशी सोंपवून शेतीतील श्रमजीवींचा प्रश्न संशोधावयास सांगितलें. काँग्रेसच्या चळवळींतून त्यांस ' दुष्टान्न, उपवास, कारागृहीं वास घडलाच ! ' पण ते १९३०–४७ सालीं काँग्रेस कार्यकारिणीचे सभासदहि निवडले गेले. १९३४ सालीं त्यांनींच काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाची स्थापना केली. ' चले जाव 'च्या चळवळींत ' गुप्त ' होऊन ब्रिटिश सरकारच्या युद्धप्रयत्नांचा पाडाव करण्यांत ते पुढें होते. पं. जवाहरलाल नेहरूंसारखेच ते काँग्रेसचें नेतृत्व प्रभावीपणें करूं शकतील असा त्यांच्याबद्दल लोकविश्वास आहे.

आर्थिक विषमतेमुळें निर्माण होणाऱ्या भयंकर सामाजिक परिणामांचा कटु अनुभव विद्यार्थीदशेंतच आल्यामुळें मार्क्सच्या ग्रंथांच्या वाचनाची त्यांना आवड निर्माण झाली. त्यांतून समाजवादाची दीक्षा त्यांनीं घेतली होती. तीस अनुसरून आपणांस आपल्या पक्षास काँग्रेसच्या अंतर्गत राहून प्रभावी काम करतां येत नाहीं, असें आढळून आल्यामुळें ते १९४८ पासून काँग्रेसमधून अलग झाले आहेत. त्यांच्या मतें समाजवादाचीं व भारताच्या प्रगतीचीं अव्वल बीजें गांधीतत्त्वज्ञानांत पूर्णपणें भरलीं असल्यानें खेडीं व शेतकी यांच्या उद्धार-उन्नतीसाठीं ते विनोबाजी भाव्यांच्या भूदान–चळवळींत अलीकडे समरस झाले आहेत. अन्याय वा दुष्टावा असेल तेथें सत्याग्रहात्मक प्रतिकार केला पाहिजे, असा जयप्रकाशांचा मनोधर्म असल्याकारणानें, १९५६ मध्यें हंगेरींतील सोव्हिएट पशुवृत्तीला आणि १९५९ मध्यें तिबेटमधील कम्युनिस्ट चीनच्या आक्रमणाला विरोधी असें लोकमत उठविण्यांत जयप्रकाशांनीं भरीव कामगिरी केली आहे. भारतांत गांधीतत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनावर आधारलेला समाजवाद भारताला तारक होईल असा त्यांचा विश्वास आहे व लोकपाठिंबा मिळविण्याची हिंमतहि त्यांच्याजवळ भरपूर आहे. ( ' इंडिया टुडे ' फ्रँक मोरेस, पाहा. )

जयप्रकाश नारायणांच्या विचारधारेची आध्यात्मिक मूर्ति म्हणजे वैयक्तिक सत्याग्रहांतील पहिला मोहरा म्हणून महात्माजींनीं ज्यांची निवड केली होती, त्या विनोबाजी भाव्यांनीं महात्माजींच्या सर्वोदय समाजाच्या निर्मितीसाठीं १९५१ एप्रिलपासून भूहीनांना उद्योगी होता यावें याकरितां भूदान–यज्ञाची चळवळ सुरू केली असून, तिची परिणति "सब भूमि गोपालकी" या विचारसरणीपर्यंत नेली आहे. विनोबाजींनीं आपल्या पदयात्रेंत ५ कोटी एकर जमीन भूदानांत मिळवावयाची असें ध्येय धरलें असून त्या हिशोबीं त्यांना फक्त एकदशांशच यश आतांपर्यंत आलें आहे. तरीहि राजकारणबाह्य अशी विधायक राष्ट्रसेवेची दीपज्योति त्यांनीं भारतांत उभी केली असून, नैतिक स्निग्धतेनें ती प्रज्वलित राखली आहे. भूदानाची चळवळ ग्रामदानांत विकसित झाली कीं, आम्ही सरकारांत देखील सर्वोदयी चैतन्य निर्माण करूं, असा भारतीय संस्कृतीच्या त्या पुराणपुरुषाला विश्वास आहे. सरकारला जें करतां येणार नाहीं, तेंच आपण जनताजनार्दनाच्या सेवेसाठीं करतों, असा त्यांचा आत्मविश्वास आहे.

मागील सर्व विचारधारांपेक्षां भावपूर्ण लढाऊ विचारधारेचे भाग्यविधाते म्हणजे देशगौरव सुभाषचंद्र बोस. सुभाषचंद्र स्वातंत्र्यासाठींच जगले व दिवंगतहि झाले. त्या आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठीं त्यांनीं जे भगीरथ प्रयत्न केले, त्यांतील भीमबळाचें स्मरण इतिहासाला नेहमींच राहील. तेजस्वी विद्यार्थी आणि मर्मवेधक लेखक बाबूजी असले तरी ते विचारप्रवर्तकापेक्षां कृतिशूरच होते. छत्रपति शिवाजी महाराजांच्या परंपरेंतील कर्मयोगी म्हणूनच त्यांना पुढील पिढ्या स्मरतील. कुशल संघटक आणि कडक शिस्तीचा कारभारी, अर्धवटपणाचा वा अंगचोरपणाचा तिटकारा करणारा, हातीं घेतलेल्या कामांत जीव लावणारा असा हा नेताजी क्रांतिकारक होता. तो बेगुमान नव्हता; वक्ता नव्हता, पण नाना मंडळें हलविणारा चळवळ्या होता; विजेसारखा हलता–चमकता, ध्येयवादी, अविकसित भारताच्या उद्धारासाठीं राष्ट्रीय समाजवादाची अंमलबजावणी सक्तीनें करावी, मग त्यांत लोकशाहीच्या रंगारूपाला थोडा बाध झाला तरी चालेल, असें मानणारा होता. ब्रिटिश साम्राज्यवादाचा देशगौरवांना इतका तिटकारा होता कीं त्या साम्राज्याच्या शत्रूंना भारताचे मित्र म्हणवितांना त्यांना कांहीं वाटलें नाहीं. जीवनांत झालेल्या अनेक स्वाभिमान डिंवचणाऱ्या घडामोडींनीं ते एवढे वैतागले होते कीं, कीर्तिसह आपली मूर्ति व तिचें जीवन काळाच्या तोंडांत देऊन त्यांनीं देशभक्तीचें दिव्य केलें. भारतीय तरुणांसाठीं त्यांनीं ठेवलेल्या या देशभक्तीच्या कसोटीच्या वारसाला तोड नाहीं.

सेवा–स्वार्थत्यागानें भारताची भक्ति करण्याची शिकवण सुभाषबाबूंनीं विवेकानंदांपासून व बाबू अरविंद घोष यांच्यापासून घेतली होती. १९१६ सालीं विद्यार्थीदशेंत असतांनाच बाबूजी हागओकीच्या व देवीच्या रोगांना खेडूत बळी पडताहेत, हें पाहून तेथें प्रत्यक्ष सेवेला गेले होते. १९२१ च्या जुलैमध्यें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा पास होऊनहि सरकारी नौकरी न करतां ते भारतीय स्वातंत्र्याची सेवा करूं लागले. महात्माजींच्या असहकाराचा तेव्हां भर होता. त्या दिवसापासून ऑगस्ट १९४५ मध्यें देवाघरीं जाईपर्यंत भारतीय स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय लढ्याच्या धुमश्चक्रींत बाबूजींचें सर्व आयुष्य गेलें. इंग्रजी राजवटीनें त्यांना अकरा वेळां तुरुंग दाखवून त्यांच्या आयुष्याचीं ७ वर्षें घेतलीं. त्याशिवाय रुग्ण वा विजनवासी म्हणून बाबूजींची आठ वर्षें गेलीं. आपटलें कीं जोरानें चेंडूसारखी उसळी घेण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळें अनत्याचार हें बाबूजींचें कालसूचित शस्त्र होतें, तर महात्माजींचा तो धर्म होता. त्यामुळेंच आपला धर्म तडीला नेऊनच जोड मिळवावयाची, एवढीच तडजोड बाबूजींना ठाऊक होती; "त्वयार्ध मयार्धं"ची तडजोड ते मानीत नव्हते. म्हणून १९२९ सालीं काँग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर करतांच शेतकरी-कामकरींचें राष्ट्रीय चळवळीसाठीं सैन्य उभारण्याचा ठराव बाबूजींनीं काँग्रेसपुढें ठेवला होता. त्याचप्रमाणें १९३३ सालीं महात्माजींनीं कायदेभंगाची चळवळ मागें घेतांच, काँग्रेस–अंतर्गत अशी लढाऊ कार्यक्रम असलेली नवी असहकारवादी फळी उभारली पाहिजे, असेंहि बाबूजींनीं व्हिएन्नाहून जाहीर केलें. या वृत्तीची परिणति १९३९ सालीं काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजिनामा बाबूजींनीं देण्यांत झाली. त्यांनीं मग "फॉरवर्ड ब्लॉक" म्हणून जहाल तरुणांचा पक्ष काढला. १९३३ सालींच नेताजींनीं आल्फेड टर्नार या अमेरिकन बातमीदाराला मुलाखत देतांना भविष्य सांगितलें होतें कीं, फाशिस्ट राष्ट्रें नवें जागतिक युद्ध सुरूं करतील व तीच हिंदुस्थानला स्वतंत्र होण्याची संधि आहे. तें युद्ध १९३९ मध्यें आल्यावर मात्र नेताजींना काँग्रेमध्यें स्थान नव्हतें, तर ब्रिटिश सरकारनें त्यांना तें बंदिवासांत दिलें होतें. २७ जानेवारी १९४१ ला ६२ पहारेकऱ्यांच्या कचाट्यांतून, आग्ऱ्याहून निसटलेल्या शिवाजीसारखे नेताजी नाहींसे झाल्याचें ब्रिटिश सरकारला आढळलें. फेब्रुवारींत काबुलास व मार्चमध्यें बर्लिनला ते गेले, हें वर्षभर जगाला कळलेंहि नाहीं. युरोपमध्यें दोन वर्षें ते होते. १५ फेब्रुवारी १९४२ सेजीं सिंगापूर पडल्यावर बारा दिवसांनीं नेताजींचा जो "चलो दिल्ली"चा पुकार झाला त्याचें स्वागत जगांतील सर्व भारतीयांनीं केलें. त्यालाच प्रतिसाद देण्यासाठीं ऑगस्ट १९४२ मध्यें "छोडो–हिंद"ची चळवळ काँग्रेसनें केली असें पुष्कळ राजकीय विचारकांचें

मत आहे. जून १९४३ मध्यें जर्मनींतून नेताजी टोकीओंत आले. ५ जुलै १९४३ ला सिंगापूर येथें आझादसैन्य म्हणून आपल्याकडे साठ हजार सैन्य असल्याचें नेताजींनीं जगास सांगितलें. २१ आक्टोबर १९४३ रोजीं आझाद–हिंद–सरकारची स्थापना नेताजींनीं केली. १९४४ च्या फेब्रुवारींत आझाद–हिंद–सैन्य हिन्दकडे कूच करूं लागलें तशी आझाद–हिंद–सरकारची मुख्य कचेरी बँकॉककडे गेली. अशा तऱ्हेनें उठाव करीत असतांच, टोकिओस एका विमानांतून १८ ऑगस्ट रोजीं जात असतां, फोर्मोसामध्यें अपघातानें नेताजींचा अंत झाला ! !

नेताजींबद्दल भारतीयांना केवढा नितान्त आदर होता, त्याची अभिव्यक्ति आझाद हिंद सैनिकांवरील खटला ब्रिटिश सरकारनें चालू केला तेव्हां चांगलीच झाली. पं. नेहरूसुद्धां सर्व जबाबदार नेते आझाद सैनिकांचा पाठपुरावा करूं लागले आणि भुलाभाई देसायांनीं त्यांची वकिली करून चांगली बाजू राखली.

( थॉम्सन् कृत 'रिकन्स्ट्रक्शन ऑफ इंडिया' पहा. )

नेताजी सुभाषचंद्रांना अभिवादन करून अन्यत्र दृष्टि वळवतांच भारताचा पोलादीपुरुष आणि काँग्रेसचा हनुमंत महाबळी वल्लभभाई पटेल यांची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहते. खेडा, बोरसद, नागपूर, बारडोली येथील सत्याग्रहांचा हा नेता काँग्रेसच्या सामूहिक चळवळींचा नियंत्रकच असे. भारतांत पांचशेंएक संस्थानें समाविष्ट करून घेण्यांत, वल्लभभाईंनीं स्वराज्योदयानंतर जें कौशल्य दाखविलें तें केवळ अपूर्वच होय. हाच त्यांचा कणखरपणा लष्करी शिस्तीनें पक्षसंघटना करण्यापासून सर्व गोष्टींत प्रतीत होई.

खेडयाच्या शेतकऱ्यांना १९१७ सालीं पटेलांसारखा बॅरिस्टर सत्याग्रहाचा पुढारी म्हणून मिळाला तसें एक तऱ्हेचें तेज निर्माण झालें. वल्लभभाईच्या राजकारणी जीवनाचा प्रारंभ असा लोकसंग्रही व चमकदार होता. १९२१ पासून वल्लभभाई गुजराथचे राजकीय पुढारीच ठरले; कारण त्यांच्यामुळेंच अहमदाबादची काँग्रेस टिपीनें पार पडली होती. त्यावर बारडोलीपर्यंतचे लढे यशस्वी करून वल्लभभाई सार्थपणें लोकांचे 'सरदार' झाले. अडाणी शेतकऱ्याला शहाण्या जुलूमशाहीशीं सत्याग्रही टक्कर द्यावयास शिकवणारा राजकारणी वस्ताद म्हणून आतां वल्लभभाईची कीर्ति झाली. बारडोलीचाच अनुभव वल्लभभाईंना काँग्रेससंस्थेस राजकारणी लढवय्या बनविण्यांत फार उपयोगी पडला. महात्माजींच्या सत्याग्रही लढ्याच्या यशासाठीं आध्यात्मिक मनोवृत्तीचें व्यक्तिमत्त्व आवश्यक आहे, असा वल्लभभाईचा अनुभव होता. शेतीवर प्रेम करणाऱ्या

मनोवृत्तींतून वल्लभभाईंचा कणखरपणा जोपासला असल्यामुळें मालकी हक्क नष्ट करणाऱ्या मार्क्सवादासारख्या वादांबद्दल वल्लभभाईंना यत्किंचितहि प्रेम नव्हतें. महात्माजींचें राजकीय तत्त्वज्ञान आणि वल्लभभाईंचें संघटनाकौशल्य यांच्या प्रीतिसंगमानें काँग्रेसला बहुजनसमाजाची लढाऊ संघटना असें स्वरूप प्राप्त झालें. महात्माजींनी ना. गोखल्यांच्या इच्छेप्रमाणें राजकारणाला अध्यात्माची जोड दिली असली तर लो. टिळकांच्यामागें वल्लभभाईंनींच बहुजनसमाजाच्या प्रातिनिधिक संघटनेचें स्वरूप काँग्रेसला दिलें. त्यामुळेंच वल्लभभाई हे महात्माजींचे उजवे हात होते.

चळवळ्या संस्थेचें स्वरूप टाकून काँग्रेसनें संसदीय पक्षसंस्थेचें स्वरूप धारण करतांच तेथेंहि वल्लभभाईंची संघटनाचातुरी आणि 'बोले थोडें। करी फार' ही वृत्ति फलदायीच ठरली. विसाव्या शतकाच्या तिशी–चाळिशी–पन्नाशींत संघटनात्मक कार्यासाठीं वल्लभभाईंनीं जी केंद्रागणिक संचालकांची मालिका निर्माण केली, त्यामुळें सेनापतीच्यामागें सुभेदारानें ती जागा भरून काढावी, तशी कार्यकर्त्यांची सांखळी तुटत नसे. हा धडा काँग्रेसमध्यें आणि भारतांतील सर्वच संघटनांतून सातत्यानें गिरवण्यासारखाच आहे. पार्लमेंटरी सबूकमिटीचे नायक म्हणून अखिल भारतांतील विधिमंडळाच्या काँग्रेस सभासदांत नि त्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा राखतांना जो अनुभव वल्लभभाईंनीं घेतला, तो स्वतः भारतसरकारांत त्यांनीं गृहमंत्र्याची जागा पत्करल्यावर प्रभावी करून दाखविला.

काँग्रेस-संघटनेच्या एकजिनसी प्रतिष्ठेकरितां, वल्लभभाईंच्या लष्करी घाटणीच्या कणखरपणामुळें १९३७ सालीं नरिमन-प्रकरण व १९३८ सालीं डॉ. खरे-प्रकरण गाजलें. तरीहि वल्लभभाई डगमगले नाहींत. कारण त्यांनीं घेतलेला निर्णय व्यक्तिविचारानें घेतला नव्हता, तर परिस्थितिसापेक्ष विवेक-शुद्धतेनें घेतला होता.

जीवनादर्शांच्याबाबत वल्लभभाई सनातनीच होते. १९४८–१९४९ सालीं तेलंगणांत कम्युनिस्टांनीं सशस्त्र उठाव करतांच वल्लभभाईंनीं तो तात्काळ शमविला. वर्गविग्रह अनावश्यक नि अनिष्टच ते मानीत. पुंजीवाले व श्रमजीवी यांचा सहकार नि सहभागीदारी असावी, असें त्यांचे स्वभावविशेष होते. 'पीळदार मनाचा नि पोलादी निश्चयाचा कर्मयोगी देशभक्त' असें त्यांच्या-बद्दल सर्वत्र बोललें जातें. १९३५ नंतर या व्यवहारचतुराचें पुष्कळसें कार्य पार्श्वनाथाचेंच होतें. तुटक, त्रोटक पण तड गांठणारें वक्तृत्व वल्लभभाईंनींच करावें, अशी त्यांची ख्याति होती. भारतीय राष्ट्रीयत्वाचे ब्रह्मदेव लो. टिळक,

द्रष्टे महात्माजी, भाष्यकार व आविष्कारक पं. नेहरू, तसेंच संघटनात्मक शक्ति-देवता वल्लभभाई पटेल होत.

या सगळ्या विचारधारांच्या प्रवर्तकांना भारताचे वर्तमानकालीन प्रश्न तर सोडवावयाचे होतेच, पण त्याबरोबरच जगापुढें असलेल्या महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या जबाबदारीचा भारताकडे येणारा वांटाहि उचलावयाचा होता. आतांहि तीच अवस्था चालू राहणारच आहे. आपली आर्थिक प्रगति घडवून आणण्याच्या व पंचवार्षिक योजना पार पाडण्याच्या कार्यांत भारताचे नेते गढून गेले असले तरी विज्ञानानें आणि बुद्धिवादानें दिलेलें आव्हान भारतीयांनीं स्वीकारलेंच पाहिजे; तरच जगांत निभाव ! भविष्याकडे दृष्टि ठेवून कांहीं तरी साध्य करून घेण्याच्या हेतूनें, श्रद्धेनें आणि जोमानें भारतीयांनीं काम केलें पाहिजे. त्याचबरोबर सातत्याइतकेंच आवश्यक बदलांचें मूल्यमापन कालपरिपक्वपणें ज्या समाजाला आकलन करतां येतें, तोच खरी क्रांति करूं शकतो.

ज्या देशांचा पूर्ण विकास घडून आलेला नाहीं अशांपैकीं बहुतेक देशांपेक्षां भारत अधिक पुढारलेला आहे. तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आज जीवन फार गुंतागुंतीचें झालें आहे. विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीमुळें जगाचे बहुतेक सर्व आर्थिक प्रश्न सोडविणें शक्य झालें आहे. कल्याणकारी राज्य हें ध्येय भांडवलशाही व समाजवादी अशा सगळ्याच राष्ट्रांनीं स्वीकारलें आहे. त्यांचे मार्ग भिन्न आहेत. या भिन्नतेंतूनच एक जागतिक समस्या निर्माण होत आहे.

आंतरराष्ट्रीयदृष्ट्या, जागतिक शांतता हाच आज-उद्यांचा प्रमुख प्रश्न आहे. सर्वसंहारक युद्ध पत्करावयाचें कीं कोणत्याहि देशाला आपला विकास स्वतःच्याच मार्गानें घडवून आणण्याची मोकळीक राहील; अशी व्यवस्था राखावयाची, या धोरणावर नि त्यासाठीं घ्यावयाच्या व्रतावर सर्व गोष्टीं अवलंबून आहेत. साम्राज्यशाही किंवा वसाहतशाही आजच्या जगाशीं पूर्ण विसंगत असून संघर्षाचें मूळ ठरणारी आहे. ज्यायोगें तेढीच्या भावना कमी होतील आणि संघर्षाचा संभव शेवटीं नाहींसा होईल असाच कार्यक्रम वास्तववादी ठरेल. भारताच्या पंचशील तत्त्वांनीं हा मार्ग सुलभ करून दिला आहे.

भारतानें हातीं घेतलेल्या स्वोन्नतीच्या व जागतिक शांतिसंवर्धनाच्या कार्यामध्यें बहुजनसमाजाचें पुरेपूर सहकार्य मिळणें अत्यावश्यक आहे. त्याला मान्य होईल व त्यापासून अपेक्षित फलप्राप्ति होईल अशी खात्री पटल्याशिवाय बहुजनसमाजाचें सहकार्य मिळणार नाहीं. सामाजिक न्याय व समानता प्रस्था-

पित करणें हें वरील ध्येयाचें साधन ठरेल. हें साधन शास्त्रीय दृष्टि ठेवूनच वापरणें जरूर आहे.

समाजविकासाची मोहीम भारतांत अर्ध्या तपाच्या पुढें चालू आहे. तिचा लाभ तीन लाखांहून अधिक खेड्यांना होत आहे. भारताचें जीवनमान क्रांतिप्रवण आहे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या लायकी-कर्तबगारीनुसार स्वतःचा विकास घडवून आणण्याला पूर्ण वाव मिळावा असा रोख आहे. औद्योगिक क्षेत्रांत, विज्ञानांत, तंत्रशास्त्रांत भारताची प्रगति व्हावी व त्याचबरोबर भारतीयांचें शील नि त्यांच्या मनाची सखोलता वाढून कर्तव्यें आणि जबाबदाऱ्या ते केव्हांहि सांभाळूं शकतील, यांवर डोळ्यांत तेल घालून पाहणारें नेतृत्व, भारतांत जोपासण्याची दक्षता काँग्रेससारख्या पुरोगामी संस्थेनें घेणें, तिच्या आजवरच्या इतिहासास शोभण्यासारखें आहे.

● ● ●

# १२

★

## काँग्रेस-अनुयायांची संघटनात्मकता

सरदार वल्लभभाई पटेल प्रभृतींच्या संघटनाचातुरीनें काँग्रेसची यंत्रणा सुसूत्र झाली. संस्थेची सत्ता व सर्वाधिकार तिच्या कार्यकारिणींत केंद्रित झाला असून ही कार्यकरिणी अखिल भारतीय काँग्रेस कमेटींतून निवडली जाते. १९१७ च्या काँग्रेसच्या ठरावाप्रमाणें काँग्रेसनें आपल्या भाषावार प्रादेशिक काँग्रेसमित्या १९२२ पासूनच सुरू केल्या होत्या; त्यांचें कालानुरूप स्वरूप स्वातंत्र्यकाळांत आतां राज्यनिहाय प्रादेशिक काँग्रेससमित्यांत झालें असून प्रादेशिक काँग्रेससमितींतील एकेक अष्टमांशाची मिळून अखिल भारतीय काँग्रेस-समिति होते. काँग्रेस संस्थेची ही लोकसभाच होय. हिच्यांतूनच काँग्रेसचे अध्यक्ष आपली कार्यकरिणी वीस-एकजणांची निवडतात. या कार्यकारिणीच्या तंत्रांत पार्लमेंटरी बोर्ड व मध्यवर्ती निवडणूक समिति या दोन शाखा काम करीत असतात. प्रदेशासुद्धां मध्यवर्ती लोकसभांच्या व मंत्रिमंडळाच्या कामकाजावर देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचें काम पहिली संस्था करीत असून, दुसरीचें काम सगळ्या विधिमंडळाचे उमेदवार मुक्रर करण्याचें असतें. काँग्रेस कार्यकारिणींचा निर्णय हाच सर्व सभासदांस आदेशात्मक निर्णय असतो. पण त्यांच्या पायाभूत असणारें धोरण काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन ठरवीत असतें. त्या धोरणाचा अर्थ लावून तें कार्यवाहींत आणणें अखिल भारतीय काँग्रेससमितीचें कार्य असल्यामुळें काँग्रेस कार्यकरिणी विचारपूर्वक त्या धोरणाची अंमलबजावणी करीत असते. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, त्यांतूनहि महात्मा गांधी व सरदार पटेल यांच्या मृत्यूनंतर, काँग्रेसमध्यें काय अगर

काँग्रेसपक्षीय सरकार-दरबारांत काय, पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाइतका प्रभाव दुसऱ्या कशाचाच पडत नसल्याकारणानें, त्या व्यक्तिमत्त्वानें भारताच्या मध्यवर्ती सरकारी कारभाराचे धागेदोरे जसे विणले जातात, तसेंच काँग्रेस संस्थेच्याहि धोरणाचरणाचे आडाखे-आराखडे ठरविले जातात, यांत शंकाच नाहीं. त्यामुळें अधिकारप्रविष्ट काँग्रेसजन प्रभावी ठरत असले तरी काँग्रेस-संस्था नि काँग्रेसपक्ष मंदप्रभ आहे. महात्माजींच्या वेळेपासून काँग्रेसच्या विधायक चळवळीसाठीं असलेल्या शाखोपशाखांतून काम करणारे जे कार्यकर्ते अधिकारक्षेत्राच्या बाहेर आहेत त्यांची सेवाव्रतधारी तपश्चर्या मात्र एकजिनसीपणानें नि अप्रसिद्धीनें चालूंच आहे. पण ते असंख्य नाहींत म्हणूनच् अगण्य ठरले आहेत. त्यांना काँग्रेससरकारशीं वा काँग्रेससंस्थेशीं स्पर्धा तर नाहींच, पण संघर्षहि करावयाचा नसतो. काँग्रेसची ही विधायक फळी सेवासातत्यानें एवढी वजनदार राहील कीं, एक दिवस लोकच या फळीला सत्तास्वीकृतीचा आग्रह करतील; पण तो दिवस उगवावयाचा तर भारत हें आदर्श राष्ट्र ठरलें पाहिजे, असें मत १९४७ च्या डिसेंबरमध्यें महात्माजींनीं प्रतिपादन केलें होतें.

स्वातंत्र्योदयानंतरचीं तीन वर्षें दुखंड झालेल्या हिंदुस्थानांतील भारताच्या विस्काळित शक्तींना एकवटण्यांत आणि एकंदरीनें पुनरुज्जीवन साधण्यांत काँग्रेस-जनांना सर्व राष्ट्राच्या सहानुभूतीनें व सहकारानें घालविणेंच कर्तव्य ठरलें. त्यामुळें भरधावी नेहरू व धीमे सरदार यांच्या धोरणांत फरक असूनहि तो देशाच्या लक्षांत आला नाहीं कीं नेहरूपुरस्कृत आचार्य कृपलानींचा पराभव करून पटेल-पुरस्कृत पुरुषोत्तमदास टंडन १९५० मध्यें काँग्रेसचे अध्यक्ष निवडून आल्यामुळें खळबळ उडाली नाहीं. १९५० च्या डिसेंबरमध्यें सरदार स्वर्गवासी झाल्यावर, १९५१ च्या उतरणींत नेहरूंनीं काँग्रेस कार्यकारिणीचा राजिनामा देतांच टंडनबाबूंनींच त्यांस आपली जागा खालीं करून दिली. त्यामुळें तर चार वर्षें भारताचे पंतप्रधान व काँग्रेसचे अध्यक्ष एकजीव झाले. त्यामुळें काँग्रेस-संस्थेंतच एक मनोवृत्ति मूळ धरून बसली कीं, भारताचे पंतप्रधान ठरवतील तें धोरण नि बांधतील तें तोरण मान्य करीत रहावें. १९५५ पासून १९५९ च्या फेब्रुवारीपर्यंत ढेबरभाई अध्यक्ष झाले अगर पुढें श्री. इंदिरा गांधी अध्यक्ष झाल्या आणि त्या दोघांनाहि स्वतंत्र मतें नि कार्याच्या दिशा ठरवितां येत असल्या तरी काँग्रेसजन पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वापुढें कशास मानावयास तयार नसल्यानें, राजकारणी मार्गदर्शन पंडितजींकडेच राहिलें. आणि याचें कारण भारताच्या कारभारयंत्रणेंत गुंतलेल्या काँग्रेसजनांचे, त्यावर नियंत्रण करणाऱ्या पार्लमेंटरी बोर्डाचे आणि निवडणूकमंडळाचे एकमेकांशीं व त्या सर्वांचे स्वतंत्र काँग्रेस संघटनेशीं नि काँग्रेस कार्यकारिणी आणि अखिलभारतीय काँग्रेससमिति

यांच्याशीं काय, कसे नि कितपत संबंध असावेत, याबद्दल स्पष्ट नियमावली अगर शिस्तबद्ध योजना आंखण्याचें कोणीच मनावर घेतलें नाहीं. त्यांच्या अभावीं हरळीच्या मुळीसारखी असणारी खेडयापाडयांतील व बहुजनसमाजाशीं समरस होणारी गांव-काँग्रेस-कमिटी वा विभाग-काँग्रेस-कमिटीहि आपली पहिली वळकटी दाखविनाशी झाली आहे.

शांततेच्या नि कायदेशीर मार्गांनीं भारतीय जनतेची प्रगति व सुख-स्वास्थ्य साधावयाचें ध्येय १९४८ च्या एप्रिलमध्यें काँग्रेसनें मुक्रर केलें आहे. त्या ध्येयानुसार सहकारी सर्वोदयी समाजरचना तयार करावयाची असून सर्वांना समान संधि आणि राजकीय, आर्थिक, सामाजिक हक्कांबाबत निःपक्षपाताची वागणूक मिळवावयाची आहे. त्याचबरोबर जागतिक शांति व सहजीवन हेंहि सांभाळावयाचें आहे. या सर्व गोष्टींवर निवडणूक-जाहीरनाम्यांत काँग्रेसपक्ष भर देतच असतो. खेडुतांच्या जीवनाची सौभाग्यसंपन्नता हाहि एक साध्याचा भाग असल्याकारणानें, खासगत उद्योगधंद्यांना क्षेत्र मोकळें ठेवलें तरी देशांतील पायभूत उद्योग-धंदे सरकारी व्हावेत, सरकारी नियंत्रणाखालीं असावेत वा सरकारी तंत्रानें चालावेत अशीं पावलें काँग्रेस पक्षाकडून पडत असतात. या आणि आनुषंगिक प्रवृत्तींचा परिणाम १९५७ च्या सार्वजनिक निवडणुकांतहि दिसून आला आहे. काँग्रेसपक्षाला केरळशिवाय इतरत्र मंत्रिमंडळें स्थापतां आलीं तरी विरोधी पक्षाचेंहि बळ भरपूर वाढलें. १९५१–५२ च्या पहिल्या सार्वजनिक निवडणुकीनंतरहि पक्षोपपक्षांच्या हमरीतुमरीमुळें १९५० त पंजाबमध्यें जशी कित्येक महिने घटना-तहकुबी होती तशीच १९५३ त पेप्सूमध्यें, १९५४त आंध्रमध्यें आणि त्रावणकोर-कोचीनमध्यें १९५६ त घटना तहकुबीचे प्रसंग आलेच होते. इतर पक्षियांतील समूहशाही, काँग्रेसचा बहुजन समाजाशीं अनेक तपांचा निकट संबंध, काँग्रेसनें चळवळींचीं केलेलीं दिव्यें यामुळें काँग्रेसला बहुमताची वाण नाहीं. तथापि तळापासून देशभक्ति-प्रेरित शीलवंत नेतृत्वाचा जाणता पुरवठा कमी होत गेल्याकारणानें, शहाणपणांपेक्षां सत्ताधिकाराकडे व आनुषंगिक उपभोगरतीकडे झुकता कल आहे, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करतां येण्यासारखें नाहीं. राष्ट्रीय पातळीवर विचारसरणीची सर्वसामान्य बैठक न राहतां प्रादेशिक आणि स्थानिक हितसंबंधांच्या पातळीवर तरुणांची विचारसरणी स्थिर होऊं देण्यांत काँग्रेसपक्षाकडून कर्तव्याची ढिलाईच होईल. त्यानें राष्ट्रीयत्व आणि लोकशाहि या दोघोंनाही धक्का बसेल.

राज्याराज्यांतून इतर सर्व पक्षांप्रमाणेंच काँग्रेसमध्येंहि मतमतांतराच्या असणाऱ्या फळ्या आंतल्याआंत सूक्ष्म असल्या तरी एका बाजूनें काँग्रेसचा

जनतासंपर्क आणि दुसऱ्या बाजूनें काँग्रेसश्रेष्ठींची प्रतिष्ठा कमी करण्यांत त्या कारणीभूत होत आहेत, हें निरीक्षकांच्या लक्ष्यांत आलेलें आहे. १९५९ च्या नागपूर काँग्रेसनें केलेल्या सहकारी शेतीच्या ठरावाबाबत काँग्रेसजनांत मतभेद असले तरी कम्युनिस्ट नेहरूंना पाठिंबा देत आहेत व केरळमध्यें १९५७ पासून असलेलें कम्युनिस्ट प्रधानमंडळ लोकक्षोभानें अधिकारसंन्यस्त झालें तरी मन वळवून सामाजिक स्थिति बदलण्याच्या पंडित नेहरूंच्या लोकशाही वृत्तीचा फायदा घेऊं पहात आहेत.

मग सहजच विचार येतो कीं, भारताचें स्वराज्य कशाकरितां ? जी अर्धीअधिक, अर्धपोटी व अर्धनग्न जनता हाल काढी, तिला अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळावयास अवधि तरी केवढा लागणार आहे ? राष्ट्रोन्नतीचें सर्व काम ज्या एकमेव भांडवलावर व्हावयाचें तें म्हणजे जनतेचा आत्मविश्वास पैदा झाला आहे काय ? दोन जागतिक महायुद्धें झालीं आणि शेवटीं भारतांतील सैन्यदेखील ब्रिटनला अनुकूल उरलें नाहीं हें इंग्लंडच्या मजूरपक्षीय महामंत्र्यांचें वचन खरें धरलें आणि अशा बाह्य कारणांनीं भारताला स्वराज्य मिळालें असा काँग्रेस-विरोधकांचा दावा घटकाभर जमेस धरला, तरी चाळीस वर्षें काँग्रेसनें चळवळ करून भारतावरील राजकीय अन्याय जगाच्या चव्हाट्यावर नुसत्या शब्दपांडित्यानें नव्हें तर आसेतुहिमालय चळवळी उभारून व परकीय राज्यकर्त्यांना " सळो कीं पळो " करून सोडून आपल्या अनुयायांच्या त्यागानें मांडला, ही गोष्ट कोणाहि चिकित्सकाला अमान्य कशी करतां येईल ? आणि म्हणून प्रयत्नसातत्याच्या वाढत्या तेजानें भारताची सेवा करणाऱ्या काँग्रेसपक्षीयांकडे स्वराज्यकारभाराचीं सूत्रें सुपूर्त झालीं, यांत कांहींच अस्वाभाविक नाहीं. तथापि काँग्रेस अखिल भारताच्या एकमेव राजकीय प्रतिनिधित्वावर जर आपल्या सततच्या तपश्चर्येनें हक्क सांगत होती, तर "फोडा-झोडा " धोरणाचें ब्रिटन सत्तांतर करूं लागतांच, जें भारताला दुखंड व्हावें लागावयाचें, त्यास काँग्रेसचें खास अधिवेशन भरवून लोकशाहीच्या तत्त्वावर ( असहकाराच्या १९२०–२१ च्या कार्यक्रमाप्रमाणें ) राष्ट्राची संमति कां बरें घेण्यांत आली नाहीं, असा प्रश्न राहतोच. राष्ट्रप्रतिनिधित्वाचा लोकशाही हक्क सांगण्यांतील आत्मविश्वासाचा तो अतिरेक स्वराज्यांतील राज्यकारभारांतहि व्यापृत राहिल्याकारणानें जनतेंतील स्वराज्याबद्दलचा जिव्हाळा आत्मविश्वासानें उमटेना. स्वराज्यशासनकालांत झालेल्या दोन सार्वजनिक निवडणुकांचा खाते-उतारा व ताळेबंद अभ्यासकाला बोधप्रद झाल्यावांचून राहता ना ! पन्नास टक्क्यांहूनहि कमी मतदान पदरीं पडून प्रतिनिधित्वांत बहुसंख्या वांट्यास आल्याकारणानें, " विजयासारखें दुसरें विजयी काय ?" या झोकांतच लोकाभिमुख सेवावृत्ति जागच्या जागींच स्वस्थ झाली म्हणावयाची !

दुसरीं कारणें महत्त्वाचीं आहेत. काँग्रेसनें सत्ता घेण्यापेक्षां, ब्रिटिशांनीं सत्ता सोडली; दुसऱ्या जागतिक महायुद्धांतच सर्व जगभर ज्या नैतिक घसरगुंडीला सुरवात झाली तिच्या तडाक्यांतून भारतीय जनताहि अलिप्त राहूं शकली नाहीं; हिंदुस्थान दुभंग झाल्यानें ओढवलेल्या आपत्ति सामाजिक, आर्थिक नि राजकीय बळकटीला हादरा देणाऱ्याच ठरल्या; शासनाधिकार काँग्रेसच्या हातीं आल्यावर त्या संस्थेंतील लोलुप मनांच्या आशाआकांक्षांच्या संतोषासंतोषाचे ताजवे अपरिहार्यपणें हेलकावे खाऊं लागले. (नागपूरचे माधवराव कानेटकर कृत "काँग्रेसला शेवटचीं संधि" या पुस्तकाच्या इंग्रजी–हिंदी आवृत्तींच्या श्री. एच्. व्ही. कामत व श्री. दादा धर्माधिकारी यांनीं लिहिलेल्या प्रस्तावना पहा.) आणि या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, "भारत ही माझी जन्मभूमि, ही माझी मातृभूमि, हिची सेवा हें माझें ब्रीद," या व्रताचा वापर न करतां विसर करण्यांत आपण पाप करतों आहोंत हें भानहि अनेकांअनेकांना राहिलें नाहीं.

अजूनहि म.गांधींनीं आत्मनिरीक्षणाची दिलेली शिकवण परिपाठांत ठेवून स्वतःच्या सद्बुद्धिची आणि सेवावृत्तीची हुंडी जनतेच्या अंतःकरणाच्या पेढीवर कार्यकर्ते पटवीत राहतील तर सहजीवन, सहकार आणि सदिच्छा यांचा तुटवडा जनता कधींच पडूं देणार नाहीं. एवढेंच नव्हे तर, स्वार्थत्यागानें नि सहनशक्तीनें भारताच्या स्वातंत्र्य-संगोपन-संवर्धनांतील, तेजोवर्धनासाठीं जनता जिवापाड झटेल. जनता कार्यकर्त्यांचा अधिकार मानील पण त्या अधिकारांत जनतेच्या आशा-आकांक्षांचा अमृत आविष्कार असला पाहिजे. लोकशाही समाजांत लोकांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्या आशेला वाव देऊन आणि त्यांची स्थिति क्रमाक्रमानें सुधारून, नेटाचे प्रयत्न करण्याला त्यांना उद्युक्त करण्याची कितपत शक्ति आहे यावरच सर्व कांहीं अवलंबून असतें. व्यक्ति-व्यक्तिची प्रतिष्ठा आणि हक्क यांची जपणूक व आपापल्या आनुषंगिक जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या कर्तव्याच्या जाणिवेची जोपासना हा लोकशाहीचा पाठकणा आहे. मग त्या लोकशाहीचें रूप कसेंहि असो. या व्यक्ति-स्वातंत्र्याची कसोटी मात्र अशी आहे कीं, भविष्यकालाकडे नजर ठेवून बौद्धिक निर्णय घ्यावयाचा व तो घेतांना, भूत-वर्तमान स्थितींतून त्याचा विकास करण्याची प्रवृत्ति समतोल, निर्भीड व निःस्वार्थी पण समाजहितवर्धक अशी सांभाळावयाची. ती सांभाळावयास जीवन कसें जगावें आणि स्वतःसाठीं व समाजासाठीं जीवनाचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घ्यावा, हा सूज्ञपणा माणसाच्या ठिकाणीं असला पाहिजे. काँग्रेसमध्यें खालपासून वरपर्यंत ही धारा घेण्यांतच तिचें तेज आहे.

● ● ●

१३

*

# उद्यांची राष्ट्र-सभा

## ७५ वर्षे

भारतीय जीवनांत राष्ट्रीय सभा स्थिर होऊन पाऊणशें वर्षांचा काळ लोटलेला आहे. देशाच्या पारतंत्र्याच्या आणि स्वातंत्र्याच्या काळांत अनेक पक्षोपपक्ष उदयाला आले. परंतु काँग्रेस या देशव्यापी संघटनेचें प्राबल्य आणि लोकप्रियता रतिभरहि कमी झालेली दिसत नाहीं. नेमस्त, क्रांतिकारक, टिळक-पक्ष आणि गांधीजींचा कालखंड असे ठळक टप्पे या संस्थेच्या विकासांत होऊन गेले. या विविध प्रकारच्या प्रवृत्तींनीं काँग्रेसला अनेक चांगल्या गोष्टींची जोड करून दिली. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं आपला देश स्वतंत्र झाला. या मंगल घटनेपासून नेहरूंच्या असामान्य कर्तृत्वाचें युग सुरू झालें. नेहरूंच्या प्रभावशाली अशा जागतिक व्यक्तित्वामुळें 'नेहरूंच्या नंतर कोण' असा एक मर्म-भेदक प्रश्न अत्यंत तळमळीनें चर्चिला गेला. स्वतः काँग्रेसमधील नेत्यांनीं आणि विविध गटांनीं या संस्थेचें अन्तरंग पुन्हां एकदां उजळून टाकावें, या संस्थेची संघटना पुन्हां एकदां बलशाली करावी, या संस्थेचा ध्येयवाद आणि धोरण पुनश्च नीटनेटकें मांडावें यासाठीं प्रयत्न केले व आजहि प्रयत्न केले जात आहेत. स्वातंत्र्यानंतर दोन सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि आतां आपला देश तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या उंबरठ्यावर उभा आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत काँग्रेसला सर्वत्र बहुमत मिळालें आणि काँग्रेस मंत्रिमंडळांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें राज्यकारभार केला. तरी देखील अगदीं अलीकडे कांहीं प्रांतां-तील मंत्रिमंडळांबाबत कटकटी होतच आहेत. या साऱ्या घडामोडींत जी एक तीव्र जाणीव प्रत्येक भारतीयाला होत आहे ती म्हणजे प्रबळ अशा अखिल

भारतीय विरोधी पक्षाची. अशी जाणीव होण्याचें कारणहि सयुक्तिकच आहे. एकपक्षीय लोकशाही व तिच्या भवितव्यासंबंधींची वाटणारी चिंता यामुळेंच ही जाणीव अधिक तीव्रतेनें होत आहे. १९४७ पासून आजतागायत कॉंग्रेसनें काय केलें याचा आपण विचार करूं लागलों, कीं मन क्षणभर थक्क होऊन जातें. उणीवांच्या कडेहि डोळेझांक करावी असा मोह निर्माण होतो. परंतु लोकशाहीच्या जो कणा म्हणजे शिक्षण या क्षेत्रांत जी प्रचंड निरक्षरता आपल्याला दिसून येते, त्यामुळें तर भारतांतील लोकशाहीच्या भवितव्याची अधिकच चिंता वाटूं लागते.

दोन पंचवार्षिक योजना झपाट्यानें पूर्ण करून सारा देश आज तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उपक्रमाचा विचार करीत आहे. काश्मीर, गोवा आणि त्याच्या जोडीला सरहद्दीवरील कटकटी यासंबंधींचे प्रश्नहि मन बेचैन करून टाकीत आहेत. देशांतील भाषेसंबंधींचीं भांडणें, विविध धर्मांच्या लोकांतील रागद्वेष आणि विविध हितसंबंधांतून निर्माण होणारीं वादळें हीं तर नित्याचींच होऊन बसलेलीं आहेत. जगांत लागणारे शास्त्रांतील क्रांतिकारक शोध व अस्त्रांची निर्मिति यांचाहि परिणाम सामान्य भारतीयांवर झाल्याशिवाय राहात नाहीं. वाढतें जीवनमान, अन्न-पुरवठा, परदेशी हुंडणावळ यांसारखे प्रश्नहि सामान्य माणसांच्या डोक्यांत विलक्षण वादळें निर्माण करीत आहेत आणि योगायोग असा कीं, या सर्व आघाड्यांवर बिनीला लढणारे आमचे राष्ट्रपुरुष काळाच्या ओघांत अस्तंगत होत आहेत. ज्यांनीं असामान्य त्याग करून या देशाचें भवितव्य घडविण्यासाठीं देह झिजविले असे आमचे धुरंधर नेते शरिरांत अखेरचा रक्तबिंदु असेतोंपर्यंत प्रचंड श्रम करीत आहेत. अशा वेळीं इतिहासानें, काळानें आपल्याला काय दिलें व जें दिलें त्याचें पुनरुज्जीवन करणें कितपत आवश्यक आहे याचा विचार करणें अपरिहार्य ठरतें.

*व्यापक सहिष्णुता*

आपल्या देशांत उदारमतवादी राजकारणाची एक महान् परंपरा तितक्याच महान् पुरुषांनीं चालविलेली होती. या राजकारणाला कांहीं मर्यादाहि होत्या व त्यामुळेंच हा पक्ष अस्तगंत झाला; परंतु या नेमस्त पुढाऱ्यांनीं आपलें राजकारण एका विशिष्ट उच्च पातळीवरून केलें. परमताबद्दल सहिष्णुता आणि आदर हें या लोकनेत्यांचें सूत्र होतें. स्वातंत्र्यकालांतील सर्व पक्षांच्या कार्यक्रमाचा आणि प्रचाराचा जर आपण इतिहास पाहूं लागलों तर ही व्यापक सहिष्णुता अभावानेंच आढळून येते. आपण कल्पनेंत देखील आणूं शकणार नाहीं अशा हीन पातळीवरून प्रचारकार्य झालेलें दिसतें. यांतूनच

हिंसेचे छोटेमोठे प्रकारहि घडलेले आढळतात. साहजिकच काँग्रेससारख्या अखिल भारतीय पक्षावर अशी सहिष्णुता वाढीला लावण्याची नैतिक जबाबदारी आपोआपच येऊन पडते. गांधीजींनीं आपल्या आचरणाने हा सहिष्णुतेचा महान् मंगल वारसा सर्व देशापुढें ठेवलेला होता. या सहिष्णुवृत्तीमागें गांधीजींनीं दोन महान् तत्त्वें पाठीराखी अशी योजिलेलीं होती. तीं तत्त्वें म्हणजे सत्य व अहिंसा हीं होत. ज्या तत्त्वांच्यासाठीं गांधीजींनीं आपलें स्वतःचें बलिदान केलें तीं तत्त्वें अक्षरमूल्यें मानून आचरलीं गेलीं तर भारतीय राजकारणांतील वातावरण पुष्कळसें निवळेल.

*सहकार्य*

नियोजनाचा आत्मा सहकार्य हा आहे, परंतु अनुभव असा येत आहे कीं, व्यापक समाजहितासाठीं देखील विरोधी पक्षीयांचें सहकार्य स्वीकारलें जात नाहीं. शिक्षण, विकास-योजना, अन्नोत्पादन, अस्पृश्योद्धार, सार्वजनिक आरोग्य, ग्रामोद्योग अशीं किती तरी क्षेत्रें सांगतां येतील कीं, जिथें सर्व पक्षांचें सहज एकमत होऊन सहकार्याचें नवें युग सुरू करतां येईल. असें सहकार्य न घेतल्यामुळें विधिमंडळांत किंवा संसदेंत, केवळ उणीवा शोधून टीका करणें व सरकार कोणाचें तरी परक्याचें आहे असें मानून विरोध करणें हीच प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते. हा विरोध तेव्हांच मोडून निघेल कीं, जेव्हां राष्ट्रीय सभा सर्वांना अशा विविध कार्यांत समतेनें अन्तर्भूत करून त्यांच्या कर्तृत्वशक्ति कामाला लावील. याचा आणखी एक अपरिहार्य दुष्परिणाम असा झालेला दिसतो कीं, विरोधी पक्षदेखील स्वतंत्र असा कार्यक्रम आंखण्याची धडपड करीत नाहींत. या सर्व वस्तुस्थितीमुळें आपल्या राष्ट्रीय जीवनांतील अनेक प्रकारच्या शक्ती वाया जात आहेत.

अधिकारप्राप्ति हें काँग्रेसचें कधींच कायमचें उद्दिष्ट होऊं शकणार नाहीं. कारण अशा मर्यादित उद्दिष्टामुळें काँग्रेसचा ध्येयवाद कधींहि प्रत्यक्षांत येऊं शकणार नाहीं. देशांतील गुणी, चारित्र्यसंपन्न आणि कर्तृत्ववान् व्यक्तींचें सहकार्य प्रत्यक्ष कार्यांत आणि विचारांच्या क्षेत्रांत घेणें अगत्याचें आहे. परंतु दुर्दैवानें आज सारें लक्ष केंद्रित झालेलें आढळतें तें राजकीय क्षेत्रांत. विविध सामाजिक क्षेत्रें उपेक्षित राहिलेलीं आढळतात. यामुळें कीं काय, राष्ट्र-कार्य म्हणजे राजकारण असें समीकरण होऊं पहात आहे. गांधीजी, लो. टिळक, न्या. रानडे आदि नेत्यांनीं राजकारण आणि समाजकारण अशा दोन्हीहि क्षेत्रांकडे लक्ष पुरविलेलें दिसतें. विशेषतः नव्या नेतृत्वाची घडण करीत असतांना हा विचार प्रमुख ठरतो. किती तरी सामाजिक दुखणीं अजून दूर व्हावयाचीं

आहेत. हीं क्षेत्रें आपण पोरकींच ठेवणार काय, या प्रश्नाला डोळे उघडे ठेवून राष्ट्रसभेनें तोंड दिलें पाहिजे. आमचें सरकार आहे, ते कायदे करील असें म्हणून भागणार नाहीं. स्वातंत्र्याकरितां तळहातावर शिर घेऊन लढणारी सेना जशी निर्माण झाली तसें नवें दल या सामाजिक क्षेत्रांतील संकटांचा कायमचा निरास करण्यासाठीं निर्मिलें पाहिजे.

*समाजवादी निष्ठा*

'शांततामय सहजीवन' हें भारताचें आंतराष्ट्रीय संबंधांतील धोरण आहे. त्याचप्रमाणें 'समाजवादी समाजरचना' हें खुद्द भारतांतील अंतर्गत प्रयत्नांचें उद्दिष्ट आहे. इंपीरियल बँक, विमा-कंपन्या, तेल–शुद्धीकरणाचे कारखाने, पोलाद-कारखाने आदि उद्योगांचें राष्ट्रीयीकरण करून काँग्रेसनें फार मोठें प्रगतीचें पाऊल टाकलेलें आहे. तरी देखील वडया भांडवलदारांकडे व त्यांच्या हातांतील उद्योगांच्याकडे पहाण्याची, त्यांना संभाळून घेण्याची वृत्ति लवकर बदलणें आवश्यक आहे. जीवनमान वाढलें तरी जनतेच्या दैनंदिन गरजेच्या वस्तु न परवडण्यासारख्या अवस्थेंत आहेत. विशेषतः जमीनसुधारणाविषयक दृष्टिकोण अधिक क्रांतिकारक करून त्याची तांतडीनें अंमलबजावणी होऊन त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय जेव्हां येऊं लागेल तेव्हां या समाजवादी निष्ठेची वाढ होईल. यावरच आपल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचें संगोपन अवलंबून आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

*राष्ट्राचें भावनात्मक ऐक्य*

आजच्या घडीला काँग्रेससारख्या जनताभिमुख संस्थेकडून जर फार मोठी कोणती अपेक्षा असेल तर ती भावनात्मक ऐक्य साधून प्रत्येक भारतीयाच्या अंगीं एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचें संगोपन करण्याची. भाषावार प्रांतरचनेचें फार पूर्वी दिलेलें वचन पूर्ण केल्याचें श्रेय या संघटनेनें मिळविलेलें आहे. परंतु भाषा, धर्म, जाति, हितसंबंध, स्वार्थ आणि परधार्जिणेपणा यांच्यामुळें या एक-राष्ट्रीय भावनेला तडा जातो कीं काय अशी आशंका वाटण्यासारखी भीति निर्माण होण्याची शक्यता सर्वत्र बोलून दाखविली जात आहे. त्यासाठीं सारा भर राजकीय स्वरूपाच्या, अधिकारपदप्राप्तीच्या विचारावर देऊन भागणार नाहीं. माझ्या या भारताचें स्वातंत्र्य प्राणपणानें रक्षून मी समतेचें, लोक–कल्याणकारी जीवन निर्माण करण्यासाठीं माझें सारें कर्तृत्व पणाला लावीन अशा प्रखर ध्येयवादाची ज्योति प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणांत फुलविण्याचें फार मोठें, मूलगामी, नाजूक आणि अवघड कार्य काँग्रेसला करावयाचें आहे.

तरुणांच्या मनांतील दारुण आणि भयावह विफलतेला दूर पिटाळून त्यांच्या विधायक शक्तीला आवाहनानें तर कधीं आव्हानानें जागृत करावयाचें आहे. काँग्रेसचा पंचाहत्तर वर्षांचा इतिहास अशा शेकडों रोमांचकारी आणि स्फूर्तिदायक घटनांनीं व्यापून राहिला आहे कीं त्याच्या केवळ स्मरणानें अचेतनाला देखील चैतन्य लाभावें ! या इतिहासाला आंतरराष्ट्रीय जगांत आणि भारतांत देखील नव्या तात्त्विक आणि क्रांतिकारी भूमिकेनें काँग्रेसनें पुनः एकदा उजळून टाकावयाचें कार्य केलें पाहिजे. नव्या जाणिवा, नवीं पराक्रमाचीं क्षेत्रें, नव्या आकांक्षा, नवी पुष्टि आणि नवी तुष्टि यांनीं भारत जगांतील अग्रगण्य लोकशाही राष्ट्र ठरलें पाहिजे. हें सारें कार्य लोकाभिमुख अशी ही राष्ट्रीय सभाच करूं शकेल.

परवशता गेली

भारताची लोकसंख्या दरसाल १·९% वाढत असते हें लक्षांत घेऊन दुसऱ्या योजनेच्या अखेर भारतांतील नुसत्या शेतीचेंच नव्हे, तर लोखंड, मँगनीझ, बॉक्साइट, कोळसा, रंग आणि पाण–वीज यांचें उत्पादन भारतीय जनतेच्या उच्च राहणीच्या दृष्टीनेंहि सकसपणें वाढवावयाचें आहे. १९४७ च्या ऑगस्टपासून व विशेषतः २६ जानेवारी १९५० पासून, आरंभापासून चळवळ्या असलेल्या काँग्रेसला राज्यकारभारी आणि लोकसेवक असें उभयांग स्वरूप आलेलें आहे. भारताच्या बळकट बांधणीसाठीं जिवापाड झटत असतां काँग्रेस तेजस्वी राहील व भारताला तेजस्वी करीत जाईल, त्या मानानें तिची प्रतिष्ठा राहणारी आहे.

ही प्रतिष्ठा राखतांना सर्वांच्याच हें खास लक्षांत राहील कीं, विसाव्या शतकाच्या गेल्या पंचविशींतील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे ‘त्याहुनि बरी निरयगति’ म्हणविणारी भारताची ‘परवशता’ राजकीयदृष्ट्या अस्तंगत झाली. ती अस्तंगत होण्यास दशकानुदशकें ज्यांनीं आपल्या वित्तजीवितसर्वस्वाचे होम केले, त्यांच्याबद्दलची कृतज्ञता भारतीयांच्या अंतःकरणांत सदैव जागृत राहील. इंग्रजांनीं हिंदुस्थान सोडतांना भारत व पाकिस्तान असें त्याचें विभाजन करून इंग्रज गेले आणि त्या विभाजनामुळें ज्या कटकटींचा शेवट होईल अशी अपेक्षा होती त्या कटकटी उत्कटत्वानें उद्‌भवल्या आणि जाचकहि झाल्या. १९४५ ते १९५५ या दशकांत जगामध्यें सर्वत्र उलथापालथ झाली तिचाच एक भाग म्हणजे भारतांतील राजवटींचा अवतार होय. जनसामान्याचें स्वाभिमानपूर्वक आर्थिक स्वास्थ्य वाढविण्यासाठीं राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग करून घेतला पाहिजे; ही जाणीव हा नव्या जमान्याचा कणा आहे. जागतिक महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर ही जाणीव जशी उठून दिसते तशीच आर्थिक

मंदीहि भोंवते. तिच्यांतून बाहेर पडण्यासाठीं औद्योगीकरण आणि सहकारी शेतीपासून सर्व उपाय भारत योजीत आहे; एवढेंच नव्हे तर, १ जानेवारी १९४९ ला पाकिस्तानशीं भारतानें (' सीज-फायर ') उठाव-गोळी-बंदी करार केल्यानें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत उच्च नैतिक पातळी प्रस्थापित करण्याचें श्रेय आशियाच्या वतीनें भारतानें घेतलें व तेंच धोरण बेरूबारी-विभाजनांतहि १९६० मध्यें भारतानें ठेवलें आहे. त्यामुळें पं. नेहरूंच्या नेतृत्वानें स्वातंत्र्य आणि आनुषंगिक धोरणें यांचा सांभाळ भारत आटोकाट प्रयत्नांनीं आणि तत्त्वनिष्ठेनें करीत आहे, असा जागतिक निरीक्षकांचाहि होरा आहे.

## विचारधारांचें नवयुग

संकटेंच संकटें जीं कांहीं प्रमाणांत अननुभवामुळें, तर कांहीं प्रमाणांत दुसऱ्यांच्या स्वार्थधुंद आक्रमणामुळें उभीं राहिलीं व आहेत, त्यांच्याशीं सामना करीत करीतच कॉंग्रेसनें आपलें अमृतमहोत्सवी वर्ष सुरू केलें आहे. फुटीर वृत्तीचा विनाश, पंचायतराज्याच्या प्रभावानें लोकसत्तेची जनजीवनांत प्रस्थापना आणि राष्ट्रीय उत्पादनांत वाढ करून चढत्या वाढत्या पदवीनें भारताचीं स्वातंत्र्यस्वप्नें सोज्ज्वळपणें कॉंग्रेस साकार करूं पाहात आहे. युरोपचें राजकीय व लष्करी स्थैर्य म्हणजे जगाचें स्थैर्य असें ~~दुसऱ्या महायुद्धां~~ हिटलरी होरपळीपूर्वींचें समीकरण होतें. तथापि १९०५ सालीं जगांतील एक महत्त्वाचें राष्ट्र म्हणून उदयाला आल्यापासून १९३२ पर्यंत ब्रिटनचा दोस्त म्हणून जपाननें नांदून मग आपलें आक्रमक स्वरूप प्रगट केलें. बाकी आशिया-संबंधींचे निर्णय वसाहतशाही युरोपियन राष्ट्रेंच करीत होतीं. या परिस्थितींत १९४९ सालीं पार बदल झाला. या अवधींत आशियांतील सुमारें ६५ कोटी जनतेनें वसाहतशाहीचीं बंधनें तोडून टाकलीं. भारत व चीन हीं राष्ट्रें औद्योगिक दृष्ट्याहि जगाचें लक्ष वेधूं लागलीं. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर विश्वव्यापक विचारधारांच्या संदर्भांतच भारताला आपलीं धोरणें आंखणें भाग आहे. कॉंग्रेस आपल्या मगदुरानुसार तेंच करीत आहे. कारण या नव्या जमान्यांत स्वतंत्र राष्ट्राची समर्थता म्हणजे अण्वस्त्रें, वायुसेना, लष्कर, नौदल, लष्करी दोस्तीचे करार (नाटो, सीआटोसारखे), औद्योगिक उत्पादन, कच्चा माल, दळणवळण-व्यवस्था, भौगोलिक परिस्थिति यांच्या अनुकूलतेवर आधारलेली शक्ति एवढेंच राजकीय समीकरण उरलें नसून, विचारधारांचें प्रभावी प्रसरण आणि जनतेचा समजूतदार सहकार यांचाहि समावेश समर्थतेच्या घटकावयवांत हल्लीं होत असतो. हें जाणूनच कम्युनिस्ट राष्ट्रांतसुद्धां सर्वत्र लोकशाहीची परिभाषा ऐकूं येत असते. शांततापूर्ण सहजीवनाची भारताच्या पंचशीलांतील तरफदारी

रशिया देखील करीत असतो. त्यामुळें जागतिक जमान्यांत भारताचें वजन वाढण्याचा संभव आहे. त्याला साजेशी बळकटी स्वतःच्या जीवनांतहि साधावयाची आहे. आहे त्याच अवस्थेंत राहण्याचा हा कालखंड नसून कल्पकतापूर्ण व भविष्यभेदक कृतीचा हा कालखंड आहे. तसें कार्यान्वित होतांना, नैतिक निष्ठेचें सहजीवन भारताला साधावयाचें व प्रभावी करावयाचें आहे.

*मानवी कल्याण*

विसाव्या शतकांत तीन राजकीय क्रांत्या झाल्या. १९१७ सालीं रशियांत, १९४९ सालीं चीनमध्यें आणि १९४७–१९५० सालीं भारतांत अशा त्या क्रांत्या होत. परिवर्तन, प्रगति व विकास यासाठीं हिंसा अपरिहार्य नाहीं असा काँग्रेसप्रणीत भारतीय क्रांतीचा संदेश असून मर्यादित का होईना, भारताला आपल्या बळकटीचा आत्मविश्वास आला आहे. भारताच्या लोकशाही योजनेंत मुख्य भर मानवी कल्याणावर आहे. त्यामुळें व्यवहार व धान्योत्पादन, सार्वजनिक आरोग्य व शिक्षण यांवर भारताचा भर आहे. माणूस केवळ भाकरीवरच जगत नाहीं, या जाणिवेनें भारताच्या लोकशाही धारणेंत सांस्कृतिक कार्यक्रमहि आहे. या सर्वांकरितां लागणाऱ्या पैशांपैकीं ऱ्याण्णव टक्के भारत कररूपानें उभा करतो. तेव्हां रोजगारधंद्याची सोय झपाट्यानें वाढविणें भारताला अत्यंत आवश्यक झालें आहे; आणि स्वदेशीची ऊर्फ राष्ट्रीय अभिमानाची प्रचीती त्या सर्व खटाटोपाच्या अणुरेणूंतून आली पाहिजे अशीहि दक्षता भारताला घ्यावयाची आहे. भारतांतील सर्व पक्षीयांना विश्वासांत घेऊन सहकारी सहजीवनानें काँग्रेस तें सर्व साध्य करूं शकेल असा विश्वास आणि निष्ठा बाळगणें अदूरदृष्टीचें ठरणार नाहीं.

● ● ●

**पुरवणी :**

[ **काँग्रेसपक्ष** पुस्तकांतील पृष्ठ ६५ वरील भाषावार प्रांतरचनेबाबतचा मजकूर पुढीलप्रमाणें वाचावा. ]

भाषिक वादानें भारताला ग्रासलें व विनाकारण उत्साह-कीर्तीला कमीपण आणलें. भाषा व इतर दृष्टींनीं देशाचे जे स्वाभाविक विभाग पडले आहेत, त्यांचेच भारतीय संघराज्याचे भाग बनवून राज्यकारभार करणें देशांतील लोकांच्या स्वाभाविक विकासाच्या दृष्टीनेंहि योग्य होय. याच विचारानें १९१७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्यें भाषावार प्रांतरचनेची मागणी झाली होती व १९२० च्या नागपूर काँग्रेसनंतर भाषावार काँग्रेस-कमिटया अमलांत आल्या होत्या. स्वतंत्र भारतांत भाषावार प्रांतरचना झाली, त्या वेळीं महाराष्ट्र-गुजराथ-पंजाब-आंध्र यांना तो दिमाख (अनेक विचार-कारणांनीं) मिळाला नाहीं. त्यामुळें लोकांत अन्यायाच्या जाणिवेनें तीव्र असंतोष माजला. काँग्रेसच्या विरोधकांना हें एक घबाड मिळालें व त्याचा त्यांनीं फायदा घेतला. १९५१–५२ च्या सार्वजनिक निवडणुकीनंतर काँग्रेसमन् पोट्टु श्रीरामन् यानें अठ्ठावन्न दिवसांचें आमरण उपोषण करून आपल्या हौतात्म्यानें १ आक्टोबर १९५३ रोजीं तेलगुभाषी आंध्र प्रांताची निर्मिति करविली. त्यानंतर महाराष्ट्र-गुजराथ-कर्नाटकादि प्रदेशांतून एकभाषिक प्रांताची मागणी जोरानें पुढें येऊं लागली. म्हणून प्रांतरचनेचा प्रश्न कायमचा सोडविण्याच्या दृष्टीनें मध्यवर्ती सरकारनें २९ डिसेंबर १९५३ रोजीं प्रांत-पुनर्रचना-कमिशन नेमलें. बेळगांव-कारवार-मुंबई-नागपूर-वऱ्हाडसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीनें संयुक्त-महाराष्ट्र-परिषद् स्थापन झाली होती. तिनें प्रांत-पुनर्रचना कमिशनला सर्व पक्षांच्या व कांहीं अपक्षीय विचारवंतांच्या पुरस्कारानें एक निवेदन सादर केलें. तथापि सदर कमिशनचा इतिवृत्तात्मक अभिप्राय ता. १० आक्टोबर १९५५ रोजीं प्रसिद्ध झाला तरी महाराष्ट्र-गुजराथवर झालेला अन्याय दूर झाला नाहीं. तेव्हां काँग्रेसजनांतील भाषावार प्रांतपुनर्रचनेच्या अभिमान्यांनीं अन्यपक्षीयांची साथ काँग्रेसबाहेर पडून केली.

या पेचप्रसंगांतून मार्ग काढण्यासाठीं विदर्भासह महाराष्ट्र, महागुजराथ, व मुंबई अशी त्रिराज्य-योजना काँग्रेस वर्किंग कमिटीनें पुरस्कृत केली. या योजनेला लोकमताचा मुळींच पाठिंबा मिळत नाहीं असें दिसून येतांच भारत सरकारनें केंद्रशासित मुंबईचा पर्याय घोषित केला. यामुळें महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ ना. डॉ. चिंतामणराव देशमुख यांनीं केंद्रीय

मंत्रिमंडळांतील अर्थमंत्रिपदाचा राजिनामा ता. २३ जानेवारी १९५६ रोजीं दिला. तेव्हां लोकक्षोभ अधिकच भडकला. संयुक्त महाराष्ट्र समितीनें व महा-गुजराथ समितीनें सत्याग्रहाचा अवलंब केला. यानंतर लोकसभेंत प्रांतपुनर्रचनेचें विधेयक मांडलें गेलें. त्यांत मुंबईसह गुजराथ-महाराष्ट्राचा द्विभाषिक प्रांत निर्माण करण्यांत आला.

कॉंग्रेस-श्रेष्ठींना भाषावार प्रांतरचनेला विरोधी असण्यांत आनंद नव्हता. तथापि, मुंबई इलाख्याचा कारभार एल्फिन्स्टनच्या काळा-पासून परिणति-प्रगति राखून चालत आलेला होता; भारताच्या एकजिनसी-पणाचें प्रात्यक्षिक छोट्या प्रमाणांत सतत डोळ्यांपुढें असावें आणि व्यापार-कुशल गुजराथी व पराक्रम-प्रभावी महाराष्ट्रीय यांच्या एकजीव मिळणीनें नि सामाजिक-आर्थिक सरणीनें मुंबईराज्य स्वावलंबी व समर्थ रहावें अशी द्विभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितींत अपेक्षा होती. ती जनतेला पटविण्याचें बाजूस राहून व त्या अपेक्षेच्याच पूर्तीसाठीं धारवाडादि कर्नाटकी जिल्हे म्हैसूर राज्यांत कसे सामील झाले याचें जनतेला कोडें पडून एकंदर प्रश्न एवढ्या इज्जतीचा झाला कीं, सत्याग्रही जनतेवर झालेल्या दोन गोळीबारांनीं ( मुंबई व अहमदाबाद येथील ) लोकमताची बेपर्वाई ब्रिटिशांनाहि मागें सारणारी झाली. त्यामुळें कॉंग्रेसजनहि हादरले. खासदार फिरोज गांधी प्रभृतींनीं संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते श्री. श्री. म. जोशी व महागुजराथ समितीचे नेते श्री. इंदुलाल याज्ञिक यांच्या मतांचा व लोकपाठिंब्याचा कानोसा घेतला. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकींत लोकमताचा कौल शासकीय धोरणाच्या विरुद्ध ठसठशीत प्रगट झाल्यावर तर खासदार गांधी, कॉंग्रेसच्या अध्यक्ष सौ. इंदिरा गांधी प्रभृति कॉंग्रेसजन द्विभाषिक-विभाजनास अनुकूल वातावरण निर्माण करूं लागले. त्यामुळें द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या धीरोदात्ततेनें व पं. जवाहरलाल नेहरूंच्या सौहार्दानें १९६० च्या मे-पासून महागुजराथ व वऱ्हाड-नागपूर-मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अशीं स्वतंत्र राज्यें होऊन लोकमताचा विजय झाला. एवढेंच नव्हे, तर तिकडे दोन वर्षें चळवळच चळवळ करून नागा लोकांनींहि आपला सुभा साधून घेतला.

## कालक्रम

१९३५ राज्यकारभाराचा नवा कायदा–प्रांतिक स्वायत्तता; कॉंग्रेसचा सुवर्ण-महोत्सव.

१९३६ लॉर्ड लिन्‌लिथगो व्हाइसरॉय; फैजपूर येथें ग्रामीण लोकांत लोकशिक्षणार्थ कॉंग्रेसचीं ग्रामाधिवेशनें सुरू.

१९३७ नवी प्रांतिक राज्यघटना सुरू–आठ प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें; दक्षिणी संस्थान लोकपरिषद कुडची.

१९३८ संस्थानी प्रजांची चळवळ जोरांत.

१९३९ दुसरें जागतिक महायुद्ध; कॉंग्रेस मंत्रिमंडळाचे राजिनामे; औंध संस्थानांत म. गांधींच्या दिग्दर्शनानें " स्वराज्याचा कायदा. "

१९४० पाकिस्तान-चळवळीचा उदय; कॉंग्रेसची घटनासमितीची मागणी आणि संपूर्ण स्वातंत्र्याचा आग्रह; ८ ऑगस्टची व्हाइसरॉयची राजकीय सुधारणांबाबत घोषणा.

१९४१ कॉंग्रेसचा वैयक्तिक सत्याग्रहानें युद्धविरोध सुरू.

१९४२ "चलेजाव"ची कॉंग्रेस–घोषणा; जागतिक महायुद्धांत जपानचें पदार्पण व दूर-पूर्वेला आक्रमण; क्रिप्स-योजनेस वाटाण्याच्या अक्षदा; 'युद्धपुरवठ्याचें कोठार' म्हणून हिंदुस्थानचा उपयोग.

१९४३ सिंगापुरास " स्वतंत्र–हिंद–सरकारची " स्थापना; नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना.

१९४४ म. गांधींची सुटका; कॉंग्रेस वर्किंग कमिटीची सुटका; गांधी–जिना वाटाघाटी; सिंगापुरास नेताजी सुभाषचंद्र बोसकडून आझाद हिंद सैन्याची उठावणी.

१९४५ कॉंग्रेस-पुढाऱ्यांची सुटका; वेव्हेल-योजनेचा कॉंग्रेसकडून स्वीकार; सिमला–परिषद्, अध्यक्ष वेव्हेल; दिल्लीच्या लाल किल्ल्यांत आझाद हिंद सैन्याचा खटला.

१९४६ त्रिमंत्रि–योजना; हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना; हंगामी सरकारांत मुस्लिम लीगचा प्रवेश; जागतिक महायुद्ध समाप्त; घटना-समितीची पहिली बैठक; नव्या दिल्लींत पहिली एशियन कॉन्फरन्स.

१९४७ इंग्लंडचे मुख्यमंत्री अॅटली यांनीं हिंदुस्थानवरील सत्ता सोडण्याची केलेली घोषणा; लॉर्ड माउंटबॅटनची ३ जूनची घोषणा; पाकिस्तान-निर्मिति; वसाहतीच्या स्वराज्यधर्तीवर भारत स्वतंत्र; २२ जुलैस घटना-समितीनें राष्ट्रीय निशाण ठरविलें.

१९४८ म. गांधींचें देहावसान; राजगोपालाचार्य गव्हर्नर जनरल; हैदराबाद संस्थानांतील व काश्मीरमधील पोलिस-कारवाई; जयपूर या संस्थानच्या गांवीं काँग्रेसचें पहिलें अधिवेशन; संस्थानांच्या विलीनीकरणास प्रारंभ; ब्रिटिश सैन्याच्या शेवटच्या तुकडीनें भारत सोडलें.

१९४९ सार्वभौम लोकसत्ताक राज्याची घोषणा व संस्थानांचें विलीनीकरण संपूर्ण; राष्ट्रकुलांत राहण्याचा भारताचा निर्णय.

१९५० भारताचें सार्वभौम लोकसत्ताक राज्य सुरू.

१९५१ पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात; स्वतंत्र भारताची प्रौढ मतदार-संघावर आधारलेली पहिली निवडणूक; काँग्रेसपक्षीय राजवट; काश्मीरमध्यें यूनोतर्फे डॉ. फ्रँक ग्रॅहॅम.

१९५२ राष्ट्रपति म्हणून डॉ. राजेंद्रप्रसादांची फेरनिवड; डॉ. राधाकृष्णन् उपाध्यक्ष; काँग्रेस बहुमतानें निवडून अधिकारारूढ.

१९५५ आशियन–आफ्रिकन देशांची नव्या दिल्लींत परिषद; बांडुंग परिषदेंत पं. नेहरूंचा पुढाकार; मार्शल बुलगॅनिन, क्रुश्चेव्ह यांच्या भारतास भेटी.

१९५६ प. जर्मनीचे व्हाइस चॅन्सेलर डॉ. फ्रॅन्स ब्लूचर यांची भारतास भेट.

१९५८ डॉ. हो चि मिन यांची भारतास भेट; अफगाणिस्तानचा राजा झहीरशहा व ब्रिटनचे मॅक्मिलन यांची भारतास भेट.

१९६० काँग्रेसचें अमृतमहोत्सवी वर्ष.

• • •

# सूचि


अकबर हैदरी (सर)
अच्युत पटवर्धन
अणे (लोकनायक)
अतिपूर्व
अफगाण युद्ध
अमृतसर
अमेरिका
अरविंद घोष
अरुणा असफअली
अरुंडेल
अलाहाबाद
अलेक्झांडर
अशोक मेहता
असहकार
अहमदाबाद
अंदमान
अंबिकाचरण मुजुमदार
ॲटली क्लेमंट
ॲटलांटिक
ॲनी बेझंट
~~आजकालचा महाराष्ट्र~~
आझाद (मौ.) अबुल कलम
आझाद-हिंद-सरकार
आझाद-हिंद-सैन्य
आयर्विन (लॉर्ड)
आयसेनहोअर
आरमारी संप
आर्यसमाज
आल्फ्रेड टर्नार
आशियन–आप्तसंबंध परिषद
आशिया
आसाम
आंध्र
आंबेडकर (डॉ.)
ऑल इंडिया काँग्रेस कामिटी
इटाली
इल्बर्ट बिल्
इस्थोनिया
इंग्रेज
इंग्लंड
इंडोचायना
इंफाळ
ईस्ट इंडीज बेटें
ईस्ट इंडिया कंपनी
ईस्टर्न असोसिएशन
उत्तर प्रदेश
उमाजी नाईक
उमीचंद
एकोणीसशें पस्तीसचा कायदा
एडन
एडमंड बर्क
ओडवायर (सर) मायकेल

ओरिसा
औंध ( संस्थान )
कम्युनिझम
कराची
कर्झन ( लॉर्ड )
कलकत्ता
कलकत्ता युनिव्हर्सिटी
कंदाहार
काका कालेलकर
काबूल
काश्मीर
कांगो
काँग्रेस
काँग्रेस-मंत्रिमंडळ
काँग्रेस-सोशॅलिस्ट
किश्लू ( डॉ. )
कृपलानी ( आचार्य )
कृष्णा पेन्नर
केरळ
केळकर न. चिं. ( तात्यासाहेब )
कैसर
कैसरी कंदन
कोकोनाडा
कोचीन
कोयना हॅड्रोइलेक्ट्रिक स्कीम.
कोरिया
कोसी
कोहिमा
क्रिप्स ( सर ) स्ट्रॅफोर्ड
क्रिप्स–योजना
क्रीट
क्रुश्चेव्ह
क्रेन आर. आय.
क्लाईव्ह.
खानदेश
खिलाफत
खेडा
खैबरघाट
गद्दर
गया
गांधी ( महात्मा )जी
गांधी–आयर्विन–करार
गुजराणवाला
गुजराथ
" गुंसे "
गोखले ( नामदार )
गोरखपूर
गोवा
ग्रामराज्य
चरखा-संघ
चर्चिल ( सर ) विन्स्टन्
चलेजाव
चलो दिल्ली
चंपारण्य
चंबळ व्हॅली प्रॉजेक्ट
चित्तरंजन ( रेल्वे-इंजिन कारखाना )
चीन
चेंबरलेन
चँग कै शेक
चौरीचुरा
जगत्नारायण ( पंडित )
जपान
जमशेटपूर
जयपूर
जयप्रकाश नारायण
जर्मनी

जवाहरलाल ( पंडित ) नेहरू
जालियनवाला ( बाग )
जावा
जाहीरनामा ( राणीचा )
जॉर्ज ( पंचम )
जिना ( बॅ. ) कायदेआझम
जेधे-गाडगीळ
टंडन ( बाबू ) पुरुषोत्तमदास
टिळक ( लोकमान्य )
~~टिळक-चरित्र~~
टोकिओ
डायर ( जनरल )
डेन्मार्क
तिबेट
तुंगभद्रा
तेजबहादूर सप्रू
तेलंगण
त्रावणकोर
त्रिपुरी
त्रिमंत्री-योजना
थिऑसाफिकल सोसायटी
दक्षिण आफ्रिका
दक्षिण आशिया
दामोदर व्हॅली
दास ( बॅ. ) चित्तरंजन
दांडी-मोर्चा
दिल्ली
देशगौरव ( सुभाषचंद्र )
नगर
नरेंद्र देव ( आचार्य )
नलिनीरंजन सरकार ( सर )
नवमानवतावाद
नागपूर
नागासाकी
नानासाहेब पेशवे
नाशिक
नांदरा-हवेली
नॉर्मंडी
नॉर्वे
निकोबार
निजाम
नेताजी ( देशगौरव पाहा )
नेमस्त
नेहरू ( पं. ) ( जवाहरलाल पाहा )
नेहरू-नून करार
नेहरू-रिपोर्ट
नौखाली
पट्टाभी सीतारामय्या ( डॉ. )
~~पणीकर ए. एम.~~
पर्ल हार्बर
पश्चिम आशिया
~~बंगाल~~
पंचशील
पंजाब
पॅथिक लॉरेन्स ( लॉर्ड )
पाकिस्तान
पाध्ये-टिकेकर
पार्लमेंट
पील कमिटी रिपोर्ट
पुणें
पुणें-करार
पूर्व पंजाब
पेप्सू
पोट्टी श्री रामलू

पोलंड
पोलिस-कारवाई
प्रजासत्ताक
प्रतिसरकार
प्रेमा कंटक
प्लासी
फॅसिझम्
फॉक्स
फॉरवर्ड ब्लॉक
फिन्लंड
फिरोजखान नून
फेरोजशहा मेहता
फैजपूर
फोर्मोसा
फ्रान्स
फ्लँडर्स
बनारस
बर्लिन
बलुचिस्तान
बहादूरशहा
बहिष्कार
बंगलोर
बंगाल
बँकॉक
बापट ( सेनापति )
बार्डोली
बारिसाल
बालिया
बाल्टिक राष्ट्रें
बिर्ला एम्. डी.
बिहार
बेझंट ( ॲनी बेझंट पाहा )
बेरूबाडी
बेल्जम
बेळगांव
बोरसद
ब्रह्मदेश
ब्रह्मावर्त
ब्राह्मो समाज
ब्रिटन
ब्रिटिश
ब्रिटिश कॉमनवेल्थ
भगवानदास ( डा. )
भद्र-रेझरवायर
भाऊसाहेब सोमण
भाक्रा
भागलपूर
भारत
भारत-सरकार
भारत-संरक्षक सैन्य
भारतीय आतंकवाद
भारतीय समाजवाद
भुलाभाई देसाई
भूदान-चळवळ
भोपाळ
मद्रास
मध्यप्रांत
मयूराक्षी
मलाया
मश्रुवाला
महंमदअल्ली
महात्माजी ( गांधी पहा )
महानदी
महाराष्ट्र
मंडलाकार परिषद
मंडाले

मॅक्मोहन रेषा
मॅक्स्वेल ( सर ) रेजिनॉल्ड
मॅझिनी
माऊभांडार
मानवेंद्रनाथ रॉय
मार्क्स
मार्क्सवाद
मालदीव
मॉटेग्यू ( लॉर्ड )
मॉटेग्यू-चेम्सफोर्ड } सुधारणा
मॉटफोर्ड
मिदनापूर
मिनू मसानी
मुचकुंद हॅड्रो-इलेक्ट्रिक स्कीम
मुरादाबाद
मुस्लिम लीग
मुंबई
मोतीलाल नेहरू
मोर्ले-मिंटो सुधारणा
मौंटबॅटन लुई ( लॉर्ड )
मौंटबॅटन-योजना
युनॅनिस्ट पक्ष
यूनो
यूरोप
रशिया
रॅड्क्लिफ
रॅम्से मॅक्डोनाल्ड
राघवेंद्रराव ( डॉ. )
राजगोपालाचारिअर ( चक्रवर्ती )
राजाजी
राजेंद्रप्रसाद ( डॉ. )
रानडे ( न्यायमूर्ति )
रामकृष्ण परमहंस
रामगड
रामपदसागर
राममोहन रॉय
राममोहन लोहिया
रावबाजी
राष्ट्रकुल ( ब्रिटिश कॉमनवेल्थ पहा )
राष्ट्रसंघ
राष्ट्रीय सरकार
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
रूझवेल्ट ( प्रेसिडेंट )
रौलट ॲक्ट
लक्झेंबर्ग
लखनौ
लखनौ-करार ( पॅक्ट )
लटेव्हिया
लंडन
लालमोहन घोष
लाला लजपतराय
लाहोर
लिटन ( लॉर्ड )
लिथुॲनिया
लिन् लिथगो ( लॉर्ड )
लिबरल फेडरेशन
लीग ( मुस्लिम लीग पहा )
लीग ऑफ नेशन्स ( राष्ट्रसंघ पहा )
लोकहितवादी
वर्धा
वऱ्हाड
वल्लभभाई ( सरदार ) पटेल
वंगभंग
वायव्य सरहद्द प्रांत
वासुदेव बळवंत फडके
वास्को-द-गामा

विजगापट्टण
विठ्ठलभाई पटेल
विनोबाजी भावे ( आचार्य )
विल्सन ( प्रेसिडेंट )
विवेकानंद
वेव्हेल ( लॉर्ड )
वेव्हेल-योजना
वेस्टर्न असोसिएशन
व्हर्साय
व्हिक्टोरिया
शिवाजीमहाराज
शीख
शेख अब्दुला
शेरिडन्
शौकतअली ( मौ. )
श्यामाप्रसाद मुकर्जी
सच्चिदानंद सिंह ( डॉ. )
सत्यपाल ( डॉ. )
सत्याग्रह
सत्येंद्रप्रसाद सिंह
समाजवाद
सयाम
सरहद्द } ( वायव्य सरहद्द
सरहद्दप्रांत } प्रांत पहा )
सर्वोदय
संस्थानें
संयुक्त प्रांत
साने गुरुजी
सायमन-कमिशन
सार्वजनिक काका
सार्वजनिक सभा ( पुणें )
सावरकर
सिमला
सिल्हेट
सिंगापूर
सिंद्री
सिंध
सीमाप्रांत ( वायव्य सरहद्दप्रांत पहा )
सीलोन
सुभाषचंद्र बोस ( देशगौरव पहा )
सुरत
सुरतगड
सुरेंद्रनाथ बानर्जी
सुलतान अहंमद ( सर )
सुवेज
सोविएट
स्वदेशी
स्वराज्याची चतुःसूत्री
स्वराज्याची सप्तपदी
स्वातंत्र्य
हकीम अजमलखान
हंगेरी
हॉर्डिंग्ज ( लॉर्ड )
हॉनर मरेड्ड
हॉलंड
हिटलरी होरपळ
हिरोशिमा
हिंदु
हिंदुमहासभा
हैदराबाद
होमरूल
होमी मोदी ( सर )
ह्यूम ए. ओ.

●●●

## कॉंग्रेसचे अध्यक्ष

★

| | |
|---|---|
| १९३६ ते १९३७ | पं. जवाहरलाल नेहरू |
| १९३८ ते १९३९ | दे. सुभाषचंद्र बोस |
| १९४० ते १९४५ | मौ. अबुलकलम आझाद |
| १९४६ | आचार्य कृपलानी |
| १९४७ ते १९४९ | डॉ. राजेंद्रप्रसाद |
| १९५० | बाबू पुरुषोत्तमदास टंडन |
| १९५१ ते १९५४ | पं. जवाहरलाल नेहरू |
| १९५५ ते १९५८ | श्री. यू. एम्. ढेबरे |
| १९५९ | श्री. इंदिरा गांधी |
| १९५९ फेब्रुवारी ते १९६० | श्री. संजीव रेड्डी |

●●●

हिंदुस्थान सरकार (भारत सरकार पहा)

## वाचनीय ग्रंथसंपदा

★

१ आंग्लाईच्या आरपार–पु.पां.गोखले लेखमाला 'समर्थ' सातारा १९६०
२ इंडिया टुडे—फ्रँक मॉरेस
३ इंडिया विन्स फ्रीडम्—मौ. अबुल कलम आझाद.
४ काँग्रेसचा इतिहास—डॉ. पट्टाभि सीतारामय्या.
५ ग्रेट ब्रिटन इन् इंडिया—पी. आर्. मसानी.
६ ट्रॅन्सफर ऑफ पॉवर—व्ही. पी. मेनन्.
७ दि पार्टिशन ऑफ इंडिया—जी. व्ही. सुब्बाराव.
८ नाऊ इट् कॅन् बी टोल्ड—प्रा. बाली.
९ न्यू डायमेन्शन्स ऑफ पीस—चेस्टर बाउल्स.
१० पं. नेहरूंचें अंतरंग—करंजिया
११ भारत-आज व उद्यां—पं. नेहरू.
१२ महात्मा—डी. जी. तेंडुलकर.
१३ मिशन विथ् मौंटबॅटन—एलन कॅम्बेल जॉन्सन्.
१४ लीडरशिप अँड पोलिटिकल इन्स्टिटयूशन्स इन् इंडिया —रिचर्ड एल्. पार्क अँड टिंकर.

● ● ●

## नवमहाराष्ट्रांतील विचारप्रवाह

| | |
|---|---|
| काँग्रेसपक्ष ( कार्य आणि भवितव्य ) | श्री. पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले |
| प्रजासमाजवादी पक्ष ( कार्य आणि भवितव्य ) | श्री. ना. ग. गोरे |
| अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम | श्री. शंकरराव खरात |
| भारतीय मजूर-संघटना | श्री. बगाराम तुळपुळे |
| भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध | श्री. अ. भि. शहा |
| मानवतावाद | श्री. मा. प. मंगुडकर |
| औद्योगिक विकास | श्री. चिंतामणी गणेश वैद्य |
| महाराष्ट्रांतील शिक्षण | श्री. चंद्रकुमार डांगे |
| महाराष्ट्राची सामाजिक वाटचाल | श्री. विद्याधर पुंडलिक |
| महाराष्ट्रांतील स्त्रीजीवन-विकास | सौ. सरिता पदकी |

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें २.

## महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह

| | |
|---|---|
| कथा | श्री. पंडित शेटे |
| कादंबरी | श्री. ल. ग. जोग |
| काव्य | श्री. कृष्ण बलवंत निकुम्ब |
| नाटक | श्री. विजय तेंडूलकर |
| निबंध व लघुनिबंध | श्री. ह. श्री. शेणोलीकर |
| चरित्र-आत्मचरित्र | श्री. गो. म. कुलकर्णी |
| टीका | श्री. वसंत दिगंबर कुलकर्णी |
| बालवाङ्मय | श्री. देवीदास बागूल |

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणें २.